**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याचा प्रस्ताव**

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून त्या ऐवजी तातडीचा विषयावर चर्चा व्हावी म्हणून प्रस्ताव दिला आहे. हा प्रस्ताव स्वीकारण्यायोग्य आहे किंवा कसे याबाबत सन्माननीय सदस्यांना काही सांगावयाचे असल्यास त्यांनी एक दोन मिनिटांत आपले म्हणणे मांडावे यासाठी मी त्यांना बोलण्याची परवानगी देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला मी दिलेल्या नियम 289 च्या प्रस्तावासंबंधातील माझी भूमिका मांडण्याची संधी दिली आहे त्याबद्दल मी आपल्याला प्रथमत: धन्यवाद देतो. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहे आणि दुर्दैवाने आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, या महाराष्ट्रातच छत्रपती शिवाजी महाराजांना वारंवार अपमानित व्हावे लागते आहे. एक सहन झाले, सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून मग दुसरीकडे तोच पायंडा पडला, तिसरीकडे पुन्हा तोच पायंडा पडला. असे सतत चालूच राहिले आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, सरकार आमच्या हाती असले, काही मंत्री आमच्या ताब्यात असले आणि पटवापटवीचे सामर्थ्य आमच्यात असले तर छत्रपतीच काय पण आम्ही कोणालाही कोठेही मोजू शकतो अशी प्रवृत्ती आज निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, मी आज 289 नियमाखाली जो प्रस्ताव आपल्याकडे दिला आहे तो सहार विमानतळावरील छत्रपतींच्या पुतळ्याच्या संदर्भात आहे. त्या ठिकाणी जो छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविलेला आहे तो तेथून हलविण्याच्या संदर्भात जे कारस्थान रचले जात आहे त्या संदर्भातील हा प्रस्ताव आहे. सभापती महोदय, मोठ्या संघर्षाने तो पुतळा तेथे आलेला आहे. हा पुतळा तेथे बसविला जावा या साठी शिवसेनेने त्या वेळेला फार मोठा संघर्ष केला होता. अनेक शिवसैनिक त्यावेळेस तुरूंगात गेले होते, त्यात मीदेखील होतो. मला आठवते की, त्यावेळेस माझा जो फोटा वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला होता त्यात 60-70 एसआरपींच्या गराड्यात मी एकटा होतो. फार मोठ्या प्रमाणात संघर्ष झाल्यानंतर, त्यावेळेस आमच्या खांद्यावर छत्रपतींचा जो अर्धपुतळा होता, मुळात तो पोलिसांनी जप्त केला आणि त्यांना दोन वर्षे तुरूंगात पाठविले. आता छत्रपतींना जामीन देणार का हा विषय देखील त्यावेळी मोठा गाजला होता. सभापती महोदय, अशा संघर्षानंतर त्या

..... ए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सहार विमानतळावर छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा विराजमान झाला, बसविला गेला. आता जे काही तेथे झाले आहे त्यासंबंधात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आवाज उठविला होता. सभापती महोदय, सहार विमानतळावर जेव्हीके कंपनीकडे खाजगीकरणातून विमानतळ आधुनिकीकरणाचे काम दिले आहे. सभापती महोदय, काल परवा खालच्या सदनामध्ये याच संदर्भात विषय काढला गेला तो विषय खरे तर आम्ही देखील या सभागृहात घ्यायला पाहिजे होता. या जेव्हीके कंपनीने त्या ठिकाणी जो त्यांच्या नावाचा बोर्ड लावला आहे त्यावर छत्रपतींचे नाव छोट्या अक्षरात आणि त्यांच्या कंपनीचे नाव मात्र मोठ्ठ्या अक्षरात लिहिलेले आहे. म्हणजे सहार विमानतळ हा जणू काही जेव्हीके कंपनीचा खाजगीतला आहे अशाच प्रकारे तेथे सारे करून टाकले आहे. हा छत्रपतींचा अपमान तर आहेच पण त्याही पलिकडे जाऊन मी आपल्याला सांगेन की, त्या ठिकाणी त्या विमानतळाचे जे नूतनीकरण चालले आहे त्यात तेथील छत्रपतींचा पुतळा तेथून काढायचा आणि सहार विमानतळाच्या बाहेर असलेल्या खाजगी जागेवर वा सरकारी जागेवर, महापालिकेच्या जागेवर, पेट्रोलपंपाजवळ तो अश्वारूढ पुतळा उभा करायचा अशा प्रकारचे नियोजन केले गेले आहे, ते अत्यंत निषेधार्ह आहे. म्हणून या संदर्भात तातडीने सदनात चर्चा व्हावी यासाठी सदनातील प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. कारण हीच नाही तर छत्रपतींच्या संदर्भात अशा अनेक घटना घडल्या आहेत, घडत आहेत त्यांच्याही बाबतीत चर्चा या निमित्ताने होणे अगत्याचे आहे. उदाहरणार्थ, बीडमध्ये झालेली घटनाही अत्यंत गंभीर अशीच आहे. ती घटना तर इतकी गंभीर आहे की, छत्रपतींचे पोस्टर काढण्यासंबंधात कलेक्टरनेच नोटीस दिली आहे. दुसरी घटना आपल्या सांगलीची आहे. सांगलीमध्ये तर कॅलेंडर जप्त केले गेले. तेव्हा जेथे जेथे 'छत्रपती' आले तेथे काही लोकांचे पित्त का खवळते हे मला कळत नाही आणि अशा पित्त खवळणाऱ्या प्रवृत्तीला वेळीच ठेचून काढले पाहिजे ही आता काळाची गरज आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, छत्रपतींचा होणारा हा भयानक अवमान आहे, या महाराष्ट्राच्या आणि एकंदर देशाच्या भावनेशी खेळण्याचा हा जो प्रयोग होतो आहे त्याला आपण सर्वांनी मिळून आताच पायबंद घातला नाही ... सभापती महोदय, हा प्रश्न कोठल्या एका पक्षाचा नाही तर महाराष्ट्राच्या अस्मितेचा आहे, आपल्या सर्वांचा आहे. मग आम्ही आज सरकारमध्ये बसलो आहोत की नाही, सरकारमध्ये कोण बसले आहे हा विषय यात

..... ए 3 ...



KBS/KGS/KTG. 12:00

येऊ शकत नाही, असू शकत नाही. हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. म्हणून या विषयी तातडीने चर्चा करून, ताबडतोब निर्बंध, पायबंद घालून छत्रपतींचा अवमान या महाराष्ट्रात सहन केला जाणार की नाही या संदर्भात शासनाची काय भूमिका आहे हे जाणून घेण्याची आमची इच्छा आहे. म्हणून हा प्रस्ताव मान्य करून या चर्चेला सर्व कामकाज बाजूला ठेवून तातडीने सुरूवात होण्याची आवश्यकता आहे. कारण महाराष्ट्राच्या अस्मितेची, छत्रपती शिवरायांच्या सन्मानाची आणि तुमच्या माझ्या मनात असलेल्या भावनांचा हलकल्लोळ थांबविण्यासाठी ही चर्चा तातडीने होण्याची गरज आहे. अशी मी आपल्याला या माध्यमातून नम्र विनंती करतो.

( यानंतर श्री. सरफरे .... बी 1 ..

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सहार येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविणार अशाप्रकारची कुणकुण सहा महिन्यापासून होती. जे.व्ही.के. या कंपनीने स्वत:चे साम्राज्य तयार केले आहे. महाराष्ट्र राज्यापेक्षा आणि छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा ही कंपनी मोठी आहे असे मानते. अशाप्रकारे हडेलहप्पीचे धोरण या कंपनीने अवलंबिले आहे ही बाब निंदनीय आहे. आणि म्हणून या प्रश्नावर चर्चा करण्याकरिता आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा. छत्रपती शिवराय हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या मनामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. आज आपण याठिकाणी आहोत ते केवळ छत्रपतींमुळेच असे मी मानतो. आणि म्हणून शासनाने या विषयाकडे किती दुर्लक्ष केले आहे हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. ज्यावेळी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण झाले त्यावेळी मी हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला होता. आपण या सहार आंतरराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण, सौंदर्यीकरण करीत आहात, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविणार असल्याची कुणकुण आहे. असा विषय उपस्थित झाला होता. परंतु सन्माननीय गृहमंत्र्यांनी त्या विषयी कोणत्याही प्रकारचे भाष्य करण्याचे टाळले ही खेदाची गोष्ट आहे. त्याचवेळी जर भाष्य झाले असते तर सर्वांच्या मनातील संदेह दूर झाला असता. आणि आज वर्तमानपत्रामध्ये ज्या उलट सुलट बातम्या येत आहेत त्या आल्या नसत्या. म्हणून माझी आपणास नम्रपणे विनंती आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पुतळयाशी शिवसेनेचे जिव्हाळयाचे नाते आहे तसेच ते सर्वांचेही आहे. परंतु तो पुतळा बसविण्यासाठी शिवसेनेने आंदोलन केले आहे.त्यामुळे तो पुतळा हटविला जाणार नाही या विषयी या सभागृहामध्ये ताबडतोब चर्चा झाली पाहिजे. आणि त्या चर्चेला आपण अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सहार येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची प्रतिष्ठापना झाली त्यावेळी महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची मान ताठ झाली. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा या आंतरराष्ट्रीय विमानतळासमोर बसविल्यामुळे परदेशामधून आलेल्या प्रत्येक पाहुण्यांना महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने ओळख छत्रपतींच्या पुतळयाला सामोरे जाऊन व्हावी, आणि महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जे आदराचे स्थान आहे याची जाणीव परदेशी लोकांना व्हावी अशाप्रकारे एका चांगल्या हेतूने उभारण्यात आला. जे.व्ही.के. या कंपनीला या विमानतळाच्या आधुनिकीकरणाचे काम देत असतांना शासनाने या गोष्टीचे भान ठेवले पाहिजे की, विमानतळाच्या आधुनिकीकरणाच्या कामाचे करारपत्र करीत असतांना छत्रपतींच्या पुतळयाला हात लावला जाणार नाही, तो हलविला जाणार नाही. परंतु हा पुतळा तेथून हटविण्याबाबत जे.व्ही.के. कंपनी इतक्या मग्रूरपणे विचार करीत असेल तर ती गोष्ट कदापि सहन केली जाणार नाही. एकदा पुतळा बसविल्यानंतर एखाद्या कंपनीच्या कामाकरिता तो पुतळा हटविणे हा छत्रपतींचा अपमान आहे. ही कंपनी छत्रपतींपेक्षा मोठी आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न झाला तर तो आपणा सर्वांसाठी लांच्छनास्पद राहणार आहे. आणि म्हणून हा अत्यंत महत्वाचा व गंभीर विषय आहे. . याबाबतीत सरकारने जे.व्ही.के. कंपनीबरोबर करारपत्र करतांना त्यामध्ये ज्या गोष्टी नमूद केल्या असतील त्यानंतर सुध्दा ही कंपनी ज्या हुकूमशाही पध्दतीने वाटचाल करीत आहे याची जाणीव महाराष्ट्राला झाली पाहिजे. आणि म्हणून महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि सन्मान कायम राखला गेला पाहिजे त्यादृष्टीने या विषयावर चर्चा झाली पाहिजे अशी मी विनंती करतो. आणि म्हणून माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला आहे, तो आपण मान्य करुन प्रश्नोत्तरांचा तास स्थगित करुन महाराष्ट्रातील जनतेला पहिल्यांदा स्पष्ट झाले पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीत तो पुतळा तेथील जागेवरुन हलविला जाणार नाही अशापध्दतीचे उत्तर या सभागृहामध्ये शासनाच्यावतीने येणे अपेक्षित आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य,आदरणीय श्री.दिवाकरजी रावते यांनी नियम 289 अन्वये सहार विमानतळाच्या परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे राज्य शिवप्रभूंच्या नावाने चालते. आपण मंत्रालयामध्ये पाऊल टाकल्यानंतर पहिले कोणाचे छायाचित्र दिसत असेल तर ते शिवप्रभूंचे आहे. पण त्या शिवप्रभूंच्या राज्यामध्ये राज्यकर्ते निष्क्रीय झाले किंवा राज्यकर्ते लाचार झाले आहेत असे दिसते. कोणती तरी एक कंपनी येते आणि ती आमच्या तोंडाला पाने पुसते आणि त्यांची तशी हिंमत होते, कारण राज्यकर्त्यांचे....आता मराठीतील तो शब्द वापरला तर कदाचित असंसदीय ठरेल. हे राज्यकर्त्यांच्या निष्क्रियतेचे द्योतक आहे असे म्हणावे लागेल. खरे म्हणजे मी दुसराच शब्द वापरला असता. मला माहिती नाही की, "नपुसंक" असा शब्द वापरणे योग्य होईल की नाही ? तर सभापती महोदय, हे नपुसंकत्वाचे लक्षण आहे. ही कोणती जी.व्ही.के.कंपनी आहे,त्यांची हिंमत कशी होते ? ती येथे कशी येते ? सभापती महोदय, आपल्याला यासंबंधातील इतिहास ज्ञात असेल असे मी समजतो. पूर्वी सहार विमानतळावर शिवप्रभूंचा अर्ध पुतळा बसवावयाचा होता, पण तो देखील पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवण्यात आला. त्यासाठी शिवसेनेला आंदोलन करावे लागले. तद्नंतर सुदैवाने दिल्लीमध्ये आमचे एन.डी.ए.चे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर माननीय पंतप्रधान श्री.अटल बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते या अश्वारुढ पुतळयाचे उद्घाटन झाले आणि "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे या विमानतळाचे नामकरण करण्यात आले. त्यावेळी या विमानतळाला शोभेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा तेथे बसविण्यात आला. पण आता ही जी.व्ही.के.कंपनी येथे आली आणि त्यांचे धारिष्ट्य एवढे आहे की, त्यांनी हा पुतळा दिसणार नाही अशा पध्दतीने सगळीकडे चारही बाजूने होर्ल्डींग्ज लावली आहेत. त्यामुळे हा अश्वारुढ पुतळा दिसेनासा झाला. याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या. मघाशी राज्यकर्ते असे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे सगळयांचेच आहेत. पण 50 वर्षे तुमचेच राज्य होते, मात्र दिल्लीमध्ये, येथील गल्लीमध्ये तुम्ही त्यांचे नाव देऊ शकला नाहीत. दिल्ली येथील संसदेमध्ये सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याचे धारिष्ट्य जाणत्या राजांना झाले नाही. पण त्याठिकाणी एन.डी.ए.चे सरकार आल्यानंतर लोकसभेचे अध्यक्ष माननीय श्री.मनोहर जोशी असताना तेथे शिवप्रभूंचा पुतळा बसविण्यात आला. पण त्यावेळी सुध्दा तेथे अनेक जाणते गेले नाहीत. त्या ......

. . . .सी-2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुतळयाच्या उद्‌घाटनाच्या वेळी त्यांना फेटा बांधण्याचे सुध्दा धारिष्ट्य झाले नाही. त्यामुळे तुम्ही असे सांगू नका की, आम्ही सर्वजण शिवप्रभूंना मानतो आणि शासनाचे कचखाऊ धोरण असल्यामुळे इतरांचे धारिट्य होत आहे. म्हणून आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या बाबतीत येथे प्रस्ताव मांडलेला आहे आणि आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत कोणतीही गोष्ट सहन करणार नाही. तुम्ही आता त्या पुतळयाला हातच लावून दाखवावा. तुम्ही संपूर्ण प्लॅनिंग केले. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संबंधात जी चर्चा झाली, त्यावेळी असा उल्लेख केला होता की, अशा प्रकारचा प्लॅन तयार होत आहे. पण त्याबाबतीत कोणीही उत्तर दिले नाही. म्हणून याठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याच्या समर्थनार्थ बोलताना मी नंतर बाकीच्या गोष्टी सांगेनच.परंतु आता यासंदर्भातील काही ठळक गोष्टी सांगितलेल्या आहेत. आम्हाला शासनाकडून अशी माहिती पाहिजे की, हा प्लॅन कोणी केला आहे ? त्या प्लॅनमध्ये शिवप्रभूंचा पुतळा हलविण्याच्या बाबतीत उल्लेख आहे की नाही ? तसे जर असेल तर शासन म्हणून तुमची भूमिका काय आहे ? ही भूमिका येथे स्पष्ट व्हावयास पाहिजे. महाराष्ट्रातील कोणताही स्वाभिमानी माणूस छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात अशा प्रकारची कोणतीही गोष्ट सहन करणार नाही एवढेच मी यानिमित्ताने सांगतो आणि या प्रस्तावाचे समर्थन करतो. धन्यवाद.

-----

. . . .सी-3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास जरी महत्वाचा असला तरी आता याठिकाणी माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि माझे नेते, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाबाबत आपले विचार मांडलेले आहेत. सभापती महोदय, आपण या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी परवानगी दिल्यानंर सर्वांना भाषण करण्याची संधी मिळेल. पण मला असे वाटते की, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. आज अशी स्थिती आहे की, कोणीही उठतो आणि काहीही करतो. याठिकाणी जी.व्ही.के.कंपनीची एवढी हिंमत झाली आहे की, त्यांनी विमानतळाला दिलेले "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ" हे नाव त्यांनी लहान केले आणि जी.व्ही.के. हे नाव मोठे केले. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे हा केवळ मराठी माणसाचा अपमान नाही तर सगळया हिंदूंचा, हिंदूत्वाचा अपमान आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आधुनिक इतिहासातील एकमेव महापुरुष असे होते की, भगवान श्रीकृष्णा नंतर अष्टावधानी असलेला "जाणता राजा" असे त्यांना म्हटले जाते. हा पुतळा तेथे उभा करण्याच्या बाबतीत जी योजना होती, त्याबाबतीत चर्चेच्या वेळी विस्तृतपणे उल्लेख करता येईल. मात्र सर्व जगामधून येणारे जे प्रवासी असतील, त्यांना या महापुरुषाचे दर्शन व्हावे आणि मग त्यांनी उत्सुकतेपोटी विचारावे की, या विमानतळाला ज्यांचे नाव दिलेले आहे, ते महापुरुष कोण आहेत ? खरे म्हणजे याबाबतीत गेल्या दोन-चार दिवसापासून वर्तमानपत्रामध्ये बातमी येत आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, त्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संबंधात झालेल्या चर्चेच्या वेळी या विषयाचा उल्लेख केला होता.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

यामधून जी ठिणगी किंवा आग निर्माण होऊ शकते, यामधून जो वणवा तयार होऊ शकतो याची माननीय मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील यांना जाणीव नाही. त्यांनी या संदर्भात माहिती घेतली पाहिजे. या विषयातील सर्वात महत्वाचा मुद्दा पुढे चर्चेला येईलच. विमानतळाचे आधुनिकीकरण व्हावे तसेच संपूर्ण जगातील एक चांगले विमानतळ तयार करता यावे या करिता शासनाने जेव्हीके या कंपनीशी एक करार केला होता. आम्ही कोठल्याही महापुरुषाचा पुतळा बाजूला हटवू अशी तेथील डायरेक्टरांची भावना आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा व भारताच्या अस्मितेपेक्षा आमची कंपनी मोठी आहे अशी जर कोणी हिंमत करीत असेल तर त्याला तेथेच ठेचून काढले पाहिजे. त्यांना कंपनीसकट अरबी समुद्रात नेऊन बुडविले पाहिजे. सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास लोकशाहीमध्ये महत्वाचा असला तरी देखील या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय हा देखील अत्यंत महत्वाचा आहे. संपूर्ण हिंदुत्वाला, सर्व भारतीयत्वाला व राजकीयत्वाला या कंपनीने आव्हान दिलेले आहे. तसेच या ठिकाणी महाराष्ट्र राज्याला कस्पटासमान समजले जात आहे. या महत्वाच्या विषयासंदर्भात आता चर्चा झाली नाही तर कंपनीचे डायरेक्टरांना वाटेल की यांनी माझे काय केले ? या सभागृहातीच चर्चेला कोण विचारते ? सभापती महोदय. मी आपणास सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ व काही सन्माननीय सदस्य एका हॉस्पिटलला भेट देण्याकरिता गेले होते त्यावेळी तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना अतिशय क्षुल्लक असे समजले. त्यामुळे शासनाने काही गोष्टी गांभीर्याने घेतल्या पाहिजेत. अन्यथा हे राज्य चालविणे कठीण होईल. तसेच या राज्यामध्ये जनतेला व तुम्हा आम्हाला स्वाभिमानाने जगता येणार नाही. महाराष्ट्रातील कोठलीही राष्ट्रवादी जनता, महापुरुषाचा अपमान सहन करणार नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्या संदर्भात आपण सभागृहात चर्चा करण्यास परवानगी द्यावी.धन्यवाद.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्याकरिता मी येथे उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सबंध महाराष्ट्राचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. हा विषय केवळ जिव्हाळयाचाच नसून तो विषय महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या अस्मितेचा व स्वाभिमानाचा देखील आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या विषयापेक्षा दुसरा कोठलाही विषय महत्वाचा नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे गौरव होते. त्यामुळे केवळ हिंदू धर्मापुरता हा विषय सीमित करणे योग्य ठरणार नाही. शिवाजी महाराज हे मध्ययुगातील पहिलेच धर्मनिरपेक्ष असे राजे होते. त्यांनी औरंगजेबाला असे लिहिले होते की, " राज्याला व राज्यकारभाराला कोणताही धर्म नसतो. राज्यकर्त्याने धर्माला आधारीत राहून काम करावयाचे नसते." अशा प्रकारे मध्ययुगामध्ये धर्मनिरपेक्षता ठणकावून सांगणारा हा पहिला राजा होता. त्यामुळे सबंध देशाचे गौरव असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान ज्या कंपनीने केलेला आहे त्या कंपनीची पाळेमुळे शोधून काढली पाहिजेत. सध्या महाराष्ट्रामध्ये खाजगीकरणावा स्वीकार केला जात आहे. त्याचा जाच किती तीव्र आहे हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. या देशातील अस्मितेची व गौरवाची प्रतिके देखील पायदळी तुडविली जात आहेत. त्यामुळे देशाची प्रतिके नष्ट करणे, कायदे पायदळी तुडविणे असा खाजगीकरणाचा अर्थ रुढ होत आहे. त्यामुळे या खाजगीकरणाला आपण पायबंद घातला पाहिजे. संसदीय कायदेमंडळाच्या अधीन राहूनच त्यांना कार्य करता येणार आहे. अन्यथा अशी वेळ येईल की, विधीमंडळ व संसद देखील त्यांना आंदण म्हणून द्यावे लागेल. अनेक खाजगी क्षेत्रातील कंपन्या त्यांना हवा तसा कायदा करु लागल्या आहेत. त्यामुळे निर्माण होणारे अनेक प्रश्न या निमित्ताने आपणा सर्वांच्या समोर आलेले आहेत. हा प्रश्न केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानाचा मुद्दा नसून देशाच्या अस्मितेचा व सार्वभौम जनतेच्या दृष्टीने देखील महत्वाचा आहे. या विषयासंदर्भातील शासनाची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचे मी समर्थन करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-------------

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे त्याकडे मी आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. येथे उपस्थित करण्यात आलेला प्रश्न हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा एखाद्या पक्षाचा नसून हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचे धाडस कोणी करण्याचे कारण नाही. हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे, प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारण्याची विनंती या ठिकाणी करण्यात आली आहे. ही विनंती मान्य करण्यास हरकत नाही. या संदर्भात कोणत्याही राज्यकर्त्यांनी चुकीचा अर्थ काढू नये. हा सर्वांच्या स्वाभिमानाचा व अस्तित्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न व्यक्तिगत नसून हा विषय राज्याशी संबंधित असल्यामुळे, या विषयाला न्याय देऊन या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो. धन्यवाद.

----------

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय शिवसेना नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव समोर मांडलेला आहे त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या संदर्भामध्ये एखादी कंपनी उपेक्षेची कशी भावना घेते यापुरताच हा प्रश्न मर्यादित नाही. आपल्या सदनाचे अनेक सन्माननीय सदस्य आणि अनेक नागरिक ज्यावेळी परदेशामध्ये जातात त्यावेळी त्या देशातील लोकांची सांस्कृतिकदृष्ट्या जिव्हाळ्याची असणारी प्रतिके आणि त्या संस्कृतीशी जोडला गेलेला एकूण इतिहास याबद्दल आलेल्या पर्यटकांना आणि सर्व नागरिकांना कशा पध्दतीने आदराची भावना आहे अशी त्याची आपली ओळख होत असते. म्हणून केवळ ज्या ठिकाणच्या एका पुतळ्याचा जसा तो प्रश्न आहे त्याचप्रमाणे स्थानिक भाषा, स्थानिक भूषा आणि स्थानिक भोजन आणि स्थनिक संस्कृती या सगळ्यांबद्दल या ज्या मोठमोठ्या कंपन्या आहेत त्यांची अशी भूमिका व्हावयास लागते की, आपण सगळे काही विकत घेतलेले आहे. आपण प्रत्येक गोष्ट विकत घेऊ शकतो इतकेच नव्हे तर लोकांच्या मनावर पाहिजे तसा अपमतान करुन, अतिक्रमण करुन, अधिक्रमण करुन सर्व गोष्टी विकाऊ आहेत अशा पध्दतीची भूमिका येणाऱ्या विविध कंपन्यांच्या माध्यमातून आपल्याला दिसून येते. शासनाने याबद्दल खूप जागरुक राहिले पाहिजे. यासंदर्भात सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्या जी.व्ही.के. कंपनीला व्यवस्थित समज देऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा चांगल्या प्रकारे लोकांच्या नजरेस दिसला पाहिजे. येणाऱ्या कोणत्याही पर्यटकांच्या मनामध्ये सुध्दा ही भावना आली पाहिजे की मी नतमस्तक होण्यासारखे भारतातील अस्मितेचे हे स्थान आहे. अशा प्रकारे ते कसे प्रोजेक्ट करावयाचे, कसे समोर आणावयाचे हे आपल्या समोरचे आव्हान आहे. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांसाठी मेघडंबरी बांधण्याचा प्रस्ताव होता. पुरातत्व विभागाने शिवभक्तांनी त्या ठिकाणी लावलेली मेघडंबरी काढून टाकली. शेवटी त्यामध्ये शासनाला हस्तक्षेप करावा लागला. शिव छत्रपतींच्या संदर्भात जी बेपर्वा भूमिका वेगवेगळ्या प्रकारे दिसून येते ती खरी खतरनाक किंवा धोकादायक आहे. त्यामधून आम्ही मराठी लोकांना पायपुसण्यासारखे वापरु शकतो अशा पध्दतीचा जो संदेश सातत्याने दिला जातो याबद्दल आमच्या भावना तीव्र आहेत. छत्रपतींचा कोणीही अपमान सहन करु शकत नाही असे म्हणणे आणि प्रत्यक्ष कृती करणे या दोन्ह गोष्टींमध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

जर विसंगती दिसावयाची नसेल तर या संपूर्ण प्रकरणासाठी प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या मुद्यावर चर्चा घेऊन शिवछत्रपतींच्या अस्मितेचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची काय राजकीय इच्छाशक्ती आहे हे दाखविण्याची एक संधी आहे असे मला वाटते. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेल्या प्रस्तावाचे मी अनुमोदन करते आणि आपण याबाबत गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करते.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि जिव्हाळ्याचा अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला त्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना धन्यवाद देतो. खरोखरच केवळ राज्यापुरते नव्हे, केवळ मराठी माणसांकरिता नव्हे, केवळ हिंदूंकरिताच नव्हे तर खऱ्या अर्थाने या देशामध्ये हिंदवी स्वराज्याची संकल्पना राबवून सर्व धर्मांना समान आणि माणुसकीची वागणूक देणारा हा महाराजा सगळ्या जगाला वंदनीय आहे. म्हणून मुंबईमध्ये जरी या विमानतळाचे नुतनीकरण होत असले आणि खाजगी कंपनीला हे काम दिलेले असले तरी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचा सन्मान आणि त्या पुतळ्याचे तेथील स्थान हलविता कामा नये अशी भूमिका आपण सर्वांनी या ठिकाणी घेणे अत्यंत गरजेचे आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले ते खरे आहे की, माननीय केंद्रीय मंत्री असलेले बॅ. अंतुले साहेब हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी सर्वप्रथम जर कोणती गोष्ट केली असेल तर मंत्रालयामध्ये प्रवेश करतो त्या ठिकाणी अधिकृत मान्यताप्राप्त असलेली छत्रपती शिवाजी महाराजांची जी प्रतिमा, कोल्हापूरचे श्री. कांबळे यांनी उत्तम प्रतिमा तयार केली आणि त्या फोटोचे अनावर बै. ए. आर. अंतुले यांनी केले. त्याचा जो उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी केला तो बरोबर आहे. संयुक्त महाराश्ट्र झाल्याबरोबर प्रतापगडावर छत्रपती शिवरायांचा पुतळा बसविण्याकरिता त्यावेळचे पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरु त्या ठिकाणी आले होते.. आणि महाराष्ट्रातून व देशातून लक्षावधी नागरिक छत्रपतींना वंदन करण्याकरिता पंडित जवाहरलाल नेहरु आणि स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या साक्षीने प्रतापगडावर हजर झाले याचेही स्मरण या निमित्ताने तुम्ही आम्ही सर्वांनी केले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार......

एवढेच नव्हे तर मी नम्रतापूर्वक आठवण करुन देऊ इच्छितो की, ज्या स्थानकाचे पूर्वी व्ही.टी.म्हणजे व्हिक्टोरिया टर्मिनस असे नाव होते, त्या रेल्वे स्थानकाचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असे नामकरण आमचे मित्र पुण्याचे खासदार, हे रेल्वे राज्यमंत्री श्री.सुरेश कलमाडी होते, त्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे पुणे येथील बालेवाडी आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाला देखील छत्रपती शिवरायांचे नाव देण्याचे काम त्यावेळच्या सर्व नेते मंडळींनी केलेले आहे. त्यामुळे छत्रपती शिवरायांबद्दल तुमच्या, आमच्या मनामध्ये अतिशय आदर आहे. संसदेच्या परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आला त्यावेळी सर्व मान्यवर उपस्थित होते. विद्यमान मुख्यमंत्री माननीय श्री.विलासराव देशमुख हे प्रथम 1999 साली मुख्यमंत्री झाले होते. छत्रपती शिवरायांची आग्र्याहून सुटका झाली होती हे आपणा सर्वांना विदित आहेच. माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी तातडीने कोणते महत्वाचे काम केले असेल तर त्यांनी आग्र्याला जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा बसविण्याचे काम केले आहे. आपल्या सर्वांच्या मनात छत्रपती शिवरायांबद्दल आदराचे स्थान आहे. मग तो कोणत्याही पक्षाचा, राजकीय धर्माचे असो, त्यांची अस्मिता किंवा त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे चरित्र हे संकुचित असता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. कोणत्याही संस्थेचे खाजगीकरण करीत असताना, नुतनीकरण करताना त्या जागेची शोभा जरुर वाढवावी. सभापती महोदय, मी एक उदाहरण देऊ इच्छितो. नागपूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा पुतळा पूर्वीच्या काळात बसविला होता. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना उड्डाण पुलासाठी त्यांनी तो पुतळा सन्मानाने हलविला आणि त्या जागेचे उत्तमरित्या सुशोभिकरण केले आहे. अशाप्रकारची गरज असेल तर गोष्ट वेगळी आहे. पण गरज नसताना छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्या विमानतळावरुन हटविण्याचे काम कोणालाही करु देता कामा नये आणि अवघा महाराष्ट्र या भूमिकेशी एकरुप असला पाहिजे अशी नम्र भावना व्यक्त करुन या चर्चेला मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील आणि या देशातील सर्व जनतेचे आदरणीय आणि नितांत श्रध्देचे विषय आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

प्रा.सुरेश नवले.......

एतद्देशियांचे राज्य उभे केले. हिंदवी स्वराज्याची उभारणी करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वधर्मीयांचे राजे होते. पण काही लोक शिवाजी महाराजांचे नाव घेतात. नाव महाराजांचे आणि काम कसायाचे, अशाप्रकारचे महाराष्ट्रात राजकारण करणारी काही मंडळी आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय हा हिंदूंच्या महाश्रध्देचा आहे, मुस्लीम बांधवांच्या मनात श्रध्देचा विषय आहेत...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांनी प्रस्तावातील विषय नियम 289 मध्ये कसा बसतो तेवढयापुरते बोलावे. या चर्चेला मी परवानगी देईन त्यावेळी पुन्हा आपण विस्ताराने बोलावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांना 'निश्चयाचा महामेरु, बहुतजनासी आधारु, अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी' असे म्हटले जाते. पण काही लोकांना माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित योगी कळत नसतील तर तो प्रश्न अलाहिदा आहे.(अडथळा) सभापती महोदय, शिवाजी महाराजांचे नाव मुखाने घ्यावयाचे, प्रत्यक्षात काम मात्र कसायाचे करावयाचे, हा अनुभव मी 20 वर्षे घेतलेला आहे.

**सभापती** : कसाई हा शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारला छत्रपती शिवाजी महाराजांविषयी नितांत श्रध्दा आहे. कोण ही जीव्हीके कंपनी ? छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्याचे काम महाराष्ट्र शासन कदापि करु देणार नाही अशी माझी खात्री आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देखमुख हे तडफदार आहेत. सभापती महोदय, या मुद्याचा विस्तार करीत असताना मला हेही सांगावयाचे आहे की, नागपूर येथील उड्डाण पुलाचे बांधकाम करताना महात्मा गांधीचा पुतळा, झांशीच्या राणीचा पुतळा कोणी हलविला ?..(अडथळा) .. मुद्दा हा आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा हलवू देता कामा नये..

**सभापती** : हा जो विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला तो नियम 289 चा विषय कसा होतो हे माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय या ठिकाणी आणलेला आहे, त्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जेवढी नितांत श्रध्दा आहे तेवढीच श्रध्दा या शासनाच्या आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये आहे. माझीसुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांप्रती नितांत श्रध्दा आणि आदर आहे म्हणून या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याला मी जाहीर पाठिंबा देतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन नियम 289 खाली छत्रपती शिवाजी महाराजांचा जो अवमान होऊ घातला आहे त्या संदर्भात चर्चा करावी अशी आम्ही विरोधी पक्षातर्फे मागणी केलेली आहे. कुणावर आरोप वा प्रत्यारोप करणे हा या मागील उद्देश नाही. मूळ उद्देश हा आहे की, छत्रपती शिवप्रभूंच्या प्रतिष्ठेला कोठलाही धक्का लागणार नाही याची जबाबदारी या राज्य सरकारची तसेच या राज्यात आणि देशामध्ये राहाणा-या सर्व देशप्रेमी जनतेची आहे. जीव्हीके कंपनीने विमानतळाचे सौंदर्यीकरण करताना आणि इतर ज्या जबाबदा-या घेतलेल्या आहेत त्या पार पाडतांना छत्रपती शिवप्रभूंचे लिहिलेले जे नामफलक आहेत त्यांचे स्वरुप छोटे करुन त्याठिकाणी त्यांची प्रतिमा कशी झाकली जाईल अशा प्रकारचा प्रयत्न चालविलेला आहे. या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधून या विषयावर चर्चा घ्यावी आणि चर्चेअंती जो निर्णय होईल त्याची अंमलबजावणी व्हावी इतक्याच मर्यादित उद्देशाने हा विषय याठिकाणी उपस्थित केलेला आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

ज्यांचा या प्रस्तावाशी काही संबंध नाही ते राणा भीमदेवी थाटात भाषणे करीत आहेत. जो विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला त्यावर न बोलता विषयाला फाटे फोडून चर्चा करणे इष्ट नाही. माझी आपणास विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर आपण चर्चा घ्यावी. ती चर्चा केव्हा घ्यावयाची हे आपण ठरवावे. या जीव्हीके कंपनीला कोणत्या प्रकारे पायबंद घालणार आहात, तिला कसा प्रतिबंध करणार आहात यासंदर्भातील निश्चित स्वरुपाची उपाययोजना सभागृहासमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, मी लोकसभेमध्ये असताना या विमानतळावर छत्रपती शिवप्रभूंचा पुतळा बसविण्यासाठी तेथे विषय मांडला होता. श्री. राम नाईक आणि अन्य अनेक खासदारांनी या विषयावर चर्चा केली होती आणि त्यानंतर विमानतळावर तो पुतळा विराजमान झालेला आहे. त्याची प्रतिष्ठा राखणे हे आपले आणि महाराष्ट्रातील सर्व जनतेचे कर्तव्य आहे. त्या पुतळयाला कुठेही बाधा येऊ नये एवढा मर्यादित उद्देश या प्रस्तावाच्यामागे आहे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या सदनात सन्माननीय सदस्यांनी नियम 289 चा प्रस्ताव दिला आहे, त्या प्रस्तावातील विषय नियम 289 चा कसा होतो, या बाबतीत दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या बाबतीत त्यांनी आपले मत व्यक्त केले तर बरे होईल असे मला वाटते.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो विषय उपस्थित केला आहे तो अतिशय महत्वाचा आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा हा विषय आहे त्याबद्दल कोणाच्या मनात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु या विषयाच्या बाबतीत सभागृहात चर्चा का घ्यावी याबाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. यापेक्षा सन्माननीय सदस्यांकडे काही वेगळे मुद्दे असतील असे मला वाटत नाही. मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ज्या ठिकाणी बसविलेला आहे, तो पुतळा हलविण्याच्या संदर्भामध्ये सदरहू कंपनीने शासनाकडे कोणत्याही प्रस्ताव सादर केलेला नाही. ही चर्चा मध्येच कशी उपस्थित झाली याचीच खरी म्हणजे आम्हाला माहिती नाही. या ठिकाणचा पुतळा हलविण्यासंबंधी कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. एखाद्या ठिकाणी पुतळा बसवावयाचा असेल वा तो हलवावयाचा असेल तर त्यासाठी शासनाची रितसर परवानगी घ्यावी लागते. याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाची परवानगी घ्यावी लागते. गृह विभागाची परवानगी घ्यावी लागते. विमानतळासमोरील शिवछत्रपतींचा पुतळा हलविण्यासंबंधी एअर पोर्ट ॲथॉरिटी वा जी.व्ही.के.कंपनीकडून राज्य शासनाकडे प्रस्ताव आलेला नाही. हा प्रश्न कदाचित वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने हा सभागृहात उपस्थित झाला असावा किंवा आपल्याला काही माहिती मिळालेली असेल त्या अनुषंगाने हा विषय सभागृहात उपस्थित झाला असेल. या ठिकाणचा पुतळा हलविण्याचा कोणताही प्रस्ताव शासनापुढे नाही, तशी कोणी विनंती देखील शासनास केलेली नाही. त्यामुळे तेथील पुतळा हलविण्याला मान्यता देण्याचा देखील प्रश्न येत नाही. खरे म्हणजे हा विषयच उपस्थित होऊ शकत नाही. हा पुतळा हलविण्यात येऊ नये असा जो विषय सभागृहात उपस्थित केला गेला त्यास दोन्ही बाजुच्या सदस्यांनी सहमती दाखविली आहे. त्या ठिकाणच्या पुतळयाचे अजून चांगल्या प्रकारे सुशोभिकरण करणे, त्या पुतळयास अधिक संरक्षण देणे इत्यादी कामे तेथे होत आहेत. तेथील विमानतळ आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून विकसित होत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

बाहेरच्या देशातून हजारो, लाखो प्रवासी येतात. त्यांना दर्शनी भागात तो पुतळा बघावयास मिळतो. आज तरी हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्यांकडून या विषयासंबंधीची माहिती कशी आली ? कोठून आली ? याची मला माहिती नाही. सदरहू ठिकाणचा पुतळा हलविण्याचे संदर्भामध्ये राज्य सरकारला परवानगी देण्याचे काहीही कारण नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयासंबंधी अतिशय चांगल्या भावना व्यक्त केल्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. विमानतळाच्या परिसरात जी.व्ही.के.कंपनीने काम सुरु केले आहे. शिवरायांचे नाव विमानतळावर लावलेले असताना सदरहू कंपनीने आपले नाव मोठे करुन लावले होते. यासंदर्भात आंदोलन सुरु झाले, त्यानंतर सदर कंपनीने ते नाव नंतर काढून टाकले. महाराष्ट्रातील जनतेला या सभागृहाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आश्वासन द्यावे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये विमातळासमोरील शिवरायांचा पुतळा हलविला जाणार नाही. तसे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांकडून महाराष्ट्रातील जनतेसाठी दिले जाईल काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात आश्वासन दिले तर या विषयाची चर्चा उपस्थित करण्याची गरज भासणार नाही.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, त्या ठिकाणचा शिवरायांचा पुतळा हलविण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव शासनापुढे आलेला नाही. त्यामुळे त्या प्रस्तावास मान्यता देण्याचा, तसेच तो पुतळा हलविण्याच्या संदर्भात सरकार कधीही परवानगी देणार नाही.

--------------------

3...



ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री. शिगम 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

## मुंबईतील लोकमान्य टिळक पालिका रूग्णालयात मृतदेहाच्या मुत्रपिंडाची व यकृताची विक्री होत असल्याबाबत

**(१) * ३७२८० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री. शरद रणपिसे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शिव लोकमान्य टिळक पालिका रूग्णालयाच्या शवागरात ठेवण्यात आलेल्या बेवारस मृतदेहांची मूत्रपिंडे व यकृते काढून ती खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना लाखो रूपयांना विकण्याचा धंदा सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २००७ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मूत्रपिंडे व यकृताचा काळा धंदा करणाऱ्यांविरूध्द कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टापे,श्री.विलासराव देशमुख** : (१) अशा प्रकारचे वृत्त एका दैनिक वृत्तपत्रात दिनांक ९.८.२००७ रोजी प्रसिध्द झाले होते.

(२), (३) व (४) या प्रकरणी महानगरपालिकेकडून चौकशी करण्यात आली असून, मृत देहातील यकृते व मूत्रपिंडे काढून त्यांची विक्री करण्यात आली नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या बाबतीत मला दोन मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे असे उत्तरात दिलेले आहे. ही चौकशी कोणी केली ? या चौकशी अहवालात काय आढळून आले यासंबंधीची सविस्तर माहिती देण्यात येईल काय ? अलिकडच्या काळात दिल्ली जवळील गुडगाव येथे देशव्यापी आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट उघडकीस आले आहे. त्यात डॉ.संतोष राऊत, डॉ.अमितकुमार यांचा समावेश असल्याचे आढळून आले. डॉ. अमितकुमार यांना किडनी रॅकेट प्रकरणी 1994 मध्ये अटक झाली होती... यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ KTG/ 12:40

ता.प्र.क्र. 37280 पुढे सुरु...

श्री. संजय दत्त...

सभापती महोदय, किडनी रॅकेटचा धंदा करणारा डॉ. अमितकुमार याचेही या घटनेशी लागेबांधे असण्याची शक्यता आहे. त्याबाबतीत सुध्दा चौकशी होणे आवश्यक आहे. म्हणून या एकूणच प्रकरणाबाबत सरकारने कोणती दक्षता घेतली आहे किंवा घेणार आहे याची माहिती शासन देईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, याप्रश्नाच्या संदर्भात चौकशी झालेली आहे. लोकमान्य टिळक रुग्णालयाचे डीन यांनी फॉरेन्सिक मेडीकल डिपार्टमेंटचे अधिकारी, शवागारातील कर्मचारी,सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे चौकशी केली आणि चौकशीचा अहवाल एवढाच आहे की, अशा पध्दतीची कोणती घटना घडलेली नाही असे स्पष्टपणे चौकशी अहवालातून डीनच्या निदर्शनास आलेले आहे. दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी डॉ.अमितकुमार यांच्याबाबतीत उपस्थित केला आहे. परंतु मूळ प्रश्नाशी हा विषय निगडीत होत नाही. तरीसुध्दा सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्यानुसार किडनी रॅकेट आहे काय यासंबंधीची जरुर चौकशी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मेलेल्या माणसाचे मुत्रपिंड जरी ट्रान्सप्लान्ट होत नसले तरी मेलेल्या माणसाचे यकृत (Cadaver) ट्रान्सप्लान्ट होऊ शकते. तसे प्रकार या रुग्णालयात होत असतील तर त्यावर शासनाने लक्ष ठेवावे. पोस्टमार्टेम झाल्यानंतर यकृत,किडनी हे अवयव काढले जातात. या हॉस्पीटलमध्ये पोस्टमार्टेमचे अनेक अहवाल पेंडींग आहेत. दोन अधिकाऱ्यांमधील भांडणामुळे 6/6 महिने किंवा 1/1 वर्ष सुध्दा पोस्टमार्टेमचे अहवाल मिळालेले नाहीत. त्यामुळे क्रिमिनल केसेस पुढे प्रोसेस करण्यासाठी विलंब लागतो. याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ? मी यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मेलेल्या माणसाचे यकृत ट्रान्सप्लान्ट होऊ शकते त्याबाबत शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी यकृत ट्रान्सप्लान्ट होऊ शकते असे सांगितले. फॉरेन्सिक लॅबोरेटरीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, मेलेल्या माणसाचे लीव्हर आणि किडनी हे दोन्ही ऑर्गन अजिबात ट्रान्सप्लान्ट होत नाहीत.

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37280 पुढे सुरु....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, मेलेल्या माणसाचे यकृत ट्रान्सप्लान्ट होऊ शकते. माझ्या एका मित्राने महाराष्ट्रात यकृताचे ट्रान्सप्लान्ट होऊ शकत नसल्यामुळे साऊथमध्ये जाऊन यकृत ट्रान्सप्लान्टचे ऑपरेशन करुन घेतले असल्यामुळे मी हे जबाबदारीने सांगत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय आरोग्य खात्याशी संबंधित आहे. यासंदर्भात डॉक्टरच उत्तर देऊ शकतात. डॉक्टरांनाच ही भाषा समजेल.

**सभापती** : सामुदायिक जबाबदारी म्हणून मंत्रिमहोदय उत्तर देत आहेत. एखाद्या मंत्र्यांचे उत्तर दुसऱ्या मंत्र्यांने दिले तर वावगे होईल असे मला वाटत नाही. मुंबई महानगरपालिकेचे हे हॉस्पीटल आहे त्यामुळे राज्यमंत्री(नगरविकास) हे उत्तर देत आहेत.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, महानगरपालिकेचा विषय असल्यामुळे नगरविकास खात्याकडे तो आलेला आहे. यकृत ट्रान्सप्लान्टच्या संदर्भात जी माहिती मी घेतली ती सदनामध्ये सांगितली. याठिकाणी पोस्टमार्टेमचे रिपोर्ट देण्यासाठी डिले होत असेल तर निश्चितपणाने रुग्णलयाचे डीन यांना सूचित केले जाईल. सध्या 50 पोस्टमार्टेमचे रिपोर्ट प्रलंबित आहेत.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 12:45

श्री.राजेश टोपे............ ता.प्र.क्र.37280......

हे रिपोर्ट काही ठिकाणी पदे रिक्त असल्यामुळे पेंडिंग आहेत. मी ताबडतोब डीन आणि ॲडिशनल कमिशनरना सूचना देईन की, अशा पध्दतीचे पोस्टमार्टेम अहवाल ताबडतोब पाठविले पाहिजेत. त्या संदर्भातील कारवाई तातडीने व्हावी अशा सभागृहाच्या भावना आहेत हे लक्षात घेऊन तातडीने कार्यवाही करावी असे कळविले जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सभापती महोदय, मी विनम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो की, कोणत्याही विभागाचे मंत्रीमहोदय जर सदनामध्ये उपस्थित राहणार नसतील तर प्रथा आणि परंपरेप्रमाणे त्यांनी आपल्याला लेखी स्वरुपात कळविले पाहिजे. त्यानंतरच इतर विभागाच्या मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले तर ते समर्थनीय ठरते. अन्यथा संबंधित मंत्रीमहोदय सदनात उपस्थित असताना इतर विभागाच्या मंत्रीमहोदयांनी सामुदायिक जबाबदारी म्हणून उत्तर देणे हे कोणत्या नियमात बसते हे मला माहिती नाही. परंतु ही पध्दत योग्य नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

**सभापती** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, जो प्रश्न चर्चेला आलेला आहे तो महानगरपालिकांच्या रुग्णालयाशी संबंधित आहे. ज्या ज्यावेळी एखाद्या विभागाचे मंत्रीमहोदय त्यांच्या विभागाचे कामकाज अन्य मंत्रीमहोदयांकडे सोपवितात, त्यावेळी जरुर पीठासीन अधिका-यांना लेखी स्वरुपात कळविले जाते. हा प्रश्न नगरविकास विभागाशी संबंधित आहे.

श्री.अरविंद सावंत : काल गृह विभागाचे माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित असतानाही त्यांच्या उपस्थितीत माननीय महसूलमंत्र्यांनी गृह खात्यासंबंधी उत्तर दिले होते. हे गैर आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिकांच्या रुग्णालयाशी संबंधित असल्यामुळे नगरविकास विभागाकडे सोपविण्यात आला आहे. सध्या आरोग्यविषयक किडनी, यकृत यासारखे अवयव चोरुन नेण्याच्या गुन्हेगारी स्वरुपाच्या घटना घडत आहेत. नागपूर, पुणे व मुंबई येथील शासकीय रुग्णालये तसेच महापालिका रुग्णालयातून छोटी अर्भके पळवून नेण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. म्हणून नगरविकास विभाग, गृह विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या तीनही विभागांच्या समन्वयाने एक टास्क फोर्स नगरविकास विभाग स्थापन करील काय? मुंबई, पुणे, नाशिक शहरामध्ये अशा अवयव व अर्भके चोरणाऱ्या टोळ्या धुमाकूळ घालत आहेत. अवयव ट्रान्सप्लान्टबरोबर अर्भके पळविणे,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे............ ता.प्र.क्र.37280......

हॉस्पिटलमध्ये वेगवेगळया प्रकारचे अत्याचार, साहित्याच्या संदर्भातील फसवणूक असे गुन्हे घडत आहेत. त्या संदर्भात टास्क फोर्सकडून समन्वय ठेवला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी डॉ.अमितकुमार यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. एका बाजूला आपण म्हणता, डाटाबेस उपलब्ध आहे. या डाटाबेसचा उपयोग गुन्हेगारी थांबविण्यासाठी करणार नसाल, गुड गव्हर्नन्ससाठी उपयोग करणार नसाल तर असा टास्क फोर्स खास करुन महापालिका रुग्णालयात जे गुन्हे घडतात ते रोखण्याच्या दृष्टीकोनातून समन्वय साधणारा टास्क फोर्स नगरविकास विभाग स्थापन करील काय?

श्री.राजेश टोपे : चांगली सूचना आहे. निश्चितप्रकारे तीनही विभागांच्या सचिवांशी चर्चा करुन अशा प्रकारचा टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ KTG/ KGS/ 12:45

**शासकीय अंबर दिव्याचे वाहन खंडणी प्रकरण**

**(२) * ३९३५७ श्री.केशवराव मानकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अंबर दिव्याचे वाहन खंडणी प्रकरणात यवतमाळ जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी परवेजखॉं तडवी यांना राज्याच्या परिवहन आयुक्तांनी प्रथमदर्शनी दोषी मानून सक्तीच्या रजेवर पाठविले असतांनाही दिनांक १ जानेवारी, २००८ पासुन श्री. तडवी हे कार्यालयात रूजू झाले असल्याचे माहे जानेवारी, २००८ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात श्री.तडवी यांची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) यवतमाळ येथील तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची आता बदली करण्यात आली असून, परिवहन आयुक्त कार्यालयात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात आलेली आहे. तथापि, ते अद्यापी तेथे रुजू झालेले नाहीत.

(२) व (३) सदर अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यांच्या विरुध्द दोषारोप पत्र तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, या प्रश्नाची माननीय मुख्यमंत्र्यांना कल्पना आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, ' तत्कालीन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ यांना सक्तीच्या रजेवर पाठविल्यानंतर परिवहन आयुक्त कार्यालयात बदली केली आहे, परंतु ते रुजू झाले नाहीत. विभागीय चौकशी चालू आहे.' प्रश्न असा आहे की, परिवहन कार्यालयाचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरलेले आहे. एवढा मोठा गुन्हा घडल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याला निलंबीत केले जाईल काय? विभागीय चौकशीचा अहवाल किती कालावधीत पटलावर ठेवणार आहात?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39357.....

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, या अधिकाऱ्याला निलंबित करता येणार नाही. पण त्या अधिकाऱ्याविरुध्द लवकरात लवकर विभागीय चौकशी करण्यासंबंधीचे आदेश देण्यात येतील.

श्री. जगदीश गुप्ता : महोदय, या अधिकाऱ्याबद्दल अनेक गंभीर स्वरुपाच्या तक्रारी संपूर्ण परिसरात आहेत. हा अधिकारी रात्रीच्या वेळी आपली स्वत:ची लाल दिव्याची गाडी हरास करीत होता आणि जो जास्त पैसे देत होता तो ती गाडी वापरुन रस्त्यावर चालणाऱ्या वाहनांकडून खंडणी वसूल करण्याचे काम होत होते. येथे मात्र या अधिकाऱ्याला वाचविण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. मा. मुख्यमंत्री यवतमाळच्या दौऱ्यावर असताना त्यांनी सुध्दा पत्रकारांना सांगितले होते की, या तडवी नावाच्या अधिकाऱ्याबद्दलची माहिती माझ्याकडे असून त्याच्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल. तरी देखील त्या अधिकाऱ्यावर कारवाई न करता त्याची फक्त बदली करण्यात येत आहे. म्हणून या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करुन त्याची तातडीने चौकशी करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, दि. 7.10.2007 ला हा गुन्हा घडला आणि दि. 18.10.2007 ला या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. त्यानंतर त्याची चौकशी सुरु झाली. पोलीस अधीक्षकांनी ही चौकशी केली असून त्या चौकशीत सदर अधिकारी दोषी आढळून न आल्यामुळे त्याची बदली टी.सी. ऑफिसमध्ये करण्यात आली. चौकशी पोलीस अधिकाऱ्याचे म्हणणे असे आहे की, "सदर खंडणी प्रकरणात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा तसेच त्यांच्या कार्यालयातील इतर अधिकारी यांचा सहभाग असल्याचे आढळून आले नाही. तरी देखील या गुन्ह्याचा सखोल तपास सुरु असून तपास पोलीस निरीक्षक वडनेरे हे करीत आहेत." असा रिपोर्ट पोलीस अधीक्षकांनी दिला आहे. या प्रकरणात हा अधिकारी दोषी नसल्याचे आढळून आल्यावरच या अधिकाऱ्याची उपरोक्त ठिकाणी बदली केली.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही बाब एकदम गंभीर आहे. कारण याचा अनुभव खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. संजय राठोड हे रस्त्याने जात असता त्यांनाही आला आहे. रस्त्याने जात असताना अचानक ट्राफिक जाम झाली म्हणून ते चालत चालत पुढे गेले असता त्यांना पिवळया दिव्याची गाडी उभी करुन हफ्ते वसूल करण्याचे काम चालले असल्याचे दिसून आले. सन्माननीय सदस्य श्री. संजय राठोड यांनी ताबडतोब डी.वाय.एस.पी. यांना फोन

......2

ता. प्र. क्र. 39357....... श्री. दिवाकर रावते .......

केला असता त्यांनी सांगितले की, मी सुध्दा याच रस्त्यावर मागे उभा आहे. तेही पुढे आले आणि त्यांनी ती गाडी जप्त केली व या अधिकाऱ्याला झोपेतून उठविले आणि विचारले की, तुझी गाडी येथे कशी, त्यावर तो अधिकारी म्हणाला की, माझी गाडी चोरीला गेली. त्यासंबंधीचे कागदपत्रं मात्र दुसऱ्या दिवशी चार वाजता तयार करण्यात आले. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, एखाद्या पोलिसाची जीप गेली, रिव्हॉल्वर गहाळ झाला अथवा पट्टा गेला तरी त्या पोलिसावर ऑन द स्पॉट कारवाई करण्यात येते. मग येथे तर या अधिकाऱ्याची गाडी चोरीला गेली तरी त्याला निलंबित न करता पुन्हा कामावर रुजू करुन घेण्यात येते. तो अधिकारी म्हणतो की, "मी वरपर्यंत व्यवस्था केलेली असल्यामुळे माझे काहीही वाकडे होत नाही" म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे गाडी चोरीला गेली तरी त्या अधिकाऱ्याला निलंबित का करीत नाहीत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, या प्रकरणात तडवी या अधिकाऱ्याचा संबंध नाही.

श्री. दिवाकर रावते (बसून) : तेथे जातीय वाद आहे.....

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, दोषी असला तर कोणत्याही अधिकाऱ्याला निलंबित करण्यास मी मागे पुढे पाहणारा माणूस नाही. तसेच कोणाच्या दबावाखाली चुकीचे काम करणारा सुध्दा नाही. एस.पी. ने जो रिपोर्ट दिला आहे त्यामध्ये या अधिकाऱ्याचा कुठल्याही प्रकारचा दोष नाही म्हणून त्याला निलंबित करता येणार नाही.

श्री. जगदीश गुप्ता : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एस.पी. चा उल्लेख केला म्हणून मी माहिती देऊ इच्छितो की, ही गाडी चोरीला गेली.........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 39357......

श्री. जगदिश गुप्ता ....

यासंदर्भातील रिपोर्टसुध्दा पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला नव्हता. वरच्या अधिका-याचे प्रेशर आल्यामुळे दुस-या दिवशी सायंकाळी 4.00 वाजता रिपोर्ट दाखल करण्यात आला. मी सुरुवातीला हाच प्रश्न विचारला होता परंतु माझ्या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांकडून उत्तर आले नाही. माननीय मंत्रीमहोदयांकडून अधिका-यांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे संबंधित अधिका-याचे त्वरित निलंबन करुन या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी केली जाईल काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, याप्रकरणात चार लोक दोषी असून त्यामध्ये कार्यालयातील एक शिपायाचा सुध्दा समावेश आहे. अधिकारी घरी गेल्यानंतर अधिकारी गाडी आपल्या घरी घेऊन जात नसतात. अधिका-यांची गाडी कार्यालयातच ठेवली जात असते. या प्रकरणात सुध्दा अधिकारी घरी गेल्यानंतर त्याची गाडी कार्यालयातच होती तसेच त्या गाडीची चावी सुध्दा कार्यालयातच होती. त्यामुळे या प्रकरणात आरटीओचा काही संबंध येत नाही. अधिकारी दोषी असतील तर त्यांना निश्चित सस्पेंड केले जाईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात एकूण दोन घटना आहेत. पिवळा दिवा असलेल्या एका अधिका-याच्या वाहनाची चोरी झालेली असून ते वाहन रस्त्यावर उभे करुन हप्ता वसुली केली जात होती व दुसरी घटना म्हणजे चोरी झालेल्या वाहनाची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये नोंदवण्यात आली नव्हती अशा दोन घटना या प्रकरणात आहेत. त्यामुळे या दोन्ही घटनांच्या संदर्भात एसीपी मार्फत चौकशी करण्यात येईल.

-------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील कोळीवाड्यांच्या पुर्नविकास होण्याबाबत**

**(३) * ३७९३९ श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कोळीवाड्यांच्या पुर्नविकासासाठी अधिक एफएसआय आणि सीआरझेड मधून सवलत देण्यासाठी वारंवार होणाऱ्या मागणीबाबत शासनाने काही धोरण निश्चित केले आहे काय,

(२) असल्यास, याबाबत काय कार्यवाही झाली आहे,

(३) कोळीवाड्यांतील पारंपारीक व्यवसाय व मच्छीमार यांच्यासाठी संरक्षण व आधुनिकीकरण करण्यासाठी शासनाने विकास करण्याचे ठरवले आहे काय ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) ते (३) बृहन्मुंबई क्षेत्रातील गावठाणासाठी प्रस्तावित केलेल्या नियमाच्या धर्तीवर कोळवाड्यांच्या विकासासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे त्यावर विचार विनिमय सुरु आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबईमध्ये एकूण २७ कोळीवाडे असून त्यांचा पारंपारिक व्यवसाय आता संकटात आल्यामुळे तेथील लोक सुध्दा संकटात आलेले आहेत.या कोळीवाडयांना सुरक्षित ठेवून त्यांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. संबंधित कोळीवाडयांचा विस्तार जागेअभावी होऊ शकत नाही. त्यामुळे मुंबईतील कोळीवाडयांच्या पुनर्विकासासाठी अधिक एफएसआय देण्यात यावा यासंदर्भात त्यांनी शासनाकडे प्रस्ताव सुध्दा दिलेला आहे. त्यामुळे या प्रस्तावाला आपण परवानगी देणार आहोत काय? या कोळीवाडयांना स्वयंविकासाचे अधिकार दिले जाणार आहेत काय? तसेच पायलट प्रोजेक्ट म्हणून धारावी-कोळीवाडयांचा विकास केला जाणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई मध्ये सुध्दा ८८ गावठाणे असून त्यामध्ये २० कोळीवाडे आहेत. मुंबई आणि मुंबईच्या उपनगरातील गावठाणांना एक्स्ट्रा एफएसआय मिळावा, रोडच्या संदर्भात शिथीलता मिळावी म्हणून राज्य शासनाने गावठाणासाठी ३७(१)(अ) संदर्भात डीसीआर मध्ये बदल करण्यासंबंधी लोकांकडून हरकती आणि सूचना मागविल्या असून वैधानिक कार्यवाही पूर्ण केली जात आहे. यासंदर्भात गुणवत्तेनुसार एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल. जसा गावठाणासाठी ३७(१)(अ) खाली कार्यवाही केली जाणार आहे तशीच कार्यवाही कोळीवाडयाचा विकास व्हावा यासाठी शासन ३७(१)(अ) नुसार कार्यवाही करणार आहे. त्यामुळे शासन कोळीवाडयाच्या संदर्भात निश्चितपणे योग्य ती कार्यवाही पूर्ण करेल एवढे मी या अनुषंगाने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37939.....

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मुंबईतील कोळीवाडयाच्या पुनर्विकासासाठी अधिक एफ.एस.आय. आणि सी.आर.झेड.मधून सवलत देण्यासंबंधी प्रश्न विचारण्यात आला असताना अधिक एफ.एस.आय.च्या संदर्भात उत्तर देण्यात आलेले आहे. मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सी.आर.झेड.च्या सदर्भात शासनाची सर्वसाधारण भूमिका काय आहे आणि याच कोळीवाडयाच्या संदर्भात ही भूमिका राहणार आहे की संपूर्ण मुबईतील सी.आर .झेड.च्या संबंधी शासन ठोंस भूमिका घेऊन योग्य ती कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी कोळीवाडयाच्या संदर्भात सागितले की एक्स्ट्रा एफ.एस.आय. आणि इतर ज्या काही गोष्टी आहेत त्या सगळया बाबीसंबंधी 37 (1) (अअ) च्या संदर्भाने ज्या हरकती आणि सूचना मागविण्यात आलेल्या आहेत त्या संदर्भात हा निर्णय निश्चितपणे घेण्यात येईल त्याचबरोबर . सध्या सी.आर.झेड.च्या संदर्भात अस्तित्वात असलेले जे नियम आहेत त्या मधून कोळीवाडयांना वगळण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. याबाबतीत सांगावयाचे म्हणजे हा केन्द्र सरकारचा , मिनिस्टर ऑफ इनव्हायरमेन्टस ॲन्ड फॉरेस्टचा हा कायदा आहे. हे कोळीवाडे सी.आर.झेड.मधून वगळावेत अशी शिफारस राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे केलेली आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, कोळीवाडयाच्या पुनर्विकासासंबंधी प्रश्न विचारण्यात आला आहे.या निमित्ताने सी.आर.झेड.चा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला आहे. या अनुषंगाने मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, मुंबई शहरात ज्या हौसिंग बोर्डाच्या कॉलनीज आहेत त्या कॉलनीमध्ये सी.आर.झेड.चा प्रश्न निर्माण झालेला आहे त्यांनासुध्दा अशा प्रकारची सवलत देण्यात येणार आहे काय ? त्यांना एफ.एस.आय.वाढवून देण्यासंबंधीचा निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा देण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला हा प्रश्न वेगळा आहे. तरीसुध्दा मी त्यांना सांगू इच्छितो की, सी.आर.झेड.संबंधी ज्या काही त्रृटी आहेत त्या बाबतीत राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे तपशीलवार माहिती पाठविलेली आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील चिखली मध्यवर्ती केंद्रातील व्यापारी भूखंडांचा झालेला गैरव्यवहार**

**(४) * ४१०१७ श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील चिखली मध्यवर्ती केंद्रातील २० व्यापारी भूखंड दिल्लीस्थित ३ कंपन्यांना भूवाटप नियमांचे उल्लंघन करुन दिल्याबाबत चौकशी करणेकरिता मा.मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या सुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.
(२) यापूर्वी या प्रकरणी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर २० भूखंडाचे वाटप हे नियमानुसार झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना आणि नगर विकास राज्य मंत्र्यांना दिनांक 17 ऑक्टोबर 2007 रोजी पत्र दिले होते परंतु त्याचे उत्तर अजूनही मला देण्यात आलेले नाही. या प्राधिकरणाने व्यापारी भूखंडाचे भाडेपट्टा तत्वावर विक्री योजना आणली होती आणि त्या योजनेमध्ये अशी अट टाकण्यात आली होती की, "अर्जदार जन्माने महाराष्ट्राचा रहिवाशी किंवा महाराष्ट्राचा किमान दहा वर्षाच्या वास्तव्याने रहिवाशी असला पाहिजे, या निकषासाठी महसूल अधिकाऱ्या मार्फत मिळणारा निवासाचा दाखला अथवा महाराष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला पुरावा म्हणून सादर करावयाचा आहे. विवाहित स्त्री अर्जदाराबाबत निवासाचा दाखला किंवा महाराष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याच्या दाखल्या सोबत विवाह प्रमाणपत्र सादर केले पाहिजे"तेव्हा ही अट त्यामध्ये टाकण्यात आली होती किंवा नाही ? या अटीप्रमाणे भूखडाचे वाटप झाले नाही म्हणून मी हा प्रश्न उपस्थित केला होता. सभापती महोदय, यानंतर दुसरी अट अशी टाकण्यात आली होती की, " अर्जदार पिंपरी चिचवड महानगरपालिका क्षेत्रात अर्ज दिनांकापूर्वी सलग किमान एक वर्ष कोणत्याही नोंदणीकृत कंपनी, शासकीय ,निमशासकीय कार्यालय, सस्था आस्थपनेमध्ये नोकरीस असला पाहिजे या पात्रतेबाबत संस्थेचा नोकरीचा दाखला असला पाहिजे



VTG/ KTG/ KGS/ MMP/ SBT/

या दोन्ही अटींचे उल्लंधन करुन बाहेरच्या व्यक्तीस 20 भूखंड देण्यात आले होते हे खरे आहे काय आणि या बाबत जी चौकशी करण्यात आली होती त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली होती ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे लॅन्ड डिसपोजल रुल्स आहेत आणि त्यामध्ये पात्रता ठरविण्यासाठी चार अटी टाकण्यात आलेल्या आहेत. त्या प्रत्येक अटीपुढे " किंवा " हा शब्द आहे. पहिली अट अशी आहे की अर्जदार हा महाराष्ट्राचा डोमीसाईल असला पाहिजे म्हणजे ती व्यक्ती महाराष्ट्रात दहा वर्षापासून राहणारा असला पाहिजे. तसेच एक वर्षापासून काम करणारा कामगार असला तरी लॅन्ड डिसपोजल रुल्सप्रमाणे भूखंड खरेदी करण्याच्या दृष्टीने पात्र आहे. त्यानंतर तिसरी अट अशी आहे की," एखादी को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी असली तरी ती पात्र राहील " आणि चौथी अट अशी आहे की, "कोणतीही कंपनी असली तरी ती पात्र राहील." त्यामुळे कोणतीही कंपनी या सदरा खाली....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 41017 ....

कोणतीही कंपनी, जी रजिस्टर कंपनी आहे त्या दृष्टीकोनातून पाहिले तर एल.डी.रूल्समधील क्र.4 मध्ये जो मुद्दा आहे त्या अनुषंगाने या भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. दुसरे म्हणजे याबाबतीत ज्या तक्रारी झालेल्या होत्या त्याबाबत उच्च स्तरीय म्हणजे विभागीय आयुक्त,पुणे यांच्याकडून चौकशी करण्यात आली असून त्या चौकशी अहवालात विभागीय आयुक्तांनी सांगितले आहे की, जे काही वाटप केले आहे ते योग्य आहे. त्यामुळे एल.डी.रूल्सना धरूनच हे वाटप केलेले आहे. या शिवाय मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे प्लॉटस् त्या कंपन्यांना विकासक म्हणून दिलेले आहेत. म्हणजे कंपन्यांचे काम विकासकाचे राहणार आहे आणि त्या ठिकाणी मग जे कोणी गाळेधारक येतील ते महाराष्ट्रातीलच असतील किंवा त्या भागातीलच राहतील या दृष्टीने त्यांच्याशी करार करताना अटी टाकण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पुण्यासारख्या ठिकाणी हे जे प्लॉटस्चे वाटप केले ले आहे त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाकडून पूर्वी एक पत्रक निघाले होते की, महाराष्ट्रातील कोणतीही जागा देताना ती जागा घेणारी व्यक्ती वा कंपनी ही महाराष्ट्राची कमीत कमी 15 वर्षे रहिवासी असली पाहिजे, त्या व्यतिरिक्त त्या भागातील वास्तव्य तिचे असले पाहिजे. हे यासाठी की, त्यात तेथील सुरक्षितता हेही एक प्रमुख कारण आहे. तसेच तेथील स्थानिकांवर अन्याय होऊ नये हे दुसरे कारण आहे. म्हणजे सुरक्षितता आणि स्थानिकांना न्याय या दोन गोष्टी त्यातून साधल्या गेल्या होत्या. परंतु या नियमांना बाधा आणून हे वाटप झालेले आहे अशी आमची माहिती आहे तर मग किती वर्षांची वास्तव्याची अट या वाटपासाठी घालण्यात आली होती ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी यापूर्वी अगदी सविस्तरपणे सांगितले की, त्या ठिकाणी हे प्लॉटस् देताना एल.डी.रूल्स जे बनविण्यात आले होते त्यांचे 100 टक्के पालन केलेले आहे. यामध्ये शासनाची ही भावना देखील आह, त्यातील अट क्र.1 व 2 आपण पाहिल्या तर आपल्याला दिसून येईल की, की, जे वापर करणारे लोक आहेत, ते महाराष्ट्रातील असावेत आणि तेथील कामगार असावेत. यासाठीच या भागातील कामगारांना यातील गाळ्यांचे वाटप केले जाईल अशा सूचना देण्यात येतील.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तरासाठी एक तासाची वेळ असते. आज नियम 289 चा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी दिला असल्याने त्यावर सदनात 37 मिनिटे चर्चा

..... एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे चालू...)

झाली. अशा वेळी शक्यतो प्रश्नोत्तरासाठी एक तासाची वेळ ही संपूर्णपणे वापरायचा असे मी ठरविले होते परंतु आता या तासातील 37-38 मिनिटे गेली असल्याने त्याची भरपाई म्हणून किमान 10 ते 15 मिनिटे प्रश्नोत्तरांसाठी वाढवून देणे योग्य होईल असे मला वाटते. त्याप्रमाणे मी आज प्रश्नोत्तराचा तास 15 मिनिटांनी वाढवून देत आहे. त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेनुसार पुढील कामकाज घेण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी मघाशी उत्तर देताना जो चौकशीचा उल्लेख केला त्यात त्यांनी जी चौकशी केली ती नोंदणीकृत दिल्याबद्दल केली. त्याबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त,पुणे यांनी या संबंधात जी चौकशी केली व अहवाल दिला आहे तो शासनाने स्विकारला असून ते वाटप योग्य पद्धतीने झाले आहे. पण त्यात कोणती कंपनी नोंदणीकृत आहे, वगैरे कोणतेही बंधन नसल्याचेच दिसून आले. माझा प्रश्न वेगळाच आहे. याबाबतीतील या सगळ्या कंपन्यांनी त्यांचे जे निवासाचे पत्ते दिले आहेत, पिंपरी-चिंचवड मधील जे पत्ते दिले आहेत ते पूर्णपणे बोगस होते तरीही त्यांना भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. वाटल्यास मी, येथे आपल्याला त्या कंपन्यांची नावे सांगू शकतो. डॉल्फिन बिल्डर्स प्रा.लि., सिंफोनी रिॲल्टर्स प्रा.लि. आणि पार्श्वनाथ डेव्हलपर्स अशी या तीन कंपन्यांची नावे आहेत आणि या तिन्ही कंपन्या दिल्लीच्या नोंदणीकृत आहेत. त्यांनी येथील जो निवासाचा पत्ता दिला आहे तो बोगस आहे अशी माझी माहिती आहे. तेव्हा आपण या तिन्ही कंपन्यांची सीआयडी चौकशी करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या संबंधात विभागीय आयुक्तांची चौकशी समिती गठित करण्यात आली होती आणि त्यांना चौकशीसाठी जे जे मुद्दे दिले होते त्यात त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... ओ 1 ..

ता.प्र.क्र. 41017...

श्री. राजेश टोपे...

त्यामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, दिनांक 22.12.2005 रोजी लिव्ह लायसेन्सचा करार नोंदणीकृत केल्याचे दिसून येते. भू वाटप नियम 73 मध्ये कंपन्या कोणत्या राज्यातील नोंदणीकृत असाव्यात याबाबत कोणतेच बंधन असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे रजिस्टर ऑफिस कुठेही असले तरी ऑफिसचा महाराष्ट्रातील पत्ता चुकीचा दाखविला होता असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सभापती महोदय, ही सर्व ब्रँच ऑफिसेस आहेत, त्यामुळे ब्रँच ऑफिस म्हणून या कंपन्यांनी पुण्याचा पत्ता दाखविला होता.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ते पत्ते खोटे आहेत, ती कंपनी बोगस आहे. पत्त्यामध्ये दाखविण्यात आलेले ब्रँच ऑफिस प्रत्यक्षात त्याठिकाणी अस्तित्वात नाही. तेव्हा याची आपण चौकशी करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, पत्ते चुकीचे दिले असले तरी वाटप योग्य पध्दतीने झाले आहे. तसेच, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, आज तीन कंपन्यांच्या ब्रँच ऑफिसेसचे पत्ते आहेत. ते ब्रँच ऑफिस आज त्याठिकाणी अस्तित्वात आहेत. तरीदेखील त्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्याची जरुर चौकशी केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खाजगी (विश्वस्त संस्था) रुग्णालयातील रुग्णांकडून**
**अमानुष शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(५) * ३७४७० श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. रामनाथ मोते , श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४१९ ला दिनांक १ ऑगस्ट, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून विश्वस्त संस्था म्हणून रजिस्ट्रेशन (नोंदणी) करुन रुग्णालय चालविणेबाबत परवानगी देताना विविध प्रकारचे उपचार देणे संबंधात दर पत्रक निश्चित केले जाते काय,

(२) त्यानुसार रुग्णांकडून आकारणी होत असते काय, त्याबाबत जादा शुल्क आकारणी करणे व त्यासाठी अडवणूकीचे धोरण वापरणे, रुग्णांचे होणारे हाल याबाबत शासकीय नियंत्रण असते काय,

(३) असल्यास, त्यासाठी काय कार्यवाही आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नाही. सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार विश्वस्त संस्थांची नोंदणी, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून करण्यात येते. अशा संस्थांचा उद्देश रुग्णालय चालविण्याचा असतो. ज्या विश्वस्त संस्था नोंदणी करुन रुग्णालय चालवितात त्यांची नोंदणी करताना दरपत्रक निश्चित करण्याबाबतची कोणतीही तरतूद वरील कायद्यात नसल्याने या रुग्णालयांची दरपत्रके निश्चित केली जात नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, ज्या धर्मादाय रुग्णालयांना शासनाकडून वेगवेगळ्या सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्या रुग्णालयांना सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० मधील कलम ४१(अ) (अ) नुसार गरीब व गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात वैद्यकीय सेवा व उपचार देण्याबाबत, सूचना देण्याबाबतची व त्याची अंमलबजावणीची कार्यवाही धर्मादाय आयुक्त यांचेकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये विश्वस्त संस्था रजिस्टर होतात. या संस्था रुग्णालय चालविण्यासाठी शासनाकडून निरनिराळया प्रकारच्या सवलती आणि अनुदान मिळवितात, आणि शासन त्यांना अनुदान देते. परंतु रुग्णांकडून शुल्क आकारण्याच्या बाबतीत शासनाचे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण राहत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७४७०.....
श्री. दिलीपराव सोनवणे....

रुग्णांकडून अवास्तव शुल्क आकारले जाते, रुग्णांनी पैसे भरले नाही तर त्यांची अडवणूक केली जाते, त्यांचा मानसिक छळ केला जातो. अशा रुग्णांलयांचे दरपत्रक निश्चित करणारा कायदा अस्तित्वात नाही, तो करण्यात येईल काय? दुसरा प्रश्न असा की, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या कलम ४१ (अ) नुसार गरीब गरजू रुग्णांना मोफत, सवलतीच्या दरामध्ये औषधोपचार केले जातात. तेव्हा अशा रुग्णांलयांचे दरपत्रक निश्चित करुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात येईल काय? आज बाहय रुग्ण विभागामध्ये १५ टक्के गरजू रुग्णांना वैद्यकीय सवलती दिल्या जातात, त्याठिकाणी सुध्दा घोटाळा केला जातो, प्रत्यक्षात त्याठिकाणी रुग्णांना सवलती मिळत नाहीत. चुकीच्या पध्दतीने त्या पैश्याचा दुरुपयोग होतो. त्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार धर्मादाय आयुक्तांमार्फत अशा संस्थांची नोंदणी केली जाते. या रुग्णालयामधील शुल्क किती असावे हे आमचे खाते ठरवीत नाही. आमच्या विभागाचे फक्त त्यांच्यावर नियंत्रण असते. त्यामुळे आरोग्य विभाग किंवा आरोग्य संचालक यांच्यावतीने दर निश्चित केले जातात. तसेच, त्यासंबंधीचा कायदा देखील आरोग्य खात्यामार्फत केला पाहिजे. माननीय सदस्यांनी कलम ४१ (अ) मधील तरतुदीनुसार गरीब-गरजू रुग्णांना राखीव बेड ठेवल्या पाहिजेत आणि त्यांच्यावर मोफत औषधोपचार केले पाहिजेत असे विचारले. सभापती महोदय, यासंबंधी तपासणी करण्याकरिता विधीमंडळाची एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. तसेच, या व्यवस्थेवर उच्च न्यायालयाकडून मॉनिटरींग चालू आहे. त्यामुळे अशा रुग्णालयाकडून गरजू, गरीब रुग्णांना मोफत औषधोपचार देण्यास शासनाच्या वतीने भाग पाडण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारण्यामागील मूळ हेतू असा आहे की, विश्वस्त संस्था चॅरिटेबल ॲक्टखाली नोंदणी करतात. या रुग्णालयामधून किंवा दवाखान्यामधून गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार झाले पाहिजेत, किंवा सवलतीच्या दरामध्ये उपचार झाले पाहिजेत परंतु ते होत नाहीत. परंतु ही रुग्णालये आपल्या इच्छेनुसार रुग्णांकडून रकमा वसूल करतात. गोरगरीब रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरामध्ये उपचार मिळाले पाहिजेत असा आपला उद्देश असल्यामुळे रुग्णालयांच्या वाढीव दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपण उपाय योजना करणार काय? आणि गरीबांना दिलासा देणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37470 . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, जी सर्व खाजगी मोठी हॉस्पिटल्स् आहेत, ते मोठया प्रमाणात दर आकारतात, गरीब लोकांना नाडवतात. मेलेल्या माणसाचे प्रेत देखील सोडत नाहीत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत. पण याबाबतीत एखादा कायदा आणता येईल काय ? त्यामाध्यमातून हॉस्पिटलचे शुल्क ठरविता येईल काय ? यादृष्टीने विचार करावा अशा आरोग्य विभागाला सूचना दिल्या जातील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझ्या प्रश्नाच्या माध्यमातून अतिशय भयानक अशी स्थिती सदनासमोर आणू इच्छितो. आज मुंबईतील . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी लवकर प्रश्न विचारावा. कारण प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपत आलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईतील सर्व मोठमोठी हॉस्पिटल्स् ही चॅरिटी कमिशनरच्या अखत्यारित रजिस्टर झालेली आहे. ही हॉस्पिटल्स् युनियनच्या नावाखाली बंद करुन तेथील जागा मॉलकरता विकण्याच्या बाबतीत त्या-त्या हॉस्पिटलच्या ट्रस्टींनी तयारी केलेली आहे. यामध्ये मुंबईतील तीन मोठी हॉस्पिटल्स् आहेत. 1) आशा पारेख हॉस्पिटल, सांताक्रुझ, 2) राधाबाई वाटुमल हॉस्पिटल, माहीम (प.), तसेच शासनाने ज्या हॉस्पिटलला चार कोटी रुपये दिलेले आहेत ते 3) वाडिया हॉस्पिटल, परेल. आपण या तीन हॉस्पिटलवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतसाहेबांनी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, मुंबई शहरातील तीन हॉस्पिटल बंद करुन तेथे मॉल करण्यात येणार आहे. तर असे करु नये यासाठी ही बाब तपासून, यासंदर्भात कायद्याने जे काही करता येईल ते आपण निश्चितपणे करु.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

. . . .पी-2





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "पुणे येथे नागरी जमीन कमाल धारणा कायदा 1976 अंतर्गत बनावट आदेश तयार करुन शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येणे, 2 वर्षाचा कालावधी होऊनही या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, प्रकाश शेंडगे, जगदीश गुप्ता यांनी "दिनांक 31 मार्च 1978 च्या शासन निर्णयानुसार 1246 कर्मचारी जिल्हा परिषदेच्या नियमित आस्थापनेवर निर्माण करणे, सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ग्रामपंचायतीकडून लोकवर्गणीतून वसूल करण्याची तरतूद असून 100 टक्के लोकवर्गणी केली तरीही या कर्मचाऱ्यांचा वेतन व भत्याचा खर्च त्यातून न भागणे,सदर शासन निर्णय रद्द करण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री.रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "राज्यात वजनमापे दुरुस्ती परवानाधारक कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे 4 हजार असून या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलती,सुविधा तसेच भविष्यनिर्वाह संबंधी कोणतीही योजना उपलब्ध नसल्याने सदर कर्मचाऱ्यांनी मंत्रालयासमोर आत्मदहन करण्याचा दिलेला इशारा." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री.जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडरी यांनी "अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांनी कृषी पंपाकरिता विजेच्या जोडण्या मिळाव्यात यासाठी 3675 अर्ज महावितरणकडे केले असून त्यापैकी फक्त 192 वीज जोडण्या देण्याची कार्यवाही सुरु असून उर्वरित वीज जोडण्या देण्याची कार्यवाही अद्यापही सुरु नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

. . . .पी-3



**सभापती** . . . .

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी "डहाणू शहराचा विकास आराखडा सन 1996 सालापासून राज्य शासनाकडे मंजूरीसाठी प्रलंबित असून न्यायालयाने ना हरकत प्रमाणपत्र देऊनही सदर विकास आराखडयास अद्यापही मंजुरी न मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री.प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण यांनी "साखर कारखान्यांचा गळीत हंगाम अखेरच्या टप्प्यात आला असून सांगली जिल्हयात 15 ते 20 लाख टन ऊस शेतात उभा असून सदर ऊस ऊन्हाच्या तडाख्याने वाळून जात असून पाणी टंचाई व भारनियमनामुळे ऊसाचे चिपाळे होत असणे, साखर कारखान्यांनी सदर ऊस न नेल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री.गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया यांनी "अकोला जिल्हया- तील अकोट उप विभागीय सार्वजनिक बांधकाम विभागाने पूरहानी व खड्डे बुजविण्याच्या कामात निविदा न मागविता मजूर संस्थांना परस्पर लाखो रुपयांची कामे देणे व सदर कामे कागदावर केली असल्याचे दाखवून रकमेचा अपहार करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.अनिल परब यांनी "वांद्रे (पूर्व) येथील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील इमारती जीर्ण होऊन मोडकळीस आल्या असल्याने सदर वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणे, अनेक वर्षापासून मागणी करुनही सदर प्रस्तावात सामावून घेण्याच्या त्यांच्या मागणीबाबत शासनाकडून होत असलेली टाळाटाळ व चालढकल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

. . . .पी-4



**सभापती** . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सर्वश्री.मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "मुंबईतील दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयाची इमारत धोकादायक असल्याने ग्रंथसंग्रहालय बंद होण्याचा निर्माण झालेला धोका, परिणामी असंख्य गरीब विद्यार्थ्यांची होणारी कुचंबणा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 13:20

**सभापती** ....

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यवतमाळ जिल्हयात दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांची संख्या 1 लाखापेक्षा जास्त असून त्यांना वेळेवर धान्य न मिळणे, त्यातच शासनाने धान्य पुरवठयात केलेली कपात, या कुटुंबातील लोक मका व बाजरी खात नसताना त्यांना ते धान्य घेण्याची सक्ती करणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एन.एच.डी. अंध उद्योगगृह, वरळी येथील निलंबित अधीक्षक श्री. सुरेश कुलकर्णी यांनी दिनांक 1/4/2008 रोजी या संस्थेतील 4 अंध विद्यार्थ्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता संस्थेबाहेर काढल्यामुळे अंधजनांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.व्हि.यू. डायगव्हाणे, बी.टी. देशमुख यांनी वर्धा नगरपरिषदेची जुनी इमारत सन 2006 मध्ये पाडून सदर इमारत बीओटी तत्वावर बांधण्याचा नगरपरिषदेने घेतलेला निर्णय, इमारत पाडल्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजाची होत असलेली परवड, सदर इमारतीचो बांधकाम बीओटी तत्वावर केले जाईल असे आश्वासन सभागृहात देऊनही त्याचे पालन न होणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------------

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शुक्रवारी देण्यात आलेल्या 93 च्या सूचनेचे निवेदन आलेले होते . त्यावेळी आपण ते निवेदन पुढे ढकलले होते. अजून ती निवेदने सभागृहासमोर आलेले नाहीत.

**सभापती** : काल काही 93 च्या सूचना घेतल्या होत्या. आज जी निवेदन घेण्यात येणार होती ती उद्या घेतली जाणार आहेत त्याच वेळी शुक्रवारी पुढे ढकलण्यात आलेल्या 93 च्या सूचनांवरील निवेदने देखील घेण्यात येतील.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मी एक नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती.

**सभपती** : ती सूचना दालनात नाकारली आहे.

----------- 2....

**सभापती** : मघाशी कागदपत्रे सभागृहासमोर सादर करण्याचे राहून गेले होते. आता कागदपत्रे सभगृहासमोर सादर केली जातील.

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे 1 एप्रिल 2005 ते 5 जून 2005 या कालावधीचे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----------

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. श्रीकांत जोशी ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा तेरावा अनुपालन अहवाल सभागृहाला सादर करतो..

सभापती महोदय, सार्वजनिक उपक्रम समितीचा तेरावा अहवाल परिवहन महामंडळाच्या संदर्भात आहे. महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बाबतीत काही बाबी सभागृहामध्ये स्पष्ट होणे आवश्यक आहे असे मला वाटते. या पूर्वी या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. गेल्या 50 वर्षापासून परिवहन महामंडळ उल्लेखनीय कामगिरी करीत असलेल्या महामंडळास गेल्या काही दिवसांमध्ये अडचणीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. आरटीओ व पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक करणाऱ्या 92,841 गाडया पकडण्यात आलेल्या आहेत. त्यातील 23477 गाडया या दोषी आढळून आलेल्या आहेत. तसेच 14038 गाडया जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमध्ये 2.76 कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आलेला आहे.ही एकाच वर्षातील आकडेवारी लक्षात घेता, राज्यामध्ये मोठया प्रमाणात अवैश वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास येत आहे. सध्या राज्य मार्ग परिवहन महामंडळ तोटयात आलेले आहे. काही हजार कर्मचाऱ्यांचे हे महामंडळ आज तोटयात चालू आहे. शासन या महामंडळास संरक्षण देत नाही. अवैध वाहतुकीमुळे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार राजरोसपणे होत आहे. राजाश्रयामुळे हा भ्रष्टाचार सुरु आहे. कोठलेही कर न भरता किंवा परवाना न घेता, व प्रवाशांचा जीव टांगणीला टाकून अवैध वाहतूक महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी परिवहन महामंडळाच्या बसेसची सेवा उपलब्ध नाही अशा ठिकाणी पूरक सेवा देणाऱ्या खाजगी वाहतूकीस वैध ठरवून ती सेवा सुरु

3..

श्री. श्रीकांत जोशी.......

करावी अशा प्रकारची शिफारस या अहवालामध्ये करण्यात आलेली आहे. काही बसेस बीओटी तत्वावर देत असताना जो भ्रष्टाचार झालेला आहे तो भ्रष्टाचार थांबविण्याची आवश्यकता आहे अशा प्रकारची शिफारस करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मला आणखी दोन महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. परिवहन महामंडळातील काही चांगल्या दुकानांचा अवैधरीत्या काही लोकांनी कब्जा केलेला आहे. त्याचे सर्व अधिकार डेप्युटी कलेक्टरांना दिलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. श्रीकांत जोशी .....

त्या उपजिल्हाधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही त्यामुळे एस.टी.चे खूप नुकसान झाले. म्हणून उपजिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार काढून एस.टी.च्या रिजनल ऑफीसरला ते दिले पाहिजेत. यामध्ये अकाऊंटीबिलिटी नीट राहिली पाहिजे. श्री. गिरीष बापट हे चेअरमन असताना चांगले काम झाले. ते चेअरमन होण्याच्या अगोदर जी खरेदी प्रक्रिया झाली त्यासंदर्भात चुकून त्यांचे नाव गोवण्याचे काम झाले होते. याबाबतीत समितीने निर्णय करुन ती सर्व प्रक्रिया पूर्वी झालेली असल्यामुळे त्यांचा काही संबंध नाही अशा पध्दतीचे निश्चित धोरण समितीने घेतलेले आहे. या गोष्टी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणाव्यात म्हणून आपल्या अनुमतीने सभागृहाच्या निदर्शनास आणलेल्या आहेत.

**उपसभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा तेरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

**पृ. शी.** : घोडबंदर ( जि.ठाणे ) येथील ग्लोबल फूड येथे जप्त करण्यात आलेले भेसळयुक्त तूप.

**मु. शी.** : घोडबंदर (जि.ठाणे) येथील ग्लोबल फूड येथे जप्त करण्यात आलेले भेसळयुक्त तूप यासंबंधी डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री अरविंद सावंत, गोपिकिसन बाजोरिया, गुरुमुख जगवानी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"घोडबंदर (जि.ठाणे) येथील ग्लोबल फूड येथे मुंबई गुप्तचर विभाग आणि ठाणे अन्न व औषधे प्रशासनाने दिनांक 8 मार्च, 2008 रोजी वा त्यासुमारास टाकलेल्या धाडीत सुमारे पावणेदोन लाख रुपयांचे भेसळयुक्त तूप जप्त करण्यात येणे, या गुन्ह्यात आंतरराष्ट्रीय टोळी असल्याची शक्यता व्यक्त होणे, या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेता याची सखोल चौकशी होऊन कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची उपाययोजना"

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये देवकी ब्रँड शुध्द गाईचे तूप या नावाने उत्पादन करुन त्यामध्ये बनावट तूप आढळून आले यासंबंधीचा विषय आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पोलिसांच्या मदतीने सखोल चौकशी व तपास सुरु असून अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर तसेच चौकशी पूर्ण झाल्यानंतर संबंधितांविरुध्द अन्न भेसळ प्रतिबंध कायदा, 1954 व त्याखालील नियमांनुसार न्यायालयात खटला दाखल करणे शक्य होईल. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ही चौकशी अहवाल किती दिवसात प्राप्त होईल ? त्यांच्यावर खटला कधी भरणार ? मी शासनाच्याच गेल्या वर्षीच्या अहवालातील माहिती सांगतो. अन्न भेसळीच्या संदर्भातील जे खटले प्रलंबित आहे त्यांची संख्या ठाणे विभागामध्ये 2006-07 मध्ये 989 आहे. त्यापैकी फक्त एक खटला सुटला. Number of prosecution pending in this year 1019. सभापती महोदय, अन्नभेसळ मानवी आयुष्याला घातक आहे. त्यामुळे हे सगळे खटले लवकर निकाली काढण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, देवकी ब्रँड के संबंध में संबंधित व्यक्ति के खिलाफ एफआयआर दाखिल की गई है. एफआयआर क्र.1-46/2008 के अन्तर्गत सेक्शन 21(a), 21(ac), 21(am), 7, 16 पी.एफ. एक्ट. के तहत दाखिल की गई है. घी के सेम्पल विश्लेषण के लिए प्रयोगशाला में भेजे गए हैं. सेम्पल रिपोर्ट प्राप्त होने के पश्चात न्यायालय में केस दाखिल की जाएगी. 8 दिन के अन्दर सेम्पल रिपोर्ट आएगी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्याकडे अन्न निरीक्षकांची संख्या कमी आहे हे खरे आहे काय ? असल्यास किती कमी आहे ? ती संख्या वाढविण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : फुड इंसपेक्टर के जो पद रिक्त थे वे भर दिए गए हैं. अभी 16 पद रिक्त है, ये पद कर्मचारियों के रिटायर होने के कारण रिक्त हुए हैं. ये 16 पद भी जल्द से जल्द भर दिए जाएंगे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : ग्लोबल फूड कंपनीचे बाकीचे सर्व परवाने रद्द केले आहेत की नाही ?

श्री.बाबा सिद्दीकी : त्यांचे परवाने रद्द केले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या तुपाच्या कंपन्यांमध्ये धाड टाकल्यानंतरही अशा अनेक कंपन्या चालविल्या जातात. या कंपनीचे पिरीयॉडिक इन्सपेक्शन एफ.डी.ए.कडून झाले होते की नाही ? झाले असेल तर त्या पूर्वी कधी इन्सपेक्शन झाले होते ? या कंपनीमध्ये भेसळयुक्त तूप पकडले आहे ती कंपनी किती वर्षापासून कार्यरत आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : इस कंपनी को 20.11.2007 को लाईसेंस दिया गया था. इन्सपेक्शन यह एक आन गोईंग प्रोसेस है जो हर जगह होती है.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथील उपकेंद्राच्या निर्मितीसाठी होत असलेला विलंब

**मु. शी.** : मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथील उपकेंद्राच्या निर्मितीसाठी होत असलेला विलंब यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त, शरद रणपिसे, प्रतापसिंह मोहिते-पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र कल्याण येथे असावे ही मागणी मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये मान्य होणे, सदर उपकेंद्रासाठी कल्याण पूर्व येथे कांधारी गावानजिक ८ एकर जागा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने देणे, परंतु सदर जागेवर बागबगिंच्यासाठी आरक्षण असणे, सदर आरक्षण असल्यामुळे मुंबई विद्यापीठाने आरक्षण रद्द होईपर्यंत ताबा घेण्यास दिलेला नकार, तसेच सदर आरक्षण रद्द करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या महासभेत ठराव मंजूर होणे व आरक्षण रद्द करण्यासाठी नगरविकास विभागाकडे सदर नस्ती सादर करणे, मात्र सदर नस्तीवर अजून कोणताही निर्णय न होणे, त्याचबरोबर मुंबई विद्यापीठाच्या सन २००८ च्या अर्थसंकल्पात ५० लाख रुपयांची तरतूद कल्याण उपकेंद्राच्या निर्मितीसाठी करण्यात येणे, केवळ मंत्रालय स्तरावर फाईल निर्णयाविना पडून असल्याने होत असलेल्या उशिराबाबत येथील विद्यार्थी आणि पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, स्थानिक जनतेच्या भावनेला अनुसरुन मी शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो. कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र करण्याचा निर्णय घेतला आहे पण मंत्रालयातील प्रोसिजरल रेड टेपीझम व ब्युरोक्रसीमुळे हे काम अडकले आहे. परिणामी विद्यार्थी व जनतेत तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्याकडून आमच्या अपेक्षा आहेत. कारण हा प्रश्न त्यांच्यासमोर वेळोवेळी उपस्थित करण्यात आलेला आहे. या कामाची प्रोसेस आणि प्रोसिजर पूर्ण करण्यासाठी किती कालावधी निश्चित केला आहे ? किती कालावधी यासाठी लागणार आहे ? याबाबतची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ? ज्या कारणांमुळे अडथळे निर्माण झाले आहेत ते दूर करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय बैठक घेतील काय असे मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला आहे आणि त्याचा ते सातत्याने पाठपुरावा सुध्दा करीत आहेत. या कामाला जरुर उशीर झाला आहे. त्याचे कारण असे आहे की, जो बेसमॅप तयार केला होता त्या डी.पी.च्या सुपरइम्पोजमध्ये त्रुटी राहिल्या होत्या. या कारणामुळे डी.पी.मंजूर करण्यासाठी उशीर होतो. आता सर्व गोष्टी पूर्ण झालेल्या आहेत. सर्व त्रुटी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. डी.पी.ला तातडीने मंजुरी दिली जाईल. एमआरटीपी ॲक्टच्या सेक्शन 31 मधील एक्सक्ल्यूडेड पोर्शनसंबंधी हरकती व सूचना मागविल्या आहेत. सभागृहाला मी एवढेच सांगू इच्छितो की, वैधानिक कालावधी लागतो, कायद्याप्रमाणे वेळ लागतो त्यापेक्षा एक दिवस सुध्दा वेळ लावला जाणार नाही. माननीय सदस्यांबरोबर बैठक घेऊन या सर्व गोष्टी एक्सपिडाएट करण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

-------

4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील प्रशिक्षित ॲप्रेंटीस बेरोजगारांना वीज सेवक या पदावर सामावून घेण्याची त्यांच्या कृती समितीने केलेली मागणी

**मु. शी.** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील प्रशिक्षित ॲप्रेंटीस बेरोजगारांना वीज सेवक या पदावर सामावून घेण्याची त्यांच्या कृती समितीने केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील सर्व प्रशिक्षित ॲप्रेंटीस बेरोजगारांना विद्युत मंडळात वीज सेवक या पदावर सामावून घ्यावे, तसेच वर्ग-3 व 4 ची सरळसेवा भरती सुरु करावी, विद्युत मंडळात आऊटसोर्सिंगअंतर्गत काम करणाऱ्या सर्व ॲप्रेटींसना विनाअट नोकरीत सामावून घ्यावे, प्रशिक्षण सुरु असलेल्या उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करावी, तसेच 20 हजार प्रशिक्षित ॲप्रेंटीस बेरोजगारांना रोजगार मिळेपर्यंत नवीन उमेदवारांना प्रशिक्षण देऊ नये, या व इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र राज्य बेरोजगार ॲप्रेंटीस कृती समितीने शासनाकडे सातत्याने केलेली मागणी, या मागणीच्या अनुषंगाने ऊर्जा मंत्र्यांनी आपल्या मंत्रालयीन दालनात बैठक बोलावून वर्ग-3 व 4 पदाच्या भरतीवरील बंदी एक महिन्यात रद्द करण्यात येईल असे मा.मंत्र्यांनी दिलेले आश्वासन, आश्वासन देऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत या आश्वासनाची पूर्तता न होणे, परिणामी या बेरोजगार ॲप्रेंटीस उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष, या अन्यायाविरुध्द बेरोजगार ॲप्रेंटीस कृती समितीने आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात प्रशिक्षण घेतलेल्या या बेरोजगार ॲप्रेंटीस उमेदवारांना विद्युत मंडळात सामावून घेण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई व याबाबत शासनाची भूमिका."

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही लक्षवेधी आणण्याचा मूळ उद्देश हा आहे की, या राज्यातील 20 हजार प्रशिक्षित ॲप्रेंटीस बेरोजगारांचा हा प्रश्न आहे. या बरोजगार कामगारांच्या संघटनेने सातत्याने मागणी केलेली आहे की त्यांच्या विद्यावेतनामध्ये वाढ करावी, त्यांची वर्ग-3 व वर्ग-4मध्ये सरळ सेवा भरती सुरु करावी आणि भरतीवरील बंदी एक महिन्याच्या आत उठवावी. माननीय मंत्रीमहोदयांनी 19 डिसेंबर 2006 रोजी आपल्या दालनामध्ये या बरोजगार ॲप्रेंटीस संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेऊन 1 महिन्याच्या आत यासंदर्भात आयोगाकडून अहवाल मागविण्यात येईल असे सांगितले होते. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये दिलेली माहिती अपूर्ण आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील वेतन गट-3 व 4 मधील कर्मचा-यांच्या सेवा भरतीवरील बंदी आयोगाने केव्हा उठविली व त्यानंतर किती वेळा भरती झाली ? तसेच प्रशिक्षणार्थीसाठी 10 टक्क्याप्रमाणे किती पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या आधी मी एक वस्तुस्थिती स्पष्ट करु इच्छितो की, शिकाऊ उमेदवारी अधिनियम 1961 च्या अंतर्गत आयटीआयमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा म्हणून त्यांना ॲप्रेंटीसमध्ये वेगवेगळया कंपन्यामध्ये पाठविण्यात येते. त्या कंपन्यामध्ये ते विद्यार्थी केवळ प्रशिक्षणार्थी म्हणून जातात. तेव्हा त्या कंपनीमध्ये ते केवळ ॲप्रेंटीस आहेत म्हणून त्यांना नोकरी देण्याची किंवा नोकरीमध्ये सामावून घेण्याची जबाबदारी त्या कंपनीची नाही. त्याप्रमाणे वीज मंडळाला किंवा वीज मंडळाच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण या तीनही कंपन्यांना केवळ त्यांनी ॲप्रेंटीसशीप केलेली आहे म्हणून त्यांना नोकरी देणे बंधनकारक नाही. तरी सुध्दा या आयटीआय प्रशिक्षित विद्यार्थ्यांनी वीज मंडळाच्या कंपनीमध्ये ॲप्रेंटीसशीप केलेली असल्यामुळे ज्या ज्या वेळी आम्हाला या कपंन्यामध्ये रिक्रुटमेंट करावी लागेल त्या त्या वेळी कॉल देण्याच्या बाबतीत किंवा इंटरव्ह्यू घेण्याच्या बाबतीत या ॲप्रेंटीसशीप केलेल्याना प्राधान्य द्यावे अशा प्रकारच्या सूचना वीज मंडळाच्या अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. या सर्व बेरोजगार विद्यार्थ्यांची मागणी अशी आहे की, आम्ही ॲप्रेंटीसशीप केलेली आहे त्यामुळे त्या ठिकाणी आमचा नोकरीचा हक्क बनतो. मी सांगू

..2..

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

इच्छितो की, अशा प्रकारचा कोणताही हक्क बनू शकत नाही. या वीज मंडळाच्या वेगवेगळया कंपन्यांमध्ये आऊटसोर्सिंगची कामे दिली जातात. वीज मंडळाच्या अधिका-यांना अशाही सूचना दिलेल्या आहेत की, या ॲप्रेंटीस प्रशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी सोसायटी स्थापन केली तरा आऊट सोर्सिंगची कामे प्राधान्याने या सर्व बरोजगार प्रशिक्षित विद्यार्थ्यांना देण्यात यावीत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या तीनही कंपन्यांना आणि वीज मंडळाला सुध्दा गेली अनेक वर्षे रिक्रुटमेंट करण्याच्या संदर्भात बंदी घालण्यात आली होती. निर्मिती आणि पारेषण कंपनीच्या संदर्भातील बंदी उठविलेली आहे. ही बंदी उठवित असताना निर्मिती कंपनीमध्ये 77 लोकांना सहभागी करुन घेतलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:40

श्री. दिलीप वळसे पाटील...

जे प्रकल्पग्रस्त आहेत, त्या प्रकल्पग्रस्तापैकी जवळपास 400 उमेदवार आय.टी.आय.झालेले आहेत. त्यांना सामावून घेतलेले आहेत. पारेषण कंपनीमध्ये काही दिवसात नव्याने रिक्रुटमेंट करावी लागणार आहे. आजच्या तारखेस पारेषण कंपनीत सहाय्यक यंत्र चालक पदासंबंधीची रिक्रुटमेंट सुरु आहे. त्या रिक्रुटमेंटमध्ये सुध्दा या प्रशिक्षित ॲप्रेंटीस उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. परंतु मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो की, ॲज मॅटर ऑफ राईट हा विषय उपस्थित होत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आऊट सोर्सिंगची काही कामे संस्थांना देण्यात आली आहेत. या संस्थांच्या नोंदणीसाठी सुध्दा कामगारांकडून पैसे उकळले जातात. दहा-दहा हजार रुपये दिल्या शिवाय संस्थेची नोंद होत नाही. प्रशिक्षित ॲप्रेटीस बेरोजगारांकडून त्यांच्याकडून पैसे घेऊन अशा प्रकारच्या संस्थांची नोंदणी होत असेल तर बेरोजगार हा पिसला जाणार आहे. आऊट सोर्सिंगची कामे देण्यात आली आहेत अशा संस्था किती आहेत ?

श्री. दिलीप वळसे पाटील : प्रशिक्षत ॲप्रेंटीस विद्यार्थी आहेत, त्यांनी संस्थांची नोंदणी करावयाची असते ती नोंदणी आमच्याकडे केली जात नाही. कामगार विभागाकडे ती नोंदणी करावयाची असते. यासंदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांची काही स्पेसिफीक तक्रार असेल तर त्यासंबंधीची चौकशी करता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर: मी अजून एक प्रश्न विचारला होता की, आपल्यासोबत या संघटनेच्या पदाधिका-यांची बैठक झाली होती. या बैठकीत आपल्या तिन्ही कंपन्यांमध्ये किती जागा रिक्त आहेत यासंबंधीचा अहवाल मी एका महिन्यात मागवितो असे आपण त्या सघटनेच्या पदाधिका-यांना सांगितले होते. या तिन्ही कंपनीतील रिक्त पदांचा अहवाल आपणास प्राप्त झाला आहे काय ? या तिन्ही कंपन्यांमध्ये किती जागा रिक्त आहेत ?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या तिन्ही कंपन्यांपैकी वितरण कंपन्यांमध्ये जागा रिक्त नाहीत. पारेषण कंपनीमध्ये एक दोन वर्षाच्या कालावधीत 3 हजार कर्मचा-यांची रिक्रुटमेंट आपल्याला करावी लागणार आहे. त्याचबरोबर निर्मिती कंपनी आहे. त्यात किती पदे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

रिक्त आहेत त्याची माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. त्या कंपनीतील रिक्रुटेड आकडा माझ्याकडे उपलब्ध आहे. यात अनुकंपा तत्वावर 77 कर्मचारी नेमले गेले आहेत आणि 1585 कर्मचारी प्रकल्पग्रस्त प्रवर्गातील नेमले गेले आहेत. या कर्मचा-यांपैकी आय.टी.आय.पास झालेले 402 कर्मचारी आहेत. या कंपन्यांमध्ये वेगवेगळया ग्रेडच्या जागा असतात. जे प्रशिक्षत ॲप्रेंटीस झ ाालेले बेरोजगार आहेत त्यांना सेवत कायम नोकरी द्यावयाची की नाही असा आजच्या लक्षवेधी सूचनेचा विषय आहे. परंतु या प्रशिक्षित ॲप्रेंटीस उमेदवारांना या कंपन्यांमध्ये प्राधान्य देण्याची भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे. पुन्हा सांगतो की, मॅटर ऑफ राईट असा त्यांचा हक्क होत नाही.

-----------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवी मुंबई येथे सिडकोने सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांसाठी भूखंड विक्रीस काढलेली जाहिरात चुकीची व फसवी असणे

**मु.शी.**: नवी मुंबई येथे सिडकोने सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांसाठी भूखंड विक्रीस काढलेली जाहिरात चुकीची व फसवी असणे या विषयासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे ( महाराष्ट्र विधानसभने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"नवी मुंबई येथे सिडकोने सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांसाठी भूखंड विक्रीस काढलेली जाहिरात चुकीची व फसवी असणे, जाहिरात दिलेल्या भूखंडावर अन्य संस्थांचा ताबा असणे, तसेच सिडकोने जाहिरात काढलेल्या जागेवर अगोदरच बांधकामे झालेली असणे, नवी मुंबईतील शेतक-यांच्याजमिनीसंपादित केल्या त्या प्रकल्पग्रस्तांच्याशिक्षण संस्थेला जागा देण्याबाबत माननीय मुख्यमंत्री यांनी 20 सप्टेंबर, 2007 रोजी घोषणा करणे, प्रकल्पग्रस्त शेतकरी यांच्या शिक्षण संस्थेला प्राधान्याने जागा देण्याची घोषणा करुन सुध्दा आता सिडकोने जाहिराती काढण्याचा घेतलेला निर्णय, त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतक-यांत पसरलेला तीव्र असंतोष, प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या शिक्षण संस्थेला भूखंड देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सिडकोकडून स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होत आहे म्हणून प्रकल्पग्रस्त गेले अनेक दिवस सिडकोचे अधिका-यांकडे, माननीय मुख्यमंत्र्यांकडे, नगरविकास राज्यमंत्री, यांच्याकडे आपल्या मागण्या मांडण्याच्या प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या मागण्यांकडे कोणत्याही स्तरावर लक्ष दिले गेले नाही म्हणून मला नाईलाजास्तव लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करावी लागली आहे. नवी मुंबई येथे सिडकोसाठी ज्यावेळी जमिनी संपादित केल्या, त्यावेळी सिडकोने त्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींना जाहिराती काढून दर दिले होते काय ? आज प्रकल्पग्रस्तांच्या शिक्षण संस्थेला भूखंड देताना जाहिरात काढली जाते. ज्यावेळी जमिनी संपादित केल्या होत्या त्यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींना जाहिराती काढून मोबदला दिला होता काय ? दुर्देवाची गोष्ट अशी की, नवी मुंबई येथील बरेच भूखंड मोठ मोठया शैक्षणिक संस्थांनी घेतलेले आहेत. आता त्या विभागात खरकटे भूखंड राहिलेले आहेत. ते खरकटे भूखंड प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणार आहे. आणि ते भूखंड प्रकल्पग्रस्तांना वितरित करण्यासाठी नवीन धोरण ठरविण्यात आले आहे. हे नवीन धोरण ठरविण्यासाठी जवळपास सिडकोला एक वर्षाचा कालावधी लागला. प्रकल्पग्रस्तांसाठी नवीन धोरण लवकर जाहीर करावे म्हणून मी सिडकोच्या अधिका-यांकडे जवळपास 100 भेटावयास गेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 13:45

लक्षवेधी सूचना क्र.4 पुढे सुरु...

श्रीमती मंदा म्हात्रे ....

परंतु या अधिकाऱ्यांना टेबलखालून पैसे घेऊन भूखंड देण्याची सवय लागलेली आहे. प्रकल्पग्रस्तांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मी ही लक्षवेधी सभागृहात आणलेली आहे. शासनाने धोरण बदलले त्याला एक वर्ष झाले. धोरण बदलल्यानंतर जाहिरात काढण्यासाठी 6 महिने गेले. जाहिरात काढल्यानंतर असे लक्षात आले की जाहिरातीमध्ये दिलेले भूखंड अगोदरच कुणाला तरी दिलेले होते आणि संबंधितांचे त्याठिकाणी बोर्डही लागलेले होते. जाहिरातीनंतर फॉर्म विकले गेले, फॉर्मचे पैसे घेतले गेले आणि लोकांच्या डोळयात धूळ फेकण्यात आली. सिडकोमध्ये एकेका विभागातील अधिकारी एकाच ठिकाणी 15/15 वर्षे आहेत. सोशल विभागामध्ये 15/15 वर्षे अधिकारी आहेत. त्यांना प्रकल्पग्रस्तांच्या परिस्थितीची जाणीव नाही. जे पैसे देतील त्यांना भूखंड दिले जात आहेत. सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून न्याय हवा आहे. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीची जाहिरात काढली होती त्यावेळी दर दिला होता काय ? प्रकल्पग्रस्तांच्या अधिकारावर गदा आणून जाहिरात काढली आहे त्या प्रकल्पग्रस्तांना शासन भूखंड देणार आहे काय ? प्रकल्पग्रस्तांनी जमीन दिली त्यावर टॉवर उभे राहिले. टॉवरवाला आला की त्याला ताबडतोब भूखंड आणि सामान्य माणूस गेला तर त्याला बसायला साधी खुर्ची देखील सिडकोच्या कार्यालयात मिळत नाही. तुमच्या संस्थेला अनुभव नाही म्हणून जागा देण्यात येत नाही असे सिडकोचे अधिकारी सांगतात. सिडकोने किती तरी भूखंड माजी एमडी आणि इतरांना दिलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, सिडकोने आता जी जाहिरात दिलेली आहे ती रद्द करण्यात येईल काय ? याबाबत फेरविचार करुन नव्याने प्रकल्पग्रस्तांचा विचार करुन भूखंड देण्यात येतील काय ? जर अशा प्रकारे प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नाही तर उपोषण करावे लागेल किंवा मोर्चा काढावा लागेल . प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होतो म्हणूनच जातीय दंगली निर्माण होतात. तसेच सिडकोमध्ये एकाच विभागात जे अधिकारी 15/15 वर्षे काम करीत आहेत त्यांना हटविले जाणार आहे काय ? तसेच सध्या जी जाहिरात काढली आहे त्याबाबत फेरविचार करुन नव्याने प्रकल्पग्रस्तांना भूखंड देण्यात येणार आहेत काय आणि किती कालावधीत हे भूखंड दिले जातील?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सिडकोच्या सोशल ॲमिनीटीज् मधील भूखंडाच्या संदर्भात तळमळीने विचार व्यक्त केले आणि मी

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 13:45

लक्षवेधी सूचना क्र. 4

श्री. राजेश टोपे ...

निश्चितप्रकारे त्यांच्या मताशी सहमत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात सहानुभूती असली पाहिजे इतकेच नव्हे तर तो त्यांचा हक्क आहे. सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी जाणीवपूर्वक ज्या लोकांच्या जमिनी सिडकोमध्ये गेलेल्या आहेत त्यांना अधिकचे पैसे मिळावेत यादृष्टीने साडेबाराटक्क्ेची योजना सुरु केली. सभापती महोदय, सोशल ॲमिनीटीज योजनेअंतर्गत भूखंड देताना पूर्वी पात्रतेचे जे निकष होते त्यानुसार शिक्षण संस्थेला किंवा सामाजिक संस्थेला किंवा महिलामंडळाला प्लॉट द्यावयाचे असतील तर अटी आणि शर्ती अशा होत्या की संबंधित संस्थेला 7 वर्षांचा अनुभव पाहिजे, शैक्षणिक संस्था असेल तर त्या संस्थेचा रिझल्ट 85 टक्के असला पाहिजे. प्रकल्पग्रस्तांना त्यामध्ये अट नव्हती. कोणत्या दृष्टीने त्यांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोनातून कोणतीही सवलत दिलेली नव्हती. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना अथवा त्यांच्या शिक्षण संस्थेला प्लॉट मिळणे अवघड होते. हे धोरण शासनाने बदलले. प्रोजेक्ट ॲफेक्टेड पर्सन म्हणजे पीएपींना प्लॉट देताना 12.5 टक्के आरक्षण ठेवण्यात आले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4.......... श्री.राजेश टोपे.....

ही अट त्यामध्ये अंतर्भूत केली. पूर्वी 7 वर्षाचा अनुभव, 85 टक्के निकाल या ज्या जाचक अटी होत्या त्या दूर करण्यात आल्या आणि आता ज्या संस्थांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे त्यांना 2 वर्षांचा अनुभव असेल तर ती संस्था पात्र होईल अशी दुसरी अट त्यामध्ये अंतर्भूत केली आहे आणि पूर्वीच्या अटींना शिथिलता देण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार सोशल ॲमेनिटीजच्या भूखंडाबाबत 12.5 टक्के आरक्षण ठेवले आहे, तो प्रकल्पग्रस्तांचा अधिकार आहे, तो अधिकार त्यांना मिळाला पाहिजे. त्या दृष्टीकोनातून शासनाने नवीन धोरण स्वीकारले आहे. जाहिरात काढण्याचा उद्देश एवढाच आहे की, ज्या प्रकल्पग्रस्तांची निवड करावयाची आहे त्यासंबंधी अनेक अडचणी येत असतात, त्यामुळे जाहिरात देऊन त्या माध्यमातून जे काही पात्र प्रकल्पग्रस्त 2 वर्षाच्या अटीमध्ये बसतील, त्यांच्यामधून ड्रॉ काढून त्यांना प्लॉट वितरित करण्याचा निर्णय घेण्यासाठी या धोरणाच्या अंतर्गत गाईडलाईन्स ठरविण्यात आलेल्या आहेत. जाहिरात रद्द न करण्याचे कारण असे की, शेवटी जे प्रकल्पग्रस्त इच्छुक असतील त्यांना त्या माध्यमातून अर्ज करता येईल. जाहिरातीच्या माध्यमातून 2 वर्षाच्या अटीमध्ये जे बसणार नाहीत, आर्थिकदृष्टया जे सक्षम नसतील त्यांना वगळून पारदर्शकपणे भूखंडाचे वाटप करता येईल. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, या धोरणामध्ये काही त्रुटी आहेत. शासन निश्चितपणे यामध्ये ओपन आहे. सन्माननीय सदस्या त्या भागातील असून त्या स्वत: प्रकल्पग्रस्त आहेत. जे नवीन धोरण स्वीकारले आहेत त्यामध्ये काही त्रुटी असतील तर शासन ओपन असून पुन्हा या संदर्भात फेरविचार करण्यास निश्चितपणे तयार आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, निवेदनात प्राधान्याने जागा देण्याची घोषणा असे म्हटले आहे. प्राधान्याने जागा देण्याऐवजी आरक्षण वाढविण्यात यावे आणि आतापर्यंत नवी मुंबईत आलेल्या शिक्षण संस्थांपैकी अनेक संस्था बाहेरुन आलेल्या आहेत. 12.5 टक्के सोशल ॲमेनिटीजचे भूखंड देणार असाल तर अधिक बरे आहे. ते आरक्षण 12.5 टक्क्यापेक्षा अधिक वाढवून देण्याच्या संदर्भात विचार केला पाहिजे. यापुढे नवी मुंबईत भूखंड स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या संस्थांना दिले तर हा असंतोष कमी होईल. त्या संदर्भात शासन विचार करील काय?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..



लक्षवेधी सूचना क्र.4..........

श्री.राजेश टोपे : मी यापूर्वीच उत्तरात सांगितले आहे की, प्रकल्पग्रस्तांना पूर्वी भूखंड मिळत नव्हते. आता डेव्हलपमेंट नोड आहेत त्यामध्ये सोशल ॲमेनिटीजचे जे प्लॉट करण्यात येतील त्यामध्ये 12.5 टक्के प्लॉट प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित राहिले पाहिजेत हेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे. यासाठी शासन ओपन आहे. टक्केवारी वाढवून देण्याच्या संदर्भात, जाहिरात रद्द करण्याच्या संदर्भात आणि ड्रॉ काढण्याची पध्दत बदलण्याच्या संदर्भात शासन ओपन असून निश्चितपणे याबाबत विचार करेल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाला वाचा फोडली आहे. सिडकोचे आतापर्यंतचे जे धोरण आहे ते तेथील स्थानिक जनता आहे, त्यांना मदत करण्याचे बिलकूल नाही हे मी अत्यंत जबाबदारीने सांगतो. अद्यापपर्यंत जे काही घडले ते लोकांनी सहन केले. यापुढे निदान त्याठिकाणच्या स्थानिक लोकांना प्राधान्याने जागा मिळणे अत्यावश्यक आहे. ही बाब मंत्रीमहोदयांनी देखील मान्य केली आहे. याठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या प्राधान्याबद्दल मंत्रीमहोदय बोलले आहेत. परंतु सिडको अधिकाऱ्यांच्या कारभाराने त्रस्त झालेल्या लोकांना पहिल्यांदा शासनाने दिलासा द्यावयाचा आहे. वर्षानुवर्षे त्याठिकाणी कार्यरत असलेले अधिकारी आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जी व्यथा मांडली त्याबाबत मी अधिक बोलणे उचित होणार नाही. परंतु त्याठिकाणी गैरव्यवहार झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती तपासून पाहिली पाहिजे. या संदर्भात निश्चितपणे लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, सध्या ज्या सोडती काढलेल्या आहेत त्या ताबडतोबीने थांबवाव्यात. तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे............

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

आपण मघाशी आदरणीय शरद पवारांचे नाव घेतले. त्यांनी देखील मुख्यमंत्री असताना तेथील लोकांना न्याय देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली परंतु त्यांना जे अभिप्रेत होते ते होत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या नावाखाली भलतेच लोक मलिदा खाऊन चालले आहेत आणि त्यांना सहाय्यभूत सिडकोच स्थानिक अधिकारी आहेत, हे मी जबाबदारीने सांगतो. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, हे भूखंड देण्यासाठी ज्या जाहिराती आपण काढलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी शक्यतो त्वरित स्थगित करुन तेथील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे, त्यांच्याशी विचार-विनिमय करावा. अणि या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना खऱ्या अर्थाने न्याय कसा देता येईल यासंबधी तातडीने पावले उचलावीत आणि वर्षानुवर्षे ज्या अधिकाऱ्यांनी आपले एक प्रकारचे संस्थान निर्माण केलेले आहेत त्यांच्याकडे जेवढे लक्ष घालून असे प्रकार पुन्हा उदभवू नयेत म्हणून उपाययोजना जरुर कराव्यात. कारण मी देखील ठाणे स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या वतीने येथे आलो असल्यामुळे कोठे काय चालले आहे हे मी नक्की सांगू शकतो. म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जी कारवाई करावयाची असेल ती सभागृहाला अवगत करावी, तोपर्यंत पुढील कार्यवाही थांबवावी अशी विनंतीवजा सूचना मी करीत आहे. अर्थात हा माझा निदेश नाही. परंतु जो भ्रष्टाचार या सिडकोमध्ये चालला आहे तो पहिल्यांदा थांबवावा तरच येथील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळेल. कारण खऱ्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याऐवजी या भागात एजंटच जास्त फिरत असतात. समजा आपल्याला सरळ मार्गाने एखादा भूखंड पाहिजे असला तर तो मिळणार नाही परंतु आपण एजंटामार्फत गेल्यानंतर मात्र हमखास आपल्याला भूखंड मिळतो, हे मी सिध्द करुन देईन. असे एजंट तेथे वावरत असतात.

श्री. राजेश टोपे : महोदय, आपण मुख्यत: दोन सूचना येथे केलेल्या आहेत. आम्ही जाहिरातीच्या माध्यमातून पाच प्लॉट्स देण्याची जी कार्यवाही सुरु केली आहे ती म्हणजे डेव्हलपमेंट नोडमध्ये ही सुरुवात झालेली आहे. यात काही बदल करावयाचा असला तरी आपल्याला तो करता येईल. त्याबाबत आपल्या व शासनाच्या सूचना सुध्दा सिडकोला कळविण्यात येतील आणि यासंदर्भात जी पॉलिसी शासन तयार करीत आहोत त्यासंबंधीचा निर्णय घेता येईल. तसेच ही जाहिरात निश्चित प्रकारे थांबवून त्याचबरोबर पुढील कार्यवाही विश्वासात घेऊन तसाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

समावेश त्यात करता येईल. आणि गैरव्यवहाराबाबत सांगावयाचे झाले तर अनेक वर्षांपासून एकाच जागेवर असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा एम.डी. आणि जॉइंट एम.डी. यांना सूचना देण्यात येतील व जास्तीत जास्त पारदर्शक कारभार कसा होईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

**उपसभापती** : मी शासनाचे आभार मानतो, कारण आज पहिल्यांदा कोणीतरी माझे ऐकले.

--------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : आमगांव, जिल्हा गोंदिया येथे वाढीव पाणीपुरवठा योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करुन नागरिकांची केलेली दिशाभूल.

**मु.शी** : आमगांव, जिल्हा गोंदिया येथे वाढीव पाणीपुरवठा योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करुन नागरिकांची केलेली दिशाभूल यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेअंतर्गत आमगांव, जिल्हा गोंदिया येथे वाढीव पाणी पुरवठा योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करणे, परंतु गावात विविध ठिकाणी पाण्याचे पाईप फुटलेले असून पाण्याचा पुरवठा न होणे, त्यामुळे परिसरातील जनता पिण्याच्या पाण्यापासून वंचित असणे, अशाप्रकारचे अपूर्ण काम असूनही पूर्ण झाल्याचे दाखवणे, तसेच सदर योजना ग्रामपंचायत, आमगांवला हस्तांतरीत झाली नसतांना सुध्दा ग्रामपंचायत आमगांवला हस्तांतरीत झालेली दाखवणे, प्रायोगिक तत्वावर चालविलेल्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचे वीज बील भरण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे असूनही ग्रामपंचायत आमगांवला वीज बील (रुपये ७२,८९२.६८/-) भरावयास पत्राद्वारे कळविण्यात येणे, अशाप्रकारे शासनाची व नागरिकांची केलेली दिशाभूल, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व यासंबंधात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो :-

निवेदनातील चवथ्या ओळीत "दि. 10.4.2007 ऐवजी 10.08.2006" असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सुधारल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आमगाव हे शहर 30 हजार लोकवस्तीचे शहर असून पाणीपुरवठ्याच्या संदर्भात मी गेल्या तीन अधिवेशनांपासून तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून न्याय मागण्याचा प्रयत्न करीत आहे. हा प्रश्न वारंवार उपस्थित करुन देखील अद्यापही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. खऱ्या अर्थाने या ठिकाणची पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित झालेली नाही याचे कारण मी थोडक्यात सांगू इच्छितो. कारण तेथील फिल्टर प्लांट चालविण्याकरिता ग्रामपंचायतीकडे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाहीत. फिल्टर प्लांटद्वारे पाणी बरोबर मिळत नाही तसेच विद्युत बिलाची देयके दोन ठिकाणी असून त्यात एक अशुध्द पाण्याचे वाटप यासंबंधीचे असून त्याचे बिल ग्रामपंचायत भरते....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

प्राधिकरणाने जी ट्रायल घेतलेली आहे त्याचे बील शासनाने भरावयाचे आहे. या ठिकाणचे काम अपूर्ण झालेले आहे परंतु निवेदनात म्हटले आहे की, 30.6.2006 मध्ये सदर काम पूर्ण करण्यात आल्या नंतर ट्रायल घेण्यात आलेली आहे. सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे जागोजागी पाईप फुटलेले आहेत त्यामुळे त्याची दुरुस्ती करणे महागडे असल्यामुळे ग्रामपंचायत दुरुस्ती करु शकत नाही इत्यादी कारणामुळे सदर योजना ग्रामपंचायत चालविण्यास असमर्थ आहे. ग्रामपंचायतीने असे म्हटलेले आहे की, जीवन प्राधिकरण जर ही योजना चालवित असेल तर पाणीपट्टी वसूल करुन ती भरण्यास ग्रामपंचायत तयार आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, योजना पूर्ण करुन दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेला हस्तांतरीत करावयाची आहे. अजून ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित झालेली नाही म्हणून उर्वरित असलेलें बील 75,790 रुपये शासन उपाययोजना करुन भरेल काय ? सदर योजनेच्या कामाला 1992 मध्ये सुरुवात करण्यात आली होती व ही योजना 2006 मध्ये पूर्ण झालेली आहे. त्यामुळे आमगाव ग्रामपंचायतीच्या जनतेला फिल्टर झालेले पिण्याचे शुध्द पाणी किती दिवसात मिळणार आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आमगाव पाणीपुरवठा योजनेचे पूर्ण काम सन 2004 मध्ये पूर्ण झाले होते. 30.6.2004 ते 15.6.2005 पर्यंत ही योजना जीवन प्राधिकरण चालवित होते. ट्रायलचा कालावधी हा दोन महिन्याचा होता. ट्रायल झाल्यानंतर सुध्दा ग्रामपंचायत ही योजना टेकओव्हर करीत नव्हती. जेव्हा जीवन प्राधिकरणाने ही योजना हस्तांतरित केली तेव्हा त्यांच्याकडचे जे थकित बील आहे त्यामध्ये एमएसईबीचे बील धरुन पूर्ण अपटूडेट करुन हस्तांतरीत केले गेले.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, सदर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेली नाही. या ठिकाणच्या ठेकेदाराने 40 हजार रुपये बील देण्याचा प्रस्ताव सरपंचाला दिला होता.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य जर एखादी माहिती देत असेल तर ती सत्य मानून त्याची चौकशी केली जात असते ही या सभागृहाची प्रथा आहे. सन्माननीय सदस्य माहिती देत आहे की, सदर योजना हस्तांतरीत झालेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता .....

नाही व माननीय मंत्रीमहोदय म्हणतात की, ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर हे त्या गावातील रहिवासी आहेत म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी माहिती दिलेली आहे ती सत्य मानून त्या पध्दतीने कार्यवाही केली पाहिजे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी सांगितले आहे की, ही योजना ग्रामपंचायतीने टेक ओव्हर केलेली नाही. परंतु ही योजना आमगाव ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुरु करुन या योजनेची ट्रायल घेतली व त्यानंतर या योजनेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ग्रामपंचायतीला ही योजना हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला, इन्सपेक्शन केले तेव्हा ग्रामपंचायतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला असे सांगितले होते की, ही योजना तुम्हीच चालवा आणि तुम्हीच पैसे वसूल करा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही देखभाल व दुरुस्तीचे काम करु शकते परंतु पैसे वसूल करण्याचे काम करु शकत नाही. पैसे वसूल करण्याचे काम ग्रामसेवक करीत असतात. एमजेपीने स्पष्टपणे सांगितले होते की, आम्ही योजना बांधणार, ट्रायल करुन मग योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करुन देणार. असे असतांनाही एक वर्षापर्यंत आमगाव ग्रामपंचायतीने टाळाटाळ केली. परंतु नंतर बैठक घेऊन ही योजना आमगाव ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्यात आली.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..

सभापती महोदय, या योजनेचे दोन भाग आहेत. एक भाग म्हणजे स्त्रोतापासून अशुध्द पाणी पंप करुन ते फिल्टरेशन प्लॅन्टपर्यंत आणावयाचे तेथे हे पाणी फिल्टर करावयाचे आणि दुसरा भाग म्हणजे फिल्टरेशन प्लॅन्टपासून हे पाणी पुन्हा पप करुन गावाला पुरवावयाचे. ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केल्यानंतर, एक वर्षापर्यत एम.जे.पी. ही योजना चालवत होती. त्यावेळी ग्रामपंचायत टॅक्स वसूल करीत होती परंतु तरीसुध्दा त्यांनी एम.जे.पी.ला एक पैसासुध्दा दिला नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही योजना ग्रामपचांयतीकडे हस्तांतरित केल्यानंतर आणि एक वर्ष झााल्यानंतर एम.जे.पी.ने स्पष्टपणे त्यांना सागितले की, ही योजना आम्ही चालवू शकत नाही कारण योजना चालविण्यासाठी त्याचे बिल द्यावे लागते. जोपर्यत एम.जे.पी. ही योजना चालवत होते तोपर्यत एम.एस.ई.बी.चे बिल देऊन एम.जे.पी.ने ग्रामपंचायतीकडे ही योजना हस्तांतरित केली होती. त्यानंतरच्या 3 वर्षाच्या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीने आजपर्यंत एक पैसासुध्दा एम.एस.ई.बी.ला दिलेला नाही. जवळजवळ 51 हजार रुपयाचे त्यांचे बिल थकलेले होते. श्री. भैरसिंग नागपुरे हे आमगावचे आमदार आहेत त्यांनी ग्रामपचायत, एम.जे.पी. आणि एम.एस.ई.बी .यांची एक बैठक धेतली होती. पावसाळयामध्ये गढूळ पाणी येत होते आणि एम.जे.पी.ने फिल्टरेशन प्लॅन्टचा मोटार पंप बंद केला होता. ही बैठक घेतल्यानंतर 20 हजार रुपयाचे बिल ग्रामपंचायतीने भरले होते त्या बैठकीमध्ये असेही ठरले होते की, राहिलेली रक्कम हप्त्या हप्त्याने ग्रामपंचायतीने भरावयाची. आतापर्यंत त्या योजनेच्या फिल्टरेशन प्लॅन्टचे ग्रामपंचायतीने कोणतेही पैसे दिलेले नाहीत. आता पर्यतचे जवळजवळ 72 हजार रुपये थकीत बिल आहे. या ग्रामपंचायतीला अपेक्षित उत्पन्न काहीही नाही असे नाही. मी आपल्याला काही आकडेवारी सांगतो. 2005-2006 साली त्या ग्रामपंचायतीचे अपेक्षित उत्पन्न 3 लाख 35 हजार रुपये होते. त्यापैकी त्यांनी 1 लाख 86 हजार रुपये वसूल केले हे प्रमाण 55 टक्के येते. 2006-2007 साली 4 लाख 30 हजार अपेक्षित उत्पन्न होते. त्यांनी 1 लाख 63 हजार रुपये वसूल केले होते हे प्रमाण 38 टक्के येते. 2007-2008 साली 5 लाख रुपये वसूल करावयास पाहिजे होते त्यांनी 1 लाख 35 हजार रुपये वसूल केले होते हे प्रमाण 27 टक्के आहे. या ग्रामपंचायतीकडून पैशाची वसूली होत नाही. असा प्रश्न यामध्ये निर्माण झाला आहे त्यांचे मेटेनन्सचे बिल 2 लाख रुपयांचे आहे. आणि एम.एस.ई.बी.चे बिल दर वर्षीचे 50 हजार रुपये आहे. परंतु जो पर्यंत ही ग्रामपंचायत पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..

वसूल करणार नाही आणि थकित बिल देणार नाही तोपर्यंत ही योजना कशी चालणार ? या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मला सन्माननीय सदस्यांना असे सांगावयाचे आहे की, त्यांच्याच गावातील ही योजना आहे तेव्हा हे पैसे वसूल करुन थकित बिल भरल्यानंतर फिल्टरेशन प्लॅन्ट सुरु करण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, आम्हाला अशुध्द पाणी प्यावे लागत आहे. मला देखील तेच पाणी प्यावे लागत आहे. तेव्हा यावर उपाययोजना करण्यता यावी.

श्री.रणजित कांबळे : 3 वर्षापूवी् त्या ग्रामपंचायतीचे 30 रुपयाचे थकित बिल होते. एम.एस.ई.बी.ने हे पैसे भरण्यासाठी त्यांना हप्ते ठरवून दिले होते. 30 हजार रुपये भरुन फिल्टरेशन प्लॅन्टची मोटार आपण चालू करु शकत होता. आपल्याला शुध्द पाणी हवे आहे तेव्हा शुध्द पाणी मिळण्यासाठी आपली जी काही किमान जबाबदारी आहे ते आपण पार पाडावी अशी मी माननीय सभापतींच्या मार्फत सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, दिनांक 30 जून 2006 ला ही योजना पूर्ण झाली होती. ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तातरित झाली आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले परंतु ही योजना हस्तांतरित झालेली नाही असे ग्रामपंचायतीचे पत्र माझ्याकडे आहे. ही योजना त्यांच्याकडे हस्तांतरित झालेलीच नाही. तेव्हा या मुद्यासंबंधी आपण सोक्षमोक्ष लावावा तसेच हे बिल शासनाने भरावे आणि ही योजना पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने आम्हाला अर्थसहाय्य करावे अशी मी विनंती करतो

श्री.रणजित कांबळे : अनेक वर्षापासून ग्रामपंचायत ही योजना चालवत आहे.त्यांनी आतापर्यंत एम.एस.ई.बी.चे एकही बिल दिलेले नाही. दरवर्षी या ग्रामपंचायतीने किती रककम वसूल करावयास पाहिजे होती आणि त्यांनी किती रक्कम वसूल केलेली आहे याबाबतीत मी आताच सभागृहाला माहिती दिलेली आहे. एम.एस.ई.बी.चे त्यांचे बिल 50 हजार रुपयांचे आहे तेव्हा हे बिल ग्रामपचांयतीने भरावे. योजना तयार करण्यासाठी शासन त्यांना मदत करणार असून ही योजना शासन तयार करणार आणि त्यानंतर ग्रामपंचायतीकडे हस्तंतरित करणार अशा प्रकारे शासनाचे धोरण अत्यंत स्पष्ट आहे.ग्रामपंचायत ही एक स्थानिक स्वराज्य संस्था आहे योजना तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे..

केल्यानंतर ही योजना व्यवस्थितपणे चालवली पाहिजे ही त्या ग्रामपंचायतीची सुध्दा जबाबदारी आहे. पाण्याच्या घरगुती कनेक्शनचा दर 360 रुपये असून स्टॅन्ड पोस्टचा दर 75 रुपये आहे आपल्याला जेव्हा एखादी योजना चालवावयाची असते तेव्हा किमान तेवढे पैसे वसूल झाले पाहिजे..

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता )**

नंतर श्री.सुंबरे .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री येथे जे काही सांगत आहेत ते सर्व ठीक आहे. म्हणजे राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केलेली आहे आणि ती चालविताना एक वर्षाच्या काळातील सदर योजनेचे 75 हजार रूपये बिल झालेले आहे जे अजूनही ग्रामपंचायतीने भरलेले नाही. परंतु या संदर्भात तेथील ग्रामसेवक, जो सरकारचाच माणूस आहे, अधिकारी आहे त्याने मात्र लिहून दिलेले आहे की, ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरितच झालेली नाही. तसे असेल तर मात्र हे पैसे एमजीपीने भरले पाहिजेत. तेव्हा आता येथे एक वेगळाच प्रश्न निर्माण झालेला आहे. ग्रामसेवक अशा प्रकारे असत्य पत्र देत असेल तर त्याबाबत शहानिशा करून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि यामध्ये ग्रामसेवक सत्य असेल तर मंत्री महोदयांना जी माहिती येथील अधिकाऱ्यांनी दिली आहे ती असत्य आहे असे समजावी लागेल आणि त्याबद्दल मग त्यांच्यावर कारवाई करावी लागेल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी हा विषय उपस्थित का केला ? तर जी योजना त्यांच्या ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेलीच नाही तिचे बिल ग्रामपंचायतीकडे मागितले जात आहे म्हणून आता ते पैसे एमजीपीने द्यावेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तेव्हा सदरहू योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेली आहे किंवा नाही याबाबत मंत्री महोदयांना त्यांचे अधिकारी खरे सांगत आहेत की, ग्रामसेवक जे पत्र देतो आहे ते खरे आहे हा या ठिकाणी प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा अगोदर याबाबत आपण मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे असे मला या ठिकाणी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे. म्हणून सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना एक दिवसासाठी आपण रोखून ठेवावी. यामध्ये माननीय राज्यमंत्री समाधानकारक उत्तर देत आहेत म्हणून लक्षवेधी सूचना रोखून धरण्यास आम्ही सांगत नाही तर वस्तुस्थिती नेमकी काय आहे ते समजून घेण्यासाठी म्हणून ती रोखून धरावी अशी आमची मागणी आहे. यात माननीय राज्यमंत्र्यांनी वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. त्यांनी उद्यापर्यंत या बाबत शहानिशा करून घ्यावी आणि यात ग्रामसेवक दोषी असेल तर त्याला निलंबित करून ही लक्षवेधी सूचना उद्या पुन्हा घ्यावी. मात्र ग्रामसेवक यात सत्य असेल तर आपल्यमार्फत या सदनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आपल्या ज्या अधिकाऱ्यांनी केला आहे त्यांच्यावर आपण कारवाई केली पाहिजे. शेवटी या ठिकाणी सन्माननीय सदस्य जी माहिती देतात, जे सांगतात ते खरे मानले जाते. तसेच मंत्र्यांकडून जी

...... एए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

माहिती दिली जाते ती तर अगदी 100 टक्के सत्य असणार. पण याबाबतच आता संभ्रम निर्माण झाला आहे आणि या तिढ्यामुळे नागरिकांना त्रास होतो आहे तो कोणी सोडवावयाचा हा प्रश्न आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, येथे प्रश्न तो नाही. ही योजना सध्या बंद आहे हे सत्य आहे. त्याचे कारण असे आहे की, गेल्या तीन वर्षांपासून ती योजना ग्रामपंचायत चालवित आहे आणि कर वसूल करीत आहे. त्याचे 30 हजार रूपयांचे विजेचे बिल होते तेही अगोदर भरले गेले नव्हते ते आता वाढून 72 हजार रूपये झालेले आहे. ग्रामपंचायत ही जी योजना चालवत आहे तेथे दोन मीटर्स आहेत एक रॉ वॉटरसाठीचे आणि दुसरे फिल्ट्रेशन प्लँटसाठीचे आहे. ..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही माननीय राज्यमंत्र्यांवर अविश्वास दाखवत नाही. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत तेही सत्य आहे हे आपण नेहमीच मानतो. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री सभागृहाचे समाधान करू शकत नाही म्हणून ही लक्षवेधी सूचना रोखून धरावी अशी आमची विनंती नाही...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न काय आहे ? ही योजना बंद आहे काय ? असल्यास का बंद आहे ? हा प्रश्न आहे. आता ग्रामसेवकाने पत्र दिले आहे असे सांगण्यात आले. पण गेल्या तीन वर्षांपासून ही योजना ग्रामपंचायत चालवित आहे. तेव्हा या प्रकरणात ग्रामसेवक आणि आमचे अधिकारी यांनी दिलेल्या माहितीची शहानिशा मी करणारच आहे. परंतु त्यासाठी ही लक्षवेधी सूचना रोखून ठेवण्याची गरज नाही. मी आपल्याला इतकेच सांगू इच्छितो की, गेल्या 3 वर्षांपासून या योजनेचे वीज बिलाचे पैसे ग्रामपंचायतीने भरलेले नाहीत हे सत्य आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना येथे मांडली आहे ते त्याच गावचे आहेत आणि ते त्या गावातील रहिवासी असल्याने ते सांगत असलेले सत्य आहे असे निश्चितपणे वाटते. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण रोखून ठेवावी. जेणे करून यातील जे सत्य आहे ते सदनासमोर यावे. कारण आता 75 हजार रूपयांचा प्रश्न आहे. खेडेगावात एवढा कर वसूल होत नाही व ग्रामपंचायत इतके पैसे भरू शकत नाही. परिणामी ही योजना चालू राहणे शक्य नाही. ही योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यातच आलेली नसेल वा ग्रामपंचायतीने ती ताब्यातच घेतली नसेल तर मग या बिलाची रक्कम ही एमजीपीने ताबडतोब भरून संबंधित ग्रामपंचायतीला ती हस्तांतरित करावी. (यानंतर श्री.सरफरे...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे अपेक्षित रिकव्हरी 5 लाखाची असून त्यांच्याकडून 1 लाख 35 हजार वसूल झाले आहेत...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाचे एक अधिकारी सांगत आहेत की, ही योजना हस्तांतरीत झालेली नाही. त्यामुळे याबाबत सभागृहाची दिशाभूल होत असल्यामुळे आपण हे निवेदन राखून ठेवावे...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे निवेदन कोणत्या कारणासाठी राखून ठेवावे याचे कारण मला समजत नाही?

**तालिका सभापती (श्री. जगदीश गुप्ता)** : तेथील ग्रामसेवकाचे पत्र माझ्याकडे आले आहे.त्यानुसार त्यांचे म्हणणे असे आहे की, ही योजना हस्तांतरीत झालेली नाही. त्यामुळे ही योजना नेमकी कोणती एजन्सी चालविणार आहे याची माहिती सभागृहाला समजली पाहिजे. यासंबंधी आपण उद्या संपूर्ण माहिती घेऊन सभागृहासमोर यावे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही सन 2004 मधील योजना आहे...

**तालिका सभापती** : ही योजना आमच्याकडे नाही अशाप्रकारे आपले अधिकारी माहिती सांगत असतील तर सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची माहिती येईल. त्यामुळे हे निवेदन चुकीचे असल्यामुळे उद्या सत्य निवेदन आपण सभागृहासमोर ठेवावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : परभणी येथील शासकीय दूध शाळेमध्ये होत असलेली दूध भेसळ

मु.शी. : परभणी येथील शासकीय दूध शाळेमध्ये होत असलेली दूध भेसळ यासंबंधी श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय दत्त, मुझफ्फर हुसेन सय्यद, गोविंदराव आदिक, चंद्रकांत रघुवंशी, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मांडण्यापूर्वी माझा आक्षेप मला नोंदवावयाचा आहे. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर माननीय ऊर्जा मंत्री निवेदन करणार आहेत. माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांच्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर माननीय नगर विकास मंत्री निवेदन करणार आहेत. माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांच्या लक्षवेधी सूचनेवर माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उत्तर देणार आहेत. परंतु माझ्या लक्षवेधी सूचनेवर निवेदन करणाऱ्या मंत्र्यांच्या खात्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे माझ्या लक्षवेधी सूचनेचा मायबाप कोण आहे?

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचनेवरील निवेदन शासनाकडून करण्यात येत असल्यामुळे यासंबंधी शासनाने दक्षता घेतली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या लक्षवेधी सूचनेवरील उपप्रश्नांना कोणत्या खात्याचे मंत्री उत्तर देणार आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. या लक्षवेधीमध्ये अन्न भेसळीचा विषय अंतर्भूत आहे. तेव्हा भेसळ मंत्री उत्तर देणार आहेत काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची नोंद होऊ नये अशी माझी आपणास विनंती आहे. "भेसळ मंत्री" अशाप्रकारचे नवीन खाते निर्माण करणे बरोबर नाही. माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना मांडावी, उत्तर देणारे संबंधित मंत्री कोण आहेत हे त्यांना समजेलच.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ठीक आहे. मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

"परभणी, येथील शासकीय दूध शाळेत तेथील अधिकारी, डेअरी केमिस्ट व इतर कर्मचारी हे दुधात पावडर, साखर, कॉस्टिक सोडा मिसळून करीत असलेली भेसळ, सदरहू दूध परभणी शासकीय दुग्ध शाळेमधून जिंतूर, हिंगोली, पाथरी व गंगाखेड येथे आणण्यात येत असतांना सदर हजारो लिटर दूधात करण्यात येत असलेली भेसळ, त्याबाबत शासनाकडे करण्यात आलेल्या तक्रारी, त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, तेथील पावडर विक्रेत्यांकडून परभणी दूग्ध शाळेतील अधिकारी दूधात भेसळ करण्यासाठी पावडर विकत घेत असणे, या गंभीर प्रकाराकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने दूध भेसळ हा अजामीनपात्र गुन्हा केल्याने सदर गुन्हयांतर्गत संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, संबंधितांवर कारवाई होत नसल्याने जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिस अहमद (दुग्धविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून परभणी जिल्हयामध्ये दूधामध्ये भेसळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एका गँगच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. याठिकाणी भेसळ करणारे जे कर्मचारी आहेत त्यामध्ये 1) श्री. तळेगावकर 2) शेख जावेद अख्तर 3) सहदेव कोळी 4) जालींदर उबाळे आणि 5) मानीक अवचार यांना निलंबित करण्यात आले आहे. मला याबाबत विचारावयाचे आहे की, या कर्मचाऱ्यांना कोण पाठीशी घालीत होते? माझ्याकडे श्री. आडे, प्रादेशिक अधिकारी यांचा चौकशी अहवाल आहे. शासनाने त्यांच्याकडून अहवाल मागितला. या अहवालामध्ये श्री. आडे यांनी संपूर्ण भेसळीच्या भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचे काम केले आहे. अहवालात असे म्हटले आहे की, "योजनाप्रमुख श्री. मोरे यांना बदनाम करण्याच्या हेतूने वरील प्रकरण घडवून आणले. आणि वर्तमानत्रामध्ये छापून आलेली बातमी वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे सिध्द होते." अशाप्रकारे श्री. आडे यांनी श्री. मोरे यांना पाठीशी घालणारा अहवाल दिला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

शासनाने हा अहवाल आल्यानंतर तेथे दक्षता अधिकाऱ्यांचे पथक गेले आणि त्यांनी जो अहवाल दिलेला आहे, तो माझ्या हातामध्ये आहे. त्या अहवालानुसार कोण-कोण दोषी आहेत, हे सिध्द झालेले आहे. याचा अर्थ श्री.आडे यांनी श्री.मोरे यांना पाठिशी घालण्यासाठी शासनाची दिशाभूल केली आहे. असत्य अहवाल दिला आहे, त्यामुळे ते देखील यामध्ये दोषी आहेत हे आपल्याला मान्य करावे लागेल. त्यामुळे कृपा करुन तुम्ही त्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करु नका. माझा पहिला प्रश्न असा आहे की, श्री.आडे यांनी असत्य अहवाल दिला आहे, त्याबद्दल शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय ? मी माननीय मंत्री महोदयांना पॉईंटेड प्रश्न विचारीत आहे. त्यामुळे त्यांनी तातडीने कारवाई करावी अशी अपेक्षा आहे. दक्षता अधिकाऱ्यांच्या अहवालामध्ये जी नावे देण्यात आली आहेत, त्यानुसार 1) श्री.तळेगांवकर 2) श्री.अख्तर 3) श्री.कोळी 4) श्री.उबाळे 5) श्री.अवचार यांना निलंबित केले आहे आणि आता जीवावर आले म्हणून शेवटी काल श्री.मोरे यांना देखील निलंबित केले आहे.

श्री.विक्रम काळे (खाली बसून) : याठिकाणी निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे श्री.मोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येत आहे. म्हणजे अजून निलंबित केलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री.मोरे यांच्या संबंधातील कारवाई काल केली असेल असे मी गृहीत धरतो. जर याबाबतीत काल कारवाई केली नसेल तर मग माननीय मंत्री महोदयांना सांगावे लागेल की, श्री.मोरे यांच्या संबंधात आज कारवाई करु. तसेच मी याठिकाणी सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. अहवालामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "या व्यतिरिक्त या योजनेमध्ये कार्यरत असलेले 1) श्री.एस.एस.देशपांडे, पाळी व्यवस्थापक, 2) श्री.डी.एम.निर्मळे, सहाय्यक गुण नियंत्रण अधिारी व 3) श्री.डी.एम.पवार, नमुनाकार यांना योजनेत संकलित होणाऱ्या दुधात गैरप्रकार करण्याच्या हेतूने श्री.तळेगांवकर यांनी पावडरची बॅग आणून ठेवलेली होती. याची कल्पना असतानाही त्यांनी या घटनेस विरोध केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे त्यांचाही गैरप्रकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठिंबा असावा असे गृहीत धरुन त्यांचेकडून प्रशासन स्तरावरुन खुलासे मागविण्यात येऊन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी असे प्रस्तावित आहे." असा निर्णय दिलेला आहे. या अहवालाच्या माध्यमातून ज्या संबंधित 5 कर्मचाऱ्यांना आणि श्री.मोरे यांना निलंबित करण्याचे सुतोवाच केले ...

. . . .2 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आहे, त्या व्यतिरिक्त हे तीन अधिकारी आहेत. या तीन अधिकाऱ्यांसंदर्भात कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? जर एका अहवालाच्या आधारावर पाच अधिकाऱ्यांवर कारवाई केल्यानंतर बाकीच्या तीन अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात की नाही ? तसेच श्री.मोरे यांना पाठीशी घालण्याकरता श्री.आडे यांनी जो चुकीचा अहवाल दिला आहे, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच त्यांना निलंबित केल्यानंतर परभणी येथील कार्यालयामध्ये येऊन उद्योग करु नयेत, यासाठी त्यांचे मुख्यालय बदलणार आहात काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, यह बहुत गंभीर विषय है और सरकार इसमें पहले से ही कोशिश कर रही है कि किस भी तरीके से महाराष्ट्र में दूध में भेसळ नहीं होनी चाहिए. भेसळ रोकने के लिए हमारे डिपार्टमेंट ने बार बार कोशिश की है. इसीलिए हमने "प्रिवेंशन ऑफ फूड एडल्ट्रेशन एक्ट 1954 में 15 जनवरी 2008 को अमेंडमेंट किया है और दूध में भेसळ करने के अपराध को गैर जमानती बनाया है. माननीय सदस्य ने कहा है कि सरकार ने क्या एक्शन लिया है तो मैं उनको बताना चाहता हूँ कि 25 नवम्बर 2007 डेयरी कमिश्नर ने 5 लोगों को सस्पेंड किया है. उनके नाम इस प्रकार हैं (1) श्री. व्यकंटेश माधवाचार्य तळेगांवकर, (2) श्री. शेख जावेद अख्तर, (3) श्री. सहदेव नामदेव कोळी, (4) श्री. जालींदर गोखनाथ उबाळे, (5) श्री. मानीक देवराव अवचार.

सभापति महोदय, इसमें ठीक तरीके से निर्णय लिया है या नहीं, किस किस के ऊपर एक्शन लेना चाहिए, इसके बारे में बराबर निर्णय लिया है या नहीं, यह जानने के लिए मैंने पूरी फाइल मंगाकर जांच की है. मैंने यह पाया डेयरी मेनेजर के ऊपर भी जबाबदारी आनी चाहिए. माननीय सदस्य ने भी प्रश्न पूछा है कि श्री. मोरे के बारे में क्या एक्शन लिया है. मैं उनको बताना चाहता हूँ कि 5 लोगों के ऊपर एक्शन लेने के साथ साथ श्री बी.एस. मोरे के ऊपर भी एक्शन लिया गया है.

श्री. दिवाकर रावते : आपने श्री. मोरे को निलंबित किया है या नहीं ?

श्री. अनिस अहमद : उनको निलंबित किया जाएगा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघाशी जो प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर अजून माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. त्यांनी केवळ लक्षवेधी सूचनेचे निवेदन वाचून दाखविले आहे. ज्या अहवालातील अधिकाऱ्यांची नावे मी आपणास वाचून दाखविले होती. त्या अधिकाऱ्यांचे आपण निलंबन करणार आहे काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. श्री.एस.एस देशपांडे, श्री.डी. एम.पवार, श्री. डी.एस निर्मळ यांनी दिलेल्या अहवालामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, त्यांनी मदत केलेली आहे. तसेच त्यांच्यावर तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले होते. श्री. आडे यांनी श्री. बी.एम. मोरे यांना पाठीशी घालणारा चुकीचा अहवाल दिलेला आहे त्या संबंधी कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, अगर किसी अधिकारी ने ऐसा कोई गलत अहवाल दिया है तो डेयरी कमिश्नर से उसकी जांच कराई जाएगी और जिस प्रकार से दूसरे लोगों पर कार्रवाई की है, वैसे ही इनके ऊपर भी कार्रवाई की जाएगी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझा मुद्दा समजून घ्यावा. आपण कोणाला पाठीशी घालत आहात असा मी आक्षेप घेतलेला नाही. आपण श्री. मोरे यांना निलंबित केलेले आहे. ज्या अहवालाच्या आधारावर आपण सहा जणांना निलंबित केलेले आहे त्याच अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "कार्यरत असणारे श्री. एस.एस. देशपांडे, पाळी व्यवस्थापक, श्री. डी.एम निर्मळे, सहाय्यक गुण नियंत्रण अधिकारी व श्री. डी. एम. पवार, नमुनाकार यांना योजनेत संकलित होणाऱ्या दुधात गैरप्रकार करण्याच्या हेतून श्री. तळेगावकर यांनी पावडरची बॅग आणून ठेवलेली आहे याची कल्पना असतानाही त्यांनी या घटनेस विरोध केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे त्याचाही गैरप्रकार करणाऱ्या कर्मचाऱ्यास पाठिंबा असावा असे गृहीत धरुन त्यांचेकडून प्रशासन स्तरावरुन खुलासे मागविण्यात येवून त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी असे प्रस्तावित आहे." या संबंधी खुलासा मागविण्यात आला होता. या घटनेला आता सात ते आठ महिने झालेले आहेत. लक्षवेधीची सूचना सभागृहात आल्यावर ज्या प्रमाणे आपण श्री. मोरे यांच्यावर कारवाई केलेली आहे त्याचप्रमाणे इतर अधिकाऱ्यांवरही ताबडतोब निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. अन्यथा एकाला न्याय व दुसऱ्यावर अन्याय केल्यासारखे होईल. श्री. आडे यांना शो कॉज नोटीस देण्यात येईल असे आपण जाहीर करावे. आपण आता पाच कर्मचाऱ्यांना निलंबित केलेले आहे मग उर्वरित तीन कर्मचाऱ्यांना देखील निलंबित केले जाणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मैंने पहले ही बताया है कि 5 लोगों के ऊपर एक्शन लिया गया है. इसके अलावा श्री. मोरे के ऊपर एक्शन लेने की जिम्मेदारी मैंने ली है. माननीय सदस्य और भी कुछ लोगों के नाम ले रहे हैं. अगर वे इसमें शामिल होंगे तो मैंने पहले ही उनके ऊपर कार्रवाई करने के बारे में कहा है.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापति (श्री. जगदीश गुप्ता)** : आपने 5 लोगों के ऊपर कार्रवाई की है. उसी अहवाल के आधार पर माननीय सदस्य और 3 लोगों के नाम ले रहे हैं. आप उनके बारे में उत्तर दीजिए.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अहवालात चुकीचे नाव आहे असे जाहीर करावे.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, अहवाल गलत है, ऐसा मैंने नहीं बोला है. जो लोग सीधे तौर पर इसमें शामिल थे, उनको निलंबित किया गया है. इनके अलावा जिन लोगों के नाम इसमें शामिल है, उनको किस तरह का पनिशमेंट देना चाहिए, इसके लिए डिपार्टमेंटल इन्क्वायरी होना आवश्यक है और यह मेरी जिम्मेदारी है. छोटे से गुनाह के लिए अगर किसी को सस्पेंड करेंगे तो हमारे पास अधिकारी बहुत कम हैं.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी जबाबदारीने वक्तव्य करीत आहे. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी होंगे, देंगे, देखेंगे असे किंवा सांगू शकत नाही असे उत्तर देत आहेत. त्यांच्या विभागाला प्राप्त झालेल्या अहवालाचा मी येथे निर्वाळा देत आहे. या अहवालासंबंधी अधिक माहिती घेण्याकरिता त्यांनी सभागृह पाच मिनिटे तहकूब करावे. मी त्यांना हा अहवाल दाखवितो. या अहवालामध्ये नावे नसतील तर मी माझे एलिगेशन मागे घेईन.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

परंतु त्या अहवालातील 5 अधिका-यांना निलंबित केले जाते आणि आता आपण म्हणत आहात की, मी तपास करतो. हा अहवाल ऑक्टोबर, 2007 रोजी सादर झालेला आहे. मार्च महिन्यापर्यंत त्याला आता सहा महिने झालेले आहेत, या कालावधीत शासनाने तपास का केला नाही असा प्रश्न निर्माण होतो. या अधिका-यांना पाठिशी घालण्याचा सरकारचा विचार आहे काय ? ज्या अहवालाच्या आधारावर 5 जणांना निलंबित केले आहे त्याच अहवालाच्या आधारे उर्वरित 3 जणांना निलंबित का केले जात नाही ? अहवाल सादर होऊन सहा महिन्याचा कालावधी लोटलेला आहे. त्यांना पाठिशी घातले जात आहे असा आक्षेप आपण स्वत:वर घेऊ नये. कारण हे अधिकारी तुमचे आणि आमचे कोणी लागत नाहीत. सरकारला आणि जनतेला हे बुडविणारे आहेत. त्यामुळे त्यांना पाठिशी घालण्याचे काम शासनाने करु नये. या अहवालात नमूद केलेल्या उर्वरित 3 जणांना निलंबित करण्याची आणि श्री.आडे यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची कारवाई केली जाईल काय ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, 4 लोगों को शो कॉज नोटिस देकर उनकी डिपार्टमेंटल इक्वायरी करेंगे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ. शी**. : सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील बीड जिल्हयाच्या कंत्राटदाराने बी.पी.एल. व अंत्योदय योजनेतील गहू व तांदूळ पुरविण्यासंबंधी केलेला घोटाळा

**मु. शी**. : सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील बीड जिल्हयाच्या कंत्राटदाराने बी.पी.एल. व अंत्योदय योजनेतील गहू व तांदूळ पुरविण्यासंबंधी केलेला घोटाळा यासंबंधी श्रीमती उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत बीड जिल्ह्याचे शासकीय अन्नधान्य वाहतुकीसाठी एच.पी.घुमरे यांना कंत्राट मंजुर होणे. कंत्राटदाराने करारातील शासन निर्णयातील परिच्छेद २६(२) नुसार करारनाम्यातील अट क्र. ३३ चा भंग करणे, जून २००७ ते जानेवारी २००८ या कालावधीत बी.पी.एल. व अंत्योदय योजनेचा गहू व्यपगत होणे एकूण बी.पी.एल व अंत्योदय योजनेतील गहू व तांदूळ मिळून तीन कोटी सोळा लक्ष, आठ हजार पाचशे पस्तिस रु. चा गहू व तांदुळ व्यपगत होणे, या कंत्राटदारास तीस लाखाचा दंड होणे, आठ महिने प्रशासन गप्प रहाणे व तरीही सदरचे कंत्राट रद्द न होणे, या महा घोटाळ्यामुळे जनतेत निर्माण झालेला असंतोष व शासनाने त्यावर तातडीने करावयाची उपाय योजना."

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.जगदीश गुप्ता )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये पहिल्या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, 'बी.पी.एल.व अंत्योदय योजनेचा एकूण 7101.8 मे.टन गहू व तांदुळाची उचल केली नाही.' पुढे दुस-या परिच्छेदात असे नमूद केले आहे की, 'शासकीय गोदामामध्ये उपलब्ध असलेल्या योजनेचे धान्य इतर योजनेत वर्ग करुन कार्डधारकांना वितरित करण्याची दक्षता घेण्यात येत आहे,' माझा प्रश्न असा आहे की, हे जे न उचलेले धान्य आहे ते केव्हा उचलले जाईल आणि जिल्हा प्रशासनाला उपलब्ध होण्यासाठी कोणती उपाययोजना केली जात आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत शासकीय गोदामातून किती धान्य उचलावे लागले आणि शासकीय गोदामामध्ये धान्य उचल करण्यासाठी कोणती उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : जे धान्य व्यपगत झालेले आहे ते पुन्हा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात माझ्या स्तरावर एफ.सी.ए.च्या वरिष्ठ अधिका-यांबरोबर आठ दिवसात बैठक बोलविली जाईल आणि व्यपगत झालेला गहू दुस-या योजनेतील कार्डधारकांना द्यावयाचा असल्यामुळे तो मिळविता येईल. सन्माननीय सदस्यांनी जानेवारी, 2007 ते फेब्रुवारी, 2008 पर्यंत किती नियतन मंजूर झाले, प्रत्यक्षात किती उपलब्ध झाले त्याची माहिती आता माझ्याजवळ नाही, ही माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री.विक्रम काळे : या कंत्राटदाराला पुढील कालावधीसाठी काळया यादीत टाकले जाईल काय ?

श्री.सुनील तटकरे : याबाबत मी स्वत: माहिती घेणार आहे. धान्य व्यपगत होण्याचे कारण काय आहे, रेल्वे रेक वेळेवर आली किंवा नाही, आली असल्यास ठेकेदाराने धान्य वेळेवर उचलले की नाही हे पाहिले जाईल. ठेकेदाराने धान्य उचलले नसल्यास त्यांच्याविरुध्द निश्चित कारवाई केली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**राज्यपालांनी विधानमंडळ सदस्यांकरिता आयोजित केलेला चहापानाचा कार्यक्रम**

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, माननीय राज्यपाल महोदय यांनी आज बुधवार, दिनांक 2 एप्रिल, 2008 रोजी संध्याकाळी 6.30 वाजता राज भवन, मुंबई येथे विधानमंडळ सदस्यांसाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याबाबतची निमंत्रण पत्रिका व वाहन प्रवेश पत्रिका सर्व सन्माननीय सदस्यांना सोमवार, दिनांक 31 मार्च, 2008 रोजी सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी चहापानाच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे. सन्माननीय सदस्यांच्या सोईसाठी विधान भवन ते राज भवन दरम्यान बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी अर्धा तास स्थगित करण्यात येत आहे.

( 2.34 ते 3.05 पर्यंत मध्यंतर )

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार**

**माहितीच्या मुद्याबाबत**

डॉ. दीपक सावंत : तालिका सभापती महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. आज सकाळी या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सहार विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव दाखल केला होता. तोच विषय विधानसभेमध्ये देखील उपस्थित झालेला होता. या विषयाबाबत विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे अशी माझी माहिती आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये देखील त्या विषयाच्या संदर्भात निवेदन व्हावे अशी माझी विनंती आहे.

श्री. अनिल देशमुख : हा विषय जेंव्हा या सभागृहामध्ये उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित होते आणि त्यांनी माननीय सदस्यांनी केलेल्या चर्चेनंतर वस्तुस्थिती सदनाला सांगितली होती. विधानसभेमध्ये जेव्हा हा विषय उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्री त्या सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. म्हणून त्यांनी तेथे नंतर निवेदन केलेले आहे. या सभागृहामध्ये त्या विषयाच्या संदर्भात खुलासा झालेला आहे.

डॉ. दीपक सावंत : माझे म्हणणे एवढेच आहे की, या विषयाच्या संदर्भात जर विधानसभेमध्ये निवेदन वितरित केले गेले असेल तर तशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्ये देखील वितरित होणे आवश्यक आहे. ही बाब आपण तपासून पहावी.

**तालिका सभापती** : ही बाब तपासून पाहिली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : कोकणातील नद्या गाळाने भरलेल्या असल्यामुळे
कोकणातील जलमय होणारी गावे

**मु. शी.** : कोकणातील नद्या गाळाने भरलेल्या असल्यामुळे
कोकणातील जलमय होणारी गावे याबाबत श्री. संजय केळकर,
वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"कोकणात पडणा-या अतिवृष्टीमुळे कोकणातील नद्या गाळाने भरुन गेलेल्या असून त्यामुळे नदीकाठच्या गावात नदीच्या पुराचे पाणी जाऊन गावेच्या गावे जलमय होतात, त्यामुळे दरवर्षी लाखोची वित्तहानी व जीवितहानी होत असते, त्यामुळे राजापूर (जिल्हा रत्नागिरी) परिसरातील नागरिकांनी राजापूर शहराजवळून वाहणा-या अर्जुना व कोदवली नदीतील गाळ काढण्याचा प्रस्ताव शासनास दिला. शसनाने नेहमीप्रमाणे नदीपात्रातील गाळ काढण्याचा खर्च कोणी करावयाचा, याबाबत निरनिराळी मते दिल्याने सदर प्रस्ताव लालफितीत अडकला आहे. त्यामुळे राजापूर शहर या वर्षी ही पुराच्या पाण्याने वेढले जाण्याची शक्यता वाढली आहे. नागरिकांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण करणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने सदरची बाब विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणीत आहे, त्यावर शासनाने तातडीने कार्यवाही करावी, ही विनंती."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

----

..3..

**पृ. शी.** : बीड जिल्हयातील मराठवाडा चर्मोद्योग उद्योग बंद पडल्याने कामगारांच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न

**मु. शी.** : बीड जिल्हयातील मराठवाडा चर्मोद्योग उद्योग बंद पडल्याने कामगारांच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न याबाबत श्रीमती उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

"बीड ता. बीड, जिल्हा बीड या शहरात मागील 31 वर्षापूर्वी सुरु केलेला मराठवाडा चर्मोद्योग उद्योग बंद आहे. 1976 साली कोटयवधी रुपये खर्चून हा उद्योग उभा करण्यात आला. मराठवाडा विकासासाठी सिडमनी वाटप करणे, रोजगार उपलब्ध करुन देणे, मराठवाडा विकास महामंडळ स्थापन केले, बीडमध्ये चमडा फॅक्टरी सुरु केल्यानंतर 150 बेरोजगारांना व्यवसाय, रोजगार मिळणे, जालना बीड, औरंगाबाद येथून कच्चामाल घेऊन तीन टप्प्यात प्रक्रिया झालेला पक्का माल मुंबईहून जपान, लंडन, स्वित्झर्लंड या देशात निर्यात होणे, 2004 साली हा प्रकल्प बंद करणे, 150 कामगारांना स्वेच्छा निवृत्ती घेण्यास भाग पाडणे, त्यांना तुटपुंजी रक्कम देणे, कर्मचारी मुने यांचा धक्क्याने मृत्यू होणे, 13 वर्षांनी विधवा पत्नीला निवृत्ती वेतनासाठी अर्ज करा असे पत्र येणे, या फॅक्टरीसाठी चार मोठ्या टोलेजंग इमारती बांधलेल्या असणे, कॉमन फॅसिलिटी ट्रेनिंग सेंटर बनवण्यासाठी 2 कोटी रु. खर्च करुन भव्य इमारत बांधकाम करणे, मशिनरी विकत आणणे, अद्याप कर्मचारी भरती व उद्घाटन न होणे, इमारत व मशिनरी धूळखात पडणे या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

सभापती महोदय, बीड शहरामध्ये मागील 31 वर्षापूर्वी मराठवाडा चर्मोद्योग उद्योग सुरु केला होता तो बंद पडलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:10

श्रीमती उषा दराडे.....

तेथील कामगारांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास भाग पाडले. त्या ठिकाणच्या कामगारांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. या फॅक्टरीसाठी चार मोठया इमारती बांधून ठेवण्यात आल्या, आवश्यक त्या मशिनरीज् खरेदी केल्या. परंतु त्या फॅक्टरीमध्ये कर्मचा-यांची भरती केली गेली नाही. एवढेच नव्हे तर या फॅक्टरीसाठी ज्या इमारती बांधून ठेवल्या त्यांचे उद्‌घाटन देखील करण्यात आले नाही. या इमारतींच्या बांधकामावर जवळपास दोन कोटी रुपये खर्च केला गेला आहे. त्या ठिकाणी पूर्वी कार्यरत असलेल्या फॅक्टरीमध्ये चर्मोद्योग सुरु होते, ते उद्योग बंद करण्यात आले आहेत. या ठिकाणी चर्मोद्योग पुन्हा सुरु करावेत म्हणून मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. त्या ठिकाणच्या इमारती आणि मशिनरीज धूळ खात पडलेल्या आहेत. त्याचा वापर या उद्योगासाठी वापरण्यात यावी. यासाठी नवीन इमारत बांधली आहे त्याही ठिकाणी हा व्यवसाय सुरु करावा तसेच या व्यवसायासाठी कर्मचा-यांची भरती करण्यात यावी अशी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनास विनंती करीत आहे.

-------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये राष्ट्रीय सण साजरा न केला जाणे

**मु. शी.** : मुंबईतील आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये राष्ट्रीय सण साजरा न केला जाणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबईतील आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये 15 ऑगस्ट व 26 जानेवारी, रोजी झेंडावंदन व राष्ट्रगीत म्हटले जात नाही अशा आशयाच्या तक्रारी शासनाकडे आलेल्या आहेत. तसेच या शाळांना "ना हरकत प्रमाणपत्र" शासनाने द्यावयाचे असल्याने असे " ना हरकत प्रमाणपत्र" देतांना शासनाने हया शाळांमध्ये राष्ट्रगीत व झेंडावंदन, भारत माझा देश आहे हे राज्याच्या इतर शाळांमध्ये सुरु असलेले राष्ट्राभिमान दर्शविणारे अत्यंत महत्वाचे विषय आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये तात्काळ सुरु करण्याचे शासनाने सक्त आदेश द्यावेत व तसे निवेदन करावे ही विनंती.

सभापती महोदय, मुंबईतील आयसीएसई, सीबीएसई या शाळांच्या बाबतीत या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. मुंबईत आणि महाराष्ट्रात आयसीएसई, सीबीएसई शाळाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. मराठी माध्यमांच्या शाळा बंद होऊन आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये रुपांतर शासनाच्या माध्यमातून होत आहे. आयसीएसई, सीबीएसई किंवा कॉनव्हेंट शाळा एस.एस.कोडचे काटेकोरपणे पालन करीत नाही. त्या शाळा स्वत:ला ऑटोनॉमस समजतात. या शाळांवर शिक्षण खात्याचे कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. आपल्या अर्विभावात ते काम करीत असतात. 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. माननीय शालेय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

3...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:10

डॉ.दीपक सावंत...

शिक्षण मंत्री सभागृहात हजर आहेत. माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, या शाळांना आपण भेट देऊन पहा. या शाळांमध्ये 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी हे दोन्ही राष्ट्रीय सण साजरे करीत नाहीत. मराठी अथवा इतर भाषेच्या शाळात हे राष्ट्रीय सण साजरे केले जातात, त्या शाळांमध्ये झेंडावंदन होते आणि त्यावेळेला राष्ट्रगीत म्हटले जाते. आयसीएसई, सीबीएसई आणि कॉनव्हेंट शाळांमध्ये अशा प्रकारचे सण साजरे केले जात नाहीत ही दुर्देवाची गोष्ट आहे. या शाळा राष्ट्रीय सण साजरे करीत नाहीत तरी त्या शाळांविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दिवशी या शाळांना फक्त शासकीय सुटी दिली जाते. मात्र कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम करीत नाही. आपल्या क्रमिक पुस्तकांमध्ये एक प्रतिज्ञा आहे. ती प्रतिज्ञा विद्यार्थ्यांकडून म्हणवून घ्यावी असे संकेत आहेत. विद्यार्थ्यांकडून एकदा तरी ती प्रतिज्ञा म्हणवून घेतली पाहिजे. ही प्रतिज्ञा म्हणवून घेण्यामागचा भूमिका अशी आहे की, आपला राष्ट्राभिमान सदैव जागृत व्हावा आणि राष्ट्राभिमानाचे धडे विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेपासून मिळावेत. विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा म्हणवून घेण्याचे काम देखील आयसीएसई, सीबीएसई, कॉनव्हेंट शाळा करीत नाहीत. परंतु या शाळा " ना हरकत प्रमाणपत्र " घेण्यासाठी राज्य शासनाकडे येतात. राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारची अट न टाकता " ना हरकत प्रमाणपत्र " दिले जाते. माझी विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने माननीय शालेय मंत्र्यांना विनंती आहे की, 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी ज्या शाळा झेंडावंदनाचा कार्यक्रम करीत नाहीत. ज्या शाळांमध्ये राष्ट्रगीत म्हटले जात नाही, त्या शाळांवर सक्त कारवाई करण्यात यावी. त्याचे कारण असे की, हा राष्ट्रभक्तीचा जाज्वल्यांचा प्रश्न आहे. मराठी शाळा आणि इतर भाषाच्या शाळांचे आयसीएसई, सीबीएसई या शाळांमध्ये शासनातर्फे रुपांतर करण्याची परवानगी देणार आहात, या शाळांना शासनातर्फे " ना हरकत प्रमाणपत्र " देण्यात येते, त्यावेळी त्यांना एक आचारसंहिता घालून देण्यात यावी. या राज्याचे काय काय नियम आहेत ते नियम पाळण्यासंबंधीचे बंधन त्यांचेवर घालण्यात आले पाहिजेत. त्या संस्थाचे चालक हे काही आकाशातून पडलेले नाहीत. आयसीएसई, सीबीएसई या शाळांना शिक्षण खात्याच्या अखत्यारित आणणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण खात्याला नियमात जो काही बदल करावा लागेल तो बदल तातडीने करावा आणि या शाळांवर कारवाई करण्याची भूमिका शासनाने सोडू नये अशा प्रकारची विनंती मी विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने करतो.

4.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने माझा पुरक असा मुद्दा आहे. शैक्षणिक संस्थांना शासकीय सुटींची यादी येते. त्या यादीप्रमाणे 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी राष्ट्रीय सुटीचे दिवस म्हणून कळविले जाते. माझी शासनास विनंती आहे की, राज्यातील शैक्षणिक संस्थांना 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी हे दोन दिवस सुटी न देता ते दोन दिवस वर्कींग म्हणून ठेवावेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, एखादा विषय या सभागृहात 4/5 वेळा उपस्थित होतो आणि तेच तेच उत्तर द्यावे लागते. हा विषय यापूर्वी सुध्दा येऊन गेलेला आहे. त्यावेळी राज्यमंत्र्यांनी उत्तर सुध्दा दिलेले होते. शासन शाळा संहिता निश्चित करीत आहे. शासनाचे नियम ज्या संस्था पाळत नसतील त्यांच्या बाबतीत नियमावली तयार करीत आहोत आणि त्या संस्थांना एनओसी देताना शासन नियम पाळण्यासंबंधी ॲफेडेव्हीट घेण्याचे निश्चित करीत आहे. उच्छृंखलपणे ज्या संस्था वागतात त्यांच्या बाबतीत शाळा संहिता तयार करीत आहोत. त्याबाबतीत निकष ठरवू. शासनाच्या अटी पाळाव्यात असे प्रतिज्ञापत्र त्यांच्याकडून लिहून घेण्याचा शासनाचा मानस आहे. यासंदर्भातील कायदेशीर बाब देखील शासन तपासून घेईल. या संस्थांवर अंकुश असला पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला देशातील सर्व शाळांनी झेंडावंदन केले पाहिजे. मदरशामध्ये होत नव्हते त्यावेळी केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले की अनुदान घ्या पण झेंडावंदन करा हा भाग निराळा. 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला ज्या शाळा झेंडावंदन करीत नसतील त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल शासन दाखल करणार आहे काय हा खरा प्रश्न आहे. झेंडावंदन अनिवार्य असताना केले जात नसेल तर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करा. ज्या शाळांमध्ये झेंडावंदन होत नसेल त्या संस्था आणि शाळेचे मुख्याध्यापक यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवावा. पुढच्या पिढीवर कोणते संस्कार होणार आहेत याचा विचार करा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याबद्दल कुठलेही दुमत नाही. आतापर्यंत शासनाचा अंकुश नव्हता म्हणून शाळासंहिता शासन निश्चित करीत आहे. या विषयाबाबत शासन अतिशय गंभीर आहे. कॅबिनेटसमोर हा विषय घेतलेला आहे. अशा प्रकारे राष्ट्रद्रोह करीत असतील तर कोणत्याही संस्थेला पाठीशी घातले जाणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ब्रिटीशांच्या राज्यात मनाविरुध्द युनियन जॅकला नमस्कार करायला लावत होते. नियम नंतर ठरवा. परंतु ज्या शाळांमध्ये वंदेमातरम् किंवा जनगणमन म्हटले जात नाही त्या शाळांना टाळे ठोका, त्यांना बेडया घाला आणि रस्त्यावरुन त्यांची धिंड काढा. आज संध्याकाळी सर्क्युलर काढा आणि उद्याच्या उद्यापासून त्याची अंमलबजावणी सुरु करा.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, साडेचार वर्षे युतीची सत्ता होती त्या काळात हे का केले नाही ? राष्ट्रीय भावना जर तुमच्या मनात आहे तर मग तुमच्या राजवटीत हे का केले नाही ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही चूक केली.

प्रा. वसंत पुरके : मी बिलकूल चूक करणार नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात, गोंधळ )

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्यांनी शांतता पाळावी व आपापल्या जागेवर बसावे.

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, हे नाटक करणे बरोबर नाही. सभापती महोदय, माझी राष्ट्रभक्ती अशी इतकी नाटकी नाही. मी स्वत: राष्ट्रभक्त आहे. अशाप्रकारे राष्ट्रद्रोह करणारे असतील त्यांना ताळ्यावर आणल्याशिवाय सोडणार नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय म्हणाले की, तुमच्या काळात हे का नाही झाले? आमच्या काळात अशा प्रकारे वागण्याची कोणाची हिंमत नव्हती. सरकारला लाज वाटली पाहिजे. तुमच्या काळात लोक असे वागतात याची लाज वाटली पाहिजे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या विषय सभागृहात चर्चेला येण्यापूर्वी आम्ही स्वत: ठरविले की, जे अँटी नॅशनल ॲटिट्यूड वापरत असतील त्यांच्यावर निश्चित कारवाई करणार आहोत. हा राजकीय इश्यू होता कामा नये. शासनाने ही भूमिका घेतली आहे, अशा प्रकारे ज्या संस्था वागत असतील त्यांच्याविरुध्द निश्चित कारवाई केली जाईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्यास होणारा विलंब

**मु. शी.** : माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्यास होणारा विलंब याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : मा□□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सध्याच्या मान्य पदांपेक्षा शिक्षकांच्या संख्येत वाढ झाल्याने पायाभूतपेक्षा वाढीव पदे समजून शासनाकडून ही पदे मान्य झाल्याशिवाय संबंधित शिक्षकांना वेतन मिळत नाही. माध्यमिक विभागातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव 2002-03 पासून प्रलंबित असून शिक्षक विनावेतन काम करीत आहेत. उच्च माध्यमिक विभागातील 2003-04 व 2004-04 मधील 58 पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. तसेच पुढील तीन वर्षांचे म्हणजे 2005-06 ते 2007-08 पर्यंतचे तीन वर्षांचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. वेळेवर मान्यता न मिळाल्याने अनेक शिक्षक तीन-चार वर्षापासून वेतनापासून वंचित आहेत. संस्थाचालक वेतन देत नाहीत. हे सर्व शिक्षक अनुदानित विभागात काम करणारे आहेत. म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनास विनंती करतो की, वरील सर्व प्रस्तावांना शासनाने एका महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता देऊन या शिक्षकांचे वेतन सुरु करावे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बारमाही तलावांमध्ये मासेमारी संस्थांना मत्स्य उत्पादनाचा ठेका मिळणे

**मु.शी.** : बारमाही तलावांमध्ये मासेमारी संस्थांना मत्स्य उत्पादनाचा ठेका मिळणे याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये 8500 बारमाही तलाव, 4600 हंगामी तलाव आहेत. मासेमारी करणाऱ्या 28 जिल्हा सहकारी संस्था, 2600 इतर सहकारी संस्था, दोन शिखर संस्था व 350 प्राथमिक संस्था या गोड्या पाण्यातील मासेमारी व्यवसायात कार्यरत आहेत. शासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे व वेळोवेळी धोरणात केलेल्या बदलामुळे तसेच शासन निर्णयामुळे तलावांचा ठेका देण्याच्या रक्कमेत असंतुलन निर्माण झाल्याने छोट्या मच्छिमार संस्थांनी त्यांचे जलाशय मोठ्या व्यापाऱ्यांना दिले व या व्यापाऱ्यांनी त्यांचे स्वत:चे कामगार व्यवसायासाठी वापरल्याने परंपरागत गोड्या पाण्यात मासेमारी करणाऱ्या भोई समाजाच्या मच्छिमारांवर उपासमारीचे संकट कोसळून ते आर्थिक संकटात सापडले असून त्यांनी त्यांच्या विविध मागण्या शासनाकडे वारंवार सादर करुनही शासनाने त्या मागण्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. शासनाच्या धोरणामुळे मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांमध्ये प्रचंड असंतोष व चिडीची भावना निर्माण झाली असून त्याचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. शासनाने तातडीने या संदर्भात उपाययोजना करावी अशी मी विनंती करतो. मच्छिमारांच्या मागण्यांबाबत सहानुभूतीने विचार करुन तड लावावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

---------

(नंतर श्री.खर्चे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील हंगामी फळांवर प्रक्रिया केंद्रे सुरु करणे

**मु. शी.** : कोकणातील हंगामी फळांवर प्रक्रिया केंद्रे सुरु करणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूचाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकणात भातशेती व मत्स्यव्यवसायाबरोबर त्याला पूरक व्यवसाय म्हणून प्रामुख्याने आंबा व काजुच्या पिकांना महत्व देण्यात येते. पश्चिम महाराष्ट्रात जशी द्राक्षापासून मद्यनिर्मिती केली जाते तशीच काजुच्या बोंडावर प्रक्रिया करुन मद्यनिर्मिती करुन त्यापासून काजुच्या बागायतदारांना आर्थिक नफा मिळू शकतो. परंतु शासनाच्या उदासीन धोरणामुळे काजुच्या बोंडावर प्रक्रिया करणारा प्रकल्प संपूर्ण कोकणात नसल्यामुळे लाखो टन काजुची बोंडे प्रक्रियेकरीता शेजारच्या गोवा, कर्नाटक व केरळ राज्यात जातात. ज्यामुळे राज्याचे सुमारे 90 कोटींचे नुकसान होत आहे. काजुच्या बोंडावर प्रक्रिया करुन मद्यनिर्मिती तसेच आयुर्वेदिक गुणधर्म असलेले काजू-कोला नावाचे मधूर पेय तयार करण्यात येते. कोकणात आंबा, काजू, बोंडे, करवंदे, जांभूळ, रातांबा इत्यादि हंगामी पिकावर फळप्रक्रिया केल्यास कोकणातील शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळू शकते व त्यातून राज्य शासनाचाही फायदा होऊ शकतो. याकरिता शासनाने पुढाकारघेऊन संपूर्ण कोकणामध्ये मोठ्याप्रमाणात अशा प्रकारची प्रक्रिया केंद्र सुरु करण्यास आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. यावर शासनाने गांभीर्याने विचार करुन त्वरित कार्यवाही करणे गरजेचे असून, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे व मला आपण परवानगी दिली त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो.

-----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :बीएएमएस प्रमाणे बीएचएमएस डॉक्टरांना शासकीय नोकरीत सामावून घेणे

**मु. शी.** :बीएएमएस प्रमाणे बीएचएमएस डॉक्टरांना शासकीय नोकरीत सामावून घेणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"महोदय, राज्यात होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमार्फत दरवर्षी सुमारे 2800 विद्यार्थ्यांनी पदवी परीक्षा पास करणे, तथापि त्यांना शासकीय सेवेत सामावून न घेणे, लोकांनी सदर उपचार पध्दती स्वीकारली असून शासकीय सेवेत 25 टक्के जागा आयुर्वेदिकांसाठी असणे, त्यापैकी निम्म्या साडेबारा टक्के जागा होमिओपॅथिकसाठी राखून ठेवण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य करणे, तथापिक कोणतीच कार्यवाही न झाल्याने होमिओपॅथिक पदवीधर यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वाकरण्यात येत असलेली कार्यवाही."

महोदय, वैद्यकीय शिक्षणात तीन व्यवस्था आहेत. त्यात एमबीबीएस, बीएएमएस आणि बीएचएमएस अशा तीन पॅथी आहेत. एमबीबीएसमध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन पास होतात. त्यांनी पदवी घेतल्यानंतर शासकीय सेवेत नोकरी मिळते. आयुर्वेदमध्ये डिग्री घेतलेल्यांना सुध्दा 25 टक्के जागा शासन राखीव ठेवते. परंतु दरवर्षी जवळपास 2800 विद्यार्थी बीएचएमएसची डिग्री घेऊन बाहेर पडतात पण या डॉक्टरांना कुठल्याही प्रकारे शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण नाही. वास्तविक या होमिओपॅथी डॉक्टरांच्या असोशिएशन बरोबर माननीय मुख्यमंत्र्यांची एक बैठक झाली त्यावेळी त्यांनी सुध्दा अशा लोकांसाठी काही जागा राखीव ठेवण्यात येतील असे सांगितले. परंतु त्यासंदर्भात कोणतीच कार्यवाही झालेली नाही. म्हणून माझी विनंती आहे की, एमबीबीएस आणि बीएएमएस प्रमाणे बीएचएमएसच्या विद्यार्थ्यांना सुध्दा शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी काही प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात, अशी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वीज दरवाढीबाबत जाहीर सुनावणी आयोजित करणे

**मु. शी.** : वीज दरवाढीबाबत जाहीर सुनावणी आयोजित करणे याबाबत श्री.संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

वीज दरवाढीच्या प्रस्तावावर ग्राहकांच्या प्रतिक्रिया समजून घेण्यासाठी वीज नियामक आयोगाने सहा शहरात जाहीर सुनावण्या आयोजित केल्या आहेत. भारनियमनाने ग्रासलेल्या जनतेपुढे वीज दरवाढीचा धोका उभा आहे. राज्यातील असंख्य गोरगरीब छोटया वीज ग्राहकांच्या व अजूनही वीज पुरवठा न मिळणाऱ्या असंख्य नागरिकांच्या प्रश्नांची मांडणी करुन तोडगा काढण्याची मागणी वीज नियामक आयोग व सरकारकडे करण्यात आलेली आहे. या प्रश्नाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन प्रश्न सोडविण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे. मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

-------------

नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर जिल्हयात विविध योजनेत झालेला गैरव्यवहार

**मु. शी.**: सोलापूर जिल्हयात विविध योजनेत झालेला गैरव्यवहार याबाबत प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सोलापूर जिल्हयातील पुरवठा विभागाकडून आणि शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या निरनिराळया योजनांमध्ये झालेला भ्रष्टाचार, राष्ट्रीय वृध्दापकाळ योजनेत झालेला भ्रष्टाचाराचाराच्या बाबतीत राज्यामध्ये गेल्या 2-3 वर्षामध्ये मोठया प्रमाणात चर्चा सुरु आहे. सोलापूर जिल्हयातील रॉकेल गैरव्यवहार , स्वामी समर्थ भूखंड वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार असे सगळया गैरप्रकारामध्ये सहभागामी असलेले अधिकारी आणि कर्मचा-यांच्यावर कारवाई व्हावी अशी येथील जनतेकडून सातत्याने मागणी होत असतांना देखील सोलापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी संबंधित कर्मचा-यांवर व अधिका-यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करतात याच्या निशेधार्थ ज्येष्ठ समाजवादी विचारवंत श्री. पन्नालाल सुराणा यांनी दिनांक 27 मार्च 2008 सोलापूर येथील हुतात्मा चौकात एक दिवसाचे उपोषण करुन शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, या सगळया गैरव्यवहाराची चौकशी करुन जे जबाबदार अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी माझी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती आहे.

-------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. VI OF 2008

A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 6, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 6 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषी उत्पन्न पणन (विकास व निनियमन) विधेयक

L.A. BILL NO. II OF 2008

A BILL FURTHER TO AMEND THE MARHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963 AND MOTION REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक -2, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,1993 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक -2, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,1993 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, खरे म्हणजे सदर बील हे अतिशय महत्वाचे असल्यामुळे या विधेयकाची पार्श्वभूमी माननीय मंत्रीमहोदयांनी थोडक्यात सांगणे आवश्यक होते परंतु विधयेक पुर:स्थापन करावयाचे, विचारार्थ ठेवायचे, विचार, खंडश: विचार व लागलीच संमत करुन टाकावयाचे अशी या सभागृहाची परंपरा होत चालली आहे. त्यामुळे हे बील या ठिकाणी कशासाठी आणलेले आहे, बिलाचा उद्देश काय आहे हे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे तरी मंत्रीमहोदयांनी या विधेयकामध्ये काय सुधारणा करु इच्छितात ते थोडक्यात सांगावे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन ) अधिनियम 1963 मधील चार कलमांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि एका नवीन कलमाचा त्यात समावेश करण्यासाठी हे सुधारणा विधेयक मांडण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा करण्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्याकरिता ही सुधारणा करण्यात आलेली आहे. कलम 13 मध्ये अशी सुधारणा करण्यात आलेली आहे की, " तत्कालीन विद्यमान तरतुदी अनुसार, बाजार क्षेत्रामध्ये राहणारा प्रत्येक शेतकरी निवडणूक लढविण्यास पात्र होता. सबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत ज्यांचे नाव असेल असेच शेतकरी केवळ निवडणूक लढविण्यास पात्र असतील अशी तरतूद करण्यासाठी उक्त कलमात सुधारणा करण्यात आली आहे. या पूर्वी त्या क्षेत्रात असलेले आणि सात बाराच्या उतारा ज्याच्या नावावर आहे अशा व्यक्तीला कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढविता येत होती पंरतु येथून पुढे ज्याचे नाव संबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत असेल असेच शेतकरी निवडणूक लढविण्यास पात्र राहणार आहेत अशा प्रकारची सुधारणा करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, यानंतर कलम 11 क मध्ये अशी सुधारणा करण्यात आली आहे की, "सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर, बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासक नेमण्याची तरतूद होती. उक्त कलमामध्ये प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे " सहकारी संस्थांमध्ये ज्या प्रमाणे प्रशासक मंडळ नियुक्त केले जाते त्याप्रमाणे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, यानंतर कलम 35- क या नवीन कलमाचा समावेश करण्यात आलेला आहे.हे कलम असे आहे की, बाजार समित्यांच्या कार्यामध्ये निश्चितपणे प्रशासकीय कार्यक्षमता यावी यासाठी, सहकार विभागातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल अशा कोणत्याही अधिका-याची, कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे."





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ...

सभापती महोदय, यानंतर कलम 45 मध्ये अशी सुधारणा करण्यात आली आहे की , बाजार समितीच्या एखाद्या सदस्यांने त्याच्या कार्यकाळात जर काही चूक केली असेल किंवा बाजार समितीचे नुकसान केले असेल तर अशा सदस्याला सहा वर्षाकरिता अपात्र ठरविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, यानंतर कलम 57 मध्ये अशी सुधारणा करण्यात आली आहे की, "बाजार समितीकडून राज्य कृषि पणन मंडळाला येणे असलेली रक्कम सुध्दा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल "

सभापती महोदय, अशा प्रकारे कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

**तालिका सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी माडावा.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय,सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक - विधान सभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त तीन महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा विषय अत्यंत जीवनमरणाचा आहे. शेतक-यांने उत्पन्न केलेल्या कृषि मालाला योग्य दाम मिळण्यासाठी , त्याने उत्पन्न केलेल्या मालाचा सन्मान होण्यासाठी, अडी अडचणीच्या वेळी अडत्याच्या माध्यमातून शेतक-याना मदत मिळण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शेतकरी आणि कृषि उत्पन्न बाजार समित्या असे वेगवेगळे दोन विषय कधीही होऊ शकणार नाहीत. शेतक-यांच्या प्रश्ना संबंधी काल सभागृहात चर्चा झाली होती. तेव्हा शेतक-यांचा आपल्याला किती कैवार आहे...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 15:40

श्री. रावते ....

या संदर्भात स्पर्धा लागली होती आणि या स्पर्धेत आम्ही कोठे आहोत या पेक्षाही आमचे नेते किती मोठे आहेत हे सांगण्याचीच स्पर्धा लागली होती. खरे तर एखादा सामान्य कार्यकर्ता ग्रामीण भागातील जीवनामध्ये शेतकऱ्यांच्या सुखदु:खाशी समरस होऊन राजकीय व्यासपीठावर येऊन आपले अनुभव मांडत असतो त्यावेळेस ग्रामीण भागातील नेतेपण आपोआपच त्याच्यापर्यंत पोहोचते. कोणताही नेता हा कानाकोपऱ्यात जाऊन आवाज घेत नसतो. त्याची खरी ताकद ही त्याच्या कार्यकर्त्यांमध्ये असते, कार्यकर्त्यांचे सामर्थ्य हीच त्याची ताकद असते. ज्या पक्षामध्ये अशाप्रकारे ग्रामीण भागात जाऊन, झोपड्यांमध्ये डोकावून दुर्दशा होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे अनुभव घेणारे कार्यकर्ते आहेत, त्यांनी त्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी काय केले आहे यातून त्याची ओळख होते आणि सक्षम नेतृत्त्व त्याचे सार काढून घेऊन त्यातून धोरण ठरवित असते. सभापती महोदय, महाराष्ट्रात एकूण 295 बाजार समित्या आहेत. त्यांचा जो कारभार चालला आहे तो कसा चालतो आहे हे ग्रामीण भागातील सगळ्याच आमदारांना माहिती आहे. या बाजार समित्यांच्या निवडणुका म्हणजे किती जीवनमरणाचा संघर्षाचा प्रश्न असतो हे आज सगळ्यांनाच माहिती झाले आहे. सर्वसाधारण निवडणुकीमध्ये जेवढी दमछाक होत नाही एवढी दमछाक बाजार समित्यांच्या निवडणुकांमध्ये प्रत्येक उमेदवाराची आणि प्रत्येक कार्यकर्त्याची होत असते आणि त्यावेळी प्रत्येकाच्या बाजूने जी ताकद लावली जाते ती भयानक असते, त्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा वापरला जातो. एवढा पैसा शेतकऱ्यांचे भवितव्य ठरविण्यासाठी वापरला तरी शेतकरी सुखी होईल परंतु मला निवडून येण्यासाठी, माझी ताकद वाढविण्यासाठी हे जे सारे आक्रित केले जाते ते भीषण आणि गंभीर असते, अगदी कल्पनेपलिकडचे असते. हा इतका संघर्ष का होतो ? का लोक अशा प्रकारे लाखो रूपयांच्या जीवन मरणाच्या संघर्षामध्ये येऊन ही स्पर्धा जिंगण्याचा प्रयत्न करतात ? असे त्या बाजार समित्यांमध्ये काय पडले आहे ? त्याची आलेख घेत असताना मी माझे विचार नंतर सखोलतेने मांडणारच आहे. परंतु सभापती महोदय, या विधेयकाद्वारे येथे आलेली जी पहिलीच सुधारणा आहे ती शेतकऱ्याला उद्ध्वस्त करणारी आहे असे मला वाटते. म्हणूनच ही सुधारणा कशासाठी आणली आहे हे माननीय मंत्र्यांनी प्रथमत: येथे सांगितले पाहिजे. यामागे सरकारचा इरादा काय आहे हे सांगितले पाहिजे. अशा प्रकारची उपसूचना आपण का आणत आहोत हे सरकारने सांगितले पाहिजे. सभापती महोदय, येथे बसलेले बहुतेक सर्व सन्माननीय

...... एमएम 2 ...

श्री. रावते .....

सदस्य हे ग्रामीण भागातील असल्याने ते शेतकऱ्यांचा विचार प्राथम्याने करणार आहेत, पक्ष हा त्यानंतरचा आहे, उणीदुणी काढण्यासाठी आहे. परंतु मी ज्या भागामध्ये राहतो, त्या भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न माझ्या कुवतीप्रमाणे, माझ्या ऐपतीप्रमाणे... या ठिकाणी ऐपत ही पैशाची नाही हे आपण लक्षात घ्या, येथे मांडून त्यांचे हित साधण्याचे माझे काम आहे आणि याच भावनेतून येथील आपण प्रत्येक जण आहोत. सभापती महोदय, मला हे कळत नाही की, माननीय राज्यमंत्र्यांनाही मनापासून न पटणारी अशी ही सुधारणा त्यांनी का आणली आहे ? हे जे कलम 13 आहे, त्याची सुधारण इतकी गंभीर आहे की ती घटनेच्या विरोधातील आहे. कोणाचाही घटनादत्त अधिकार काढून घेण्याची परवानगी तुम्हाला कोणी दिली ? एखादी निवडणूक लढवायची असेल तर त्यासाठी इतके सुंदर धोरण होते की, त्याच्याकडे 7-12 चा उतारा असणे आवश्यक होते. मतदार यादी वगैरे भानगड काही नाही. त्या बाजार समितीतील प्रत्येक शेतकरी हा ती निवडणूक लढविण्यासाठी सक्षम होता. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एनएन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मी शेतकरी आहे असे त्याने सांगितल्यानंतर त्याच्याकडे 7/12 चा उतारा असला पाहिजे. आता अमिताभ बच्चन शेतकरी झाले, आणखी एक नटी देखील शेतकरी झाली. मी सुध्दा एक 7/12 चा उतारा घेणार आहे, माझ्या कुटुंबाचा 7/12 चा उतारा आहे. परंतु मी शेतकरी नसल्यामुळे तो मला मिळणार काय? माझ्याकडे 7/12 चा उतारा नसल्यामुळे तुम्हाला काय कळते? तुमचा संबंध काय? तुम्ही शेतकरी आहात काय? एवढे आकांड तांडव होऊन सुध्दा दोन दिवसापूर्वी मी याठिकाणी समन्वयाची भूमिका मांडली होती. आणि मग मुद्दा असा येतो की, मावळ तालुक्यात देणगी परत दिली तर अमिताभ बच्चनला 7/12 चा उतारा मिळेल. याठिकाणी ही अमेंडमेंट झाली नाही तर अमिताभ बच्चन सुध्दा केस लढवू शकतो. मंत्रिमहोदय, आपण ही अमेंडमेंट केली नाही तर? तरी देखील 100 बाजार समित्या खिश्यामध्ये ठेवून फिरण्याची त्याची ऐपत आहे, तो अशा लफडयामध्ये येणार नाही. म्हणून मी फक्त याठिकाणी कोण पात्र होऊ शकते याचे उदाहरण दिले.

सभापती महोदय, मार्केट कमिटीमधून आपण माल घेऊन जातो. या बाजार समितीशी माझा संबंध आहे. मी जे पिकवीन ते त्याठिकाणी घेऊन जाईन. आणि बाजार समितीच्या माध्यमातून माझ्या घामाचा, श्रमाचा, उत्पन्नाचा जो माल असेल त्याचा दाम घेण्याचा शेतकरी म्हणून माझा अधिकार आहे. आपण याठिकाणी मॉडेल ॲक्ट आणले आहे त्याच्या तरतुदीवर मी नंतर बोलणार आहे. हा ॲक्ट आपण कशासाठी आणला?. सभापती महोदय, यासंबंधीच्या संयुक्त समितीवर मी सुध्दा सदस्य होतो. ती समिती बरेच दिवस चालली. त्या समितीमध्ये चांगल्या सूचना करण्यात आल्या. विधानसभेतील माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. ग.आ.देशमुख यांनी फार सुंदर सूचना मांडल्या होत्या. समितीमध्ये त्यांच्या असण्यामुळे आम्हाला मार्गदर्शन होते. सभापती महोदय, त्या समितीमध्ये आपण सुध्दा होता. मध्ये दलाल न ठेवता शेतकरी स्वतःचा माल स्वतः विकू शकेल. बाजार समितीच्या कंपाऊंडच्या बाहेर सुध्दा विकू शकेल. अशाप्रकारे शेतकऱ्याच्या हिताकरिता बाजार समितीचे नियोजन केले होते. आपण याठिकाणी कोणती अमेंडमेंट आणली आहे? "तत्कालीन विद्यमान तरतुदी अनुसार, बाजार क्षेत्रामध्ये राहणारा प्रत्येक शेतकरी समितीची निवडणूक लढविण्यास पात्र होता, तो आता राहणार नाही तर संबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत ज्यांचे नाव असेल असेच शेतकरी केवळ निवडणूक लढविण्यास पात्र असतील अशी तरतूद करण्यासाठी

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते...

उक्त कलमात सुधारणा करण्यात आली आहे" सभापती महोदय, आपणास माहित आहे की, सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदान केंद्रावरील मतदारांच्या यादीमध्ये नावांचा केवढा मोठा घोळ असतो. अख्या महाराष्ट्रात निवडणूक प्रक्रिया सुरु झाली की, कार्यकर्त्यांची एकच ओरड सुरु होते की, मतदार यादीमधून अमूक गाव गेले, अमूक गल्ली गेली, अमूक आळी गेली. परंतु शेतकऱ्यांची नावे जर त्या यादीमध्ये काही कारणांनी नोंदवून घ्यावयाची राहिली असतील तर काय करणार? तो तर अज्ञानी आहे. मतदार यादीमध्ये नाव घालण्याकरिता सात नंबरचा फॉर्म भरा, आठ नंबरचा फॉर्म भरा असे सांगितले जाते. परंतु तुम्ही आणि मी देखील हुशार राजकारणी आहोत. भविष्यातील हा माझा विरोधक आहे, बाजार समितीमध्ये हा मला नको आहे अशावेळी त्याला मतदार यादीमधून डिलिट करण्याचा अर्ज आपण केव्हा भरतो हे त्याला कळत नाही. अशाप्रकारे तो मतदार यादीतून डिलिट होतो. आपल्या ग्रामीण भागामध्ये या मोठमोठया टक्करीमध्ये कोण कोण उतरते हे आपल्याला माहीत असते. आता त्याचे नाव डिलिट केल्यानंतर त्याची चौकशी होईल. ही चौकशी म्हणजे काय आहे? हे तुम्हाला आणि आम्हाला माहीत आहे. मतदार यादीमधून गावेच्या गावे बाद होतात. घरेच्या घरे मतदार यादीमधून बाद होतात. काही वेळेला तर एका घरातील दहा नावांपैकी चार नावे मतदार यादीत येतात आणि सहा नावे गायब होतात अशी देखील गंमत असते. मतदाराचे सर्वसाधारण गणित म्हणजे माझ्या घरामध्ये पोल चीट आली की, आपले नाव पक्के झाले. मतदारांच्या कार्डाला ग्रामीण भागात पोल चीट म्हणतात तर शहरामध्ये पोलींग कार्ड म्हणतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मग ग्रामीण भागामध्ये एखाद्याकडे पोल चीट आली की मग आपण मतदार यादीमध्ये आहोत, यापलिकडे त्या माणसाला काही कळत नाही. मग तेथील अजुबाजूचे लोक एकमेकाला विचारतात की, तुझी पोल चीट आली. मग माझी चीट कुठे आहे ? मग कार्यकर्ते म्हणतात की, आम्ही काय ते पहातो, अमुक करतो, तमुक करतो. आम्ही ऑफीसमध्ये जाऊन आणतो. मतदार यादी जाहीर होण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत आपल्या नावाची नोंदणी करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे हे देखील अनेक लोकांना माहिती नसते. मग त्या मतदार याद्यांची तपासणी सुरु होते. पण तुम्ही मला सांगावे की, या याद्यांची तपासणी करण्यासाठी कोणी जाते का ? अगदी माझ्यासहित, कोणी तपासण्यासाठी जाते का ? याद्या जाहीर होतात, त्याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात येते आणि मतदार यादीमध्ये तुमचे नाव आहे की नाही हे पहावे असे सांगितले जाते.निवडणुकीची ही पध्दत बरोबर आहे.माननीय मंत्री महोदय उत्तराचे भाषण करतील, तेव्हा मला असेच सांगणार आहेत. पण या देशामधील लोकांमध्ये जर एवढी जागरुकता असती तर मतदान 60 टक्क्यापर्यंत का झाले असते ? आज सुशिक्षितांकडून मतदान केले जात नाही. आपल्याला मतदानाच्या अधिकारातून आपले सर्व प्राबल्य निर्माण करता येते, माझी झोपडपट्टी वाचविता येते, बेकायदेशीर गोष्टी वाचविता येतात . आज मतदार जागरुक नसल्यामुळे मतदार याद्या योग्य असतील याबाबतीत गॅरंटी कोण घेणार आहे ? म्हणून पूर्वीचा जो निकष होता, त्यानुसार त्या बाजार समितीच्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा त्या बाजार समितीवर अधिकार होता आणि तो आजही आहे. मग माननीय मंत्री महोदयांनी त्याला या निवडणुकीपासून वंचित करणारी उप सूचना का आणली आहे? असा माझा प्रश्न आहे. या माध्यमातून तुम्ही शेतकऱ्यांच्या अधिकारावर गदा आणत आहात आणि त्याचा अधिकार हिरावून घेत आहात असे माझे म्हणणे आह. अशा प्रकारे शेतकऱ्यांचे भवितव्य बाजार समितीवर अवलंबून आहे. तेथील मतदान वगैरे हा वेगळा विषय आहे. तो शेतकरी त्या बाजार समितीचा मतदार असेल, मग त्याच्या अधिकारासाठी बाजार समितीमध्ये जो प्रतिनिधी बसलेला आहे, त्याला तो जाऊन सांगेल की, तू माझ्या मतदार संघातून निवडून आलेला आहेस. मी तुला मतदान केलेले आहे आणि माझे अमुक-अमुक काम आहे. आपल्या व्यथा मांडण्यासाठी तेथे माणूस असतो. पण तुम्ही मतदार याद्यांच्या संबंधातील हे नवीन काम कुठून आणले आहे? तुम्हाला अशी काय गरज पडली ? लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देण्यासाठी आमदार, खासदार, पंचायत

. . . .2 ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

समितीतील सभासद इ.क्षेत्रे आहेत. पण बाजार समिती ही शेतकऱ्यांची आहे, मग तो मतदार यादीमध्ये असो किंवा नसो. पण त्याचा तो अधिकार आहे. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एका प्रश्नाच्या बाबतीत उत्तर देताना जे ऐकले, त्यामुळे मला फार वाईट वाटले, कारण परप्रांतीय आणि स्थानिक असा विषय नाही. पण आपण राज्यकर्ते म्हणून नक्की कोणती कबर खणत आहोत आणि कोणाची कबर खणत आहोत ? याचा विचार केला पाहिजे. खूप वाईट वाटले. पण तुम्ही कशाचे जस्टीफीकेशन देत आहात ? तुम्ही याठिकाणी कसले उत्तर देत आहात ? मनाला खूप पींच झाले, पीळ बसतो तसे झाले. पिंपरी-चिंचवड मध्ये दिल्लीतून आलेले हे भांडवलदार या गोष्टी कशा योग्य आहे, हे सांगण्यासाठी का तळमळतात ? याबाबतीत असे सांगितले गेले की, आम्ही त्यांना अट घातलेली आहे की, जी दुकाने बांधली जातील ती केवळ स्थानिक लोकांनाच द्यावयाची, मराठी लोकांना द्यावयाची आहेत. पण याबाबतीत ते भांडले तर तशी ती देता येणार नाही. घटनेच्या अधिकारानुसार जर एखादा परप्रांतीय येथे आला आणि त्याने सांगितले की, मला येथे दुकान घ्यावयाचे आहे. कारण त्याला व्यवसाय करण्याचा अधिकार आहे, तर मग त्याला कोणतीही ताकद रोखू शकणार नाही. मग तुम्ही जी अट घातलेली आहे, ती घटनाबाहय ठरेल. तेव्हा तुम्ही काय करीत आहात ? मतदार यादी बाबत सांगावयाचे तर परप्रांतातील लोक येथे ऑर्डर नुसार जमिनीची कामे करावयास येतात. मग येथे येऊन झोपडी बांधून राहतात. आंध्र प्रदेशमधून नांदेड वगैरे भागामध्ये मोठया प्रमाणात असे लोक येतात. त्यांचा मतदार यादीमध्ये समावेश होतो आणि मग त्यांना अधिकार प्राप्त होतात. परंतु येथील जो मुख्य शेतकरी आहे, त्याचा समावेश होत नाही. बाहेरुन आलेल्यांची नोंद होते अशी स्थिती आहे. मुंबई, ठाणे मध्ये अशी परिस्थिती आहे. आपला किती कर्मदरिद्रीपणा आहे ते पहा. मला काही कळत नाही, खूप दुःख होते. परंतु किमान इतर प्रांतातून येणारी माणसे ही आपली आहेत, हिंदुस्थानी आहेत. पण लोकसभेमध्ये माननीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांनी जे उत्तर दिलेले आहे, ते तेथील रेकॉर्डवर आलेले आहे. हा विषय ग्रामीण भागासाठी, मतदार यादीसाठी अतिशय गंभीर आहे. त्यांन असे सांगितले की, हिंदुस्थानामध्ये साडेतीन कोटी बांगला देशी आल्याची नोंद झालेली आहे. त्यापैकी मुंबई, नवी मुंबई, ठाणे इ. परिसरामध्ये 75 लाख बांगला देशी राहतात. हे लोक कोण आहेत ? मग त्यांच्याकडे शेती असेल किंवा नसेल.

यानंतर कु.गायकवाड . . . .



DVG/ MMP/ SBT/ KGS/ KTG/ प्रथम श्रीमती रणदिवे। 15:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

एक गुंठा जागेवर जर एखाद्याने घर बांधण्यास घेतले असेल व त्या जागेचा एनए झालेला नसेल तर तो शेतकरी होईल. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उद्‌ध्वस्त करणारे हे कलम का आणण्यात आले आहे ? हा विषय अत्यंत गंभीर आहे. ग्राम पंचायत मतदारसंघामधून निवडून येणारे प्रतिनिधी निवडून येणारच आहेत. याची किंमत आपल्याला मोजता येत नाही. हमाल, मापाडी हा मतदारसंघ आहे. त्याला आपण हात लावलेला नाही. व्यापारी मतदारसंघाला हात लावलेला नाही. हे कलम आणून शासन केवळ शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. या कलमामध्ये अशी अट घालण्यात आलेली आहे की, शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा नसावा. सेवा सहकारी सोसायटयामधून कर्ज वाटप शेतकऱ्यांना केले जाते. त्यामुळे पुढे आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, संचालक मंडळामधून निवडून येणाऱ्या शेतकऱ्याचे नाव मतदार यादीत असावे अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. मतदार यादीमध्ये अनेक त्रुटया वर्षानुवर्ष राहतात. आपण निवडणूक लढवितो म्हणून आपल्याला हे माहीत आहे. एखाद्या गावातील, शेतकऱ्याचे मतदार यादीमध्ये नोंदणी झालेली नसेल तर त्याला बाजार समितीमध्ये काहीही अधिकार राहणार नाही काय ? त्याला का वंचित केले जात आहे ? हे कशाकरिता केले जात आहे याचे उत्तर या सुधारणेमधून मिळत नाही. हे विधेयक येणा-या निवडणुकीमध्ये राजकीय प्रभाव निर्माण करण्याकरिता आणण्यात येत आहे असे मला वाटत आहे.निवडणुकीमध्ये काय काय करता येईल याचे आकडे मांडण्याकरिता हे विधेयक येथे आणण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, हे विधेयक मागे घेण्याची वेळ शासनावर येईल किंवा या कलमांमध्ये अनेक दुरुस्त्या कराव्या लागतील असे मला वाटते. शेतकऱ्यावर का अन्याय केला जात आहे ? घटनेने दिलेल्या अधिकाराअंतर्गत मी या ठिकाणी बोलत आहे. मतदार यादीमध्ये नाव नाही म्हणून एखादी व्यक्ती देशाची नागरिक नाही, त्याला कोणतेही लाभ मिळणार नाही असे घटनेने सर्टीफाय केलेले आहे काय? मग मतदार यादीमध्ये नाव नाही म्हणून तो बाजार समितीमध्ये मतदार नाही अशी दुरुस्ती का करण्यात येत आहे ? घटनेतील 19 व्या कलमानुसार परप्रांतियांविषयी आपल्याला प्रेम येते. त्यावेळी स्वकीयांबाबत आपण काय करतो याचा विचार आपण कधी केला आहे

..2..



श्री. दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काय ? शेतकरी हा आपला अन्नदाता आहे. बाजार समिती हा शेतकऱ्यांचा संपूर्ण आधार आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीमध्ये माल विकण्याचा अधिकार आहे. ते अडत्याकडे जाऊन सर्व व्यवहार करु शकतात. परंतु त्याचे नाव मतदार यादीमध्ये नाही म्हणून पूर्वी जो अधिकार त्यांना दिलेला होता तो आता काढून घेण्यात आला आहे. सभापती महोदय, अत्यंत अन्यायकारक परिस्थिती आज शेतकऱ्यांवर ओढवलेली आहे. या ठिकाणी मी अत्यंत खेदाने सांगू इच्छितो की, ही सत्य परिस्थिती आहे. आज शेतकऱ्यांना बुडविणारे किंवा त्यांना लुटणारेच आता मतदार झालेले आहेत. व्यापारी मतदार संघ तसेच राहणार आहेत.

सभापती महोदय, मध्यंतीच्या कालावधीमध्ये, शासनाने एक विधेयक आणले होते. आता आपण असे सांगू नका की, हे विधेयक आमच्या काळातील नसून तुमच्या काळातील आहे. आम्ही नालायक निघालो तर निदान तुम्ही तरी लायक व्हावे. दुस-याची नालायकी काढल्यामुळे आपली लायकी सिध्द होत नाही. आपल्याला प्रथम लायकी सिध्द करावी लागते. सर्व सेस व्यापाऱ्यांनी भरावयाचे, शेतकऱ्यांवर त्याचा बोजा टाकावयचा नाही अशी एक सुधारणा पूर्वी करण्यात आली होती. त्याला स्थगिती देण्यात आली आहे. ही स्थगिती का उठविली जात नाही ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MMP/ KTG/ कु.गायकवाडनंतर 16:00

श्री.दिवाकर रावते....

व्यापारी मतदार संघ आहे. तो निवडून येणार आहे, तो संचालक होणार आहे. पण तो शेतकरी होणार किंवा नाही हा प्रश्न आहे. तो व्यापारी होणार आहे. त्याची किती अरेरावी ? जो कायदा विधिमंडळाने मंजूर केला त्याला स्थगिती आहे. ती स्थगिती उठवू शकत नाही. परंतु त्याच्या मतदानाचा अधिकार आहे तो मात्र काढून घेतला जात आहे. विधिमंडळाने जो कायदा केला आहे त्याला ठोकरुन लावून तो संचालक होऊ शकतो. परंतु मतदार यादीत नाव नसल्यामुळे तो संचालक पदाची निवडणूक लढवू शकत नाही. तुझे नाव मतदार यादीमध्ये नाही असे सांगून त्याची बोळवण केली जाणार आहे. घटनादत्त अधिकाराची पायमल्ली करणारे हे विधेयक आहे. हे विधेयक सरकाराने पुढे नेण्याचे ठरविले तर मी विधी व न्याय विभागाच्या अधिका-यांविरुध्द हक्कभंग तर देईनच. कारण ते प्रत्येक वेळी घटनेचा आधार घेऊन बोलत असतात. आता त्यांच्याकडून मला हे समजून घ्यावयाचे आहे. मी मघाशी जे म्हटले ते पुन्हा सांगतो. मतदार यादीत नाव असो किंवा नसो, पण घटनेने मला जो अधिकार दिलेला आहे तो मला मिळतो की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. ग्रामीण भागामध्ये जो रात्रीचा दिवस करतो, आपल्या काळया आईची सेवा करुन उत्पादित झालेला माल बाजार समितीमध्ये नेऊन तो विकतो, त्यावर तो जगतो. त्याच्या मतदानाचा अधिकार काढून घेतला जातो. घटनेमध्ये अशाप्रकारची तरतूद केलेली नाही. हे घटनेच्या विरोधात आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कोणाचाही मतदानाचा अधिकार काढून घेतला जात नाही. फक्त निवडणूक लढविण्यासाठी पात्र, अपात्र याविषयाची ही सुधारणा आहे. पूर्वीच्या काळी त्याच्या 7/12 उता-यानुसार उमेदवार अर्ज भरु शकत होता. त्यावेळी ग्रामपंचायतीचा सदस्य आणि सेवा सहकारी सोसायटीच्या सदस्यासाठी मतदान करीत होता. आता तो मतदार यादीत नाव नसेल तर निवडणूक लढवू शकणार नाही अशी ही सुधारणा आहे.

श्री.दिवाकर रावते : त्याला निवडणूक लढविता येणार नाही, त्यासंदर्भातच मी बोलत आहे.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी विचारु इच्छितो की, आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे ? आपल्याला माहीत आहेच की, आज संध्याकाळी आपणा सर्वांना माननीय राज्यपालांकडे चहापानाच्या कार्यक्रमासाठी जायचे आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MMP/ KTG/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक महत्वाचे आहे. पण आपण सांगाल त्यावेळी मी माझे भाषण थांबवितो. माझे अपूर्ण राहिलेले भाषण उद्या सुरु करीन. सभापती महोदय, फॉर्मेशन ऑफ मार्केट कमिटीमध्ये शेतकरी हा मुलभूत घटक आहे. हमाल, मापाडी, व्यापारी या सर्व घटकांमध्ये शेतकरी सुध्दा हा एक घटक आहे. विधानपरिषदेमध्ये शिक्षक मतदार संघ आहे, पदवीधर मतदार संघ आहे, स्थानिक स्वराज्य मतदार संघ आहे. तसा त्या मार्केट कमिटीमध्ये मूळ घटक हा शेतकरी आहे. त्याचा अधिकार नाकारता येणार नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी कितीही आवर्जून सांगितले, विधेयकाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला तरी ते निरर्थक ठरणार आहे. राजकारणात निवडणूक लढविताना मतदार यादीशी तुमचा, आमचा संबंध येतो व तो पारंगत झ ाालेला आहे. नंदुरबार जिल्हयात 15-16 वर्षाच्या लाभार्थ्यांची नावे बी.पी.एल.च्या यादीत आहेत, त्याचे काय करावयाचे ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:05

(श्री. दिवाकर रावते...)

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. मुळात शेतक-याच्या घटनादत्त अधिकारावर गदा आणली जात आहे. हे विधेयक या ठिकाणी आणण्यासाठी विधी व न्याय विभागाने परवानगीच कशी दिली ? या तरतुदीबाबत जर उद्या आम्ही कोर्टामध्ये यशस्वी ठरलो तर हे विधेयक आणू दिल्याबद्दल विधी व न्याय विभागाच्या सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जाईल. मला असलेला घटनादत्त अधिकार हा माझा अधिकार नाही असे सांगणे घटनेच्या विरुध्द आहे. मी देखील एक अशासकीय विधेयक दिलेले आहे. घटनेच्या अनुच्छेद 19(क) प्रमाणे मला जगण्याचा अधिकार आहे आणि तो मला विधेयकाच्या माध्यमातून मांडण्याची संधी द्यावी असे माझे म्हणणे आहे. हे विधेयक परप्रांतीयांच्या विरुध्द नाही. घटनेप्रमाणे देशातील कोणत्याही नागरिकाला देशामध्ये कोठेही जाण्याचा, राहाण्याचा अधिकार आहे त्याप्रमाणेच मला देखील माझ्या राज्यात राहाण्याचा आणि जगण्याचा अधिकार आहे. हे विधेयक मी मांडले तर परप्रांतीयांच्या विरोधात टीका केल्यासारखे होईल म्हणून ते मला मांडू दिले जात नाही. परंतु माझे विधेयक हे अशासकीय आहे. उद्या आम्ही सत्तेवर आलो तर अशा प्रकारचे विधेयक आम्ही आणू.

सभापती महोदय, अशाच प्रकारचे हे विधेयक आहे. ज्यांची संबंधित मतदारसंघाच्या मतदारयादीत नावे असतील अशांनाच निवडणूक लढविण्याचा अधिकार असेल आणि संचालकाने किंवा अशा प्राधिकृत अधिका-याने नेमलेला प्रशासक वा प्रशासक मंडळ हे, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून आणि निवडणूक घेतल्यानंतर पुनर्घटित समितीची गणपूर्ती असलेली पहिली सभा घेईल त्या दिवसापर्यन्तच्या कालावधीत समितीचे कामकाज पाहील, अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये करण्यात येत आहे. राजकीय अभिनिवेषाने प्रेरित असणारे विधेयक कसे असावे याचे हे एक मूर्तिमंत उदाहरण आहे. आता भविष्यामध्ये आपले काही खरे नाही म्हणून राजकीय कार्यकर्त्यांना सामावून घेण्याचा, त्यांना प्रतिष्ठा आणि सत्ता देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. मतदार यादीमध्ये ज्याचे नाव असेल तोच निवडून येईल आणि नसेल तो गेला... सभापती महोदय, विधेयकाच्या पृ.क्र. 2 वरील कलम 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, " परंतु आणखी असे की, जर राज्य शासनास इष्ट वाटत असेल तर त्याला, प्रथमच घटित केलेल्या बाजार

..2..

(श्री. दिवाकर रावते...)

समितीवर सदस्य नामनिर्देशित करण्याऐवजी, प्रशासकाची किंवा प्रशासक, मंडळाची नेमणूक करता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेला प्रशासक किंवा प्रशासक मंडळ, सर्व प्रयोजनांसाठी, प्रथमच घटित केलेली समिती असल्याचे मानण्यात येईल." हे प्रशासक मंडळ काय काय धंदे करते हे मी सांगणार आहे. सभापती महोदय, प्रशासकीय मंडळावर नियुक्ती करण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली. हे प्रशासक मंडळ कसे असेल ? आमच्या पक्षाचे किती घ्यायचे, त्यांच्या पक्षाचे किती घ्यायचे हे ठरविले जाईल. ही संख्या तरतुदी प्रमाणे असेल काय ? हे विधेयक आणल्यानंतर देखील नियम बदलण्याचा अधिकार तुम्हाला प्राप्त होतो. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

जुने नियम बदलण्याचे अधिकार शासनास प्राप्त होतात. आता तर शासनाला अधिकार बदलण्याचे अधिकार प्राप्त झाले असल्यामुळे शासनास काही बघावयास नको. शासनाकडून प्रशासक मंडळ नियुक्त केले जाणार आहे, त्या मंडळातील सभासदांना सहकाराच्या बाबतीत ज्ञान किती आहे, त्यात शेतकरी किती आहेत, बाजार समितींचे ज्ञान किती आहे, याची माहिती घेतल्यानंतरच प्रशासक मंडळाची नियुक्ती केली गेली पाहिजे. आपल्या पक्षाच्या सदस्यांना सामावून घेण्याकरिता निर्माण करण्यात आलेली ही तरतूद आहे. दीड वर्षानंतर निवडणुका लागल्यानंतर जन सामान्यांमध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यातून आपण सावरले पाहिजे. सरकार जाण्याची वेळ आली तरी अजून महामंडळावरील नियुक्त्या झालेल्या नाहीत. भांडणे होतील म्हणून महामंडळावरील नियुक्त्या अद्यापपर्यंत केल्या गेल्या नाहीत. परंतु ही प्रशासक मंडळे तर फारच मोठी आहेत. या बाजार समितीच्या मंडळावर नियुक्त्या दिल्या गेल्या तर महामंडळावर मला नियुक्त करा अशी कोणीही आपणाकडे मागणी करणार नाही. एकदा बाजार समिती मिळाली तर कोणीही सभासद दुस-या मंडळावर नियुक्त्या करा म्हणून आपणास विचारणार सुध्दा नाहीत. याबाबतची माननीय राज्यमंत्री महोदयांना पूर्णपणे कल्पना आहे. माननीय सहकार राज्यमंत्री हे ग्रामीण भागातील कसलेले कार्यकर्ते आहेत. काही गोष्टी त्यांना मान्य नसतील, परंतु ते सरकारमध्ये मंत्री असल्यामुळे सरकारच्या काही गोष्टी त्यांना नाईलाजाने मान्य कराव्या लागतात. डॉ.पतंगराव कदम हे सहकार मंत्री आहेत. सहकार विभागाचा कारभार कसा चालला आहे हे मी कसे सांगू ? सहकार विभागावर किती बोलावे ? डॉ. पतंगराव कदम आणि श्री.जयप्रकाश दांडेगावकर हे ज्येष्ठ मंत्री आहेत. त्यामुळे टिकेची धार किती ठेवावी हा आमच्यासमोर प्रश्न पडतो. परंतु आम्हाला सहकार विभागाच्या बाबतीत बोलावे लागते हा आमचा नाईलाज आहे. कलम 13 ची सुधारणा आहे ती शेतक-याला मारक आहे. कार्यकर्त्यांची सोय केल्यामुळे बाजार समित्या उद्ध्वस्त करण्याचे त्यामध्ये बिजारोपण आहे. या निवडणुकीतून जो निवडून येतो. निवडणुकीच्या यादीत नाव असेल तर त्यास निवडणूक लढविता येईल, पण सरकार प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यास मोकळे झाले आहे. याद्या सदोष आहेत अशी एक तक्रार आली तर प्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यास मोकळे आहे. दहा गावातील लोकांनी सांगितले की, निवडणुकीच्या याद्या सदोष आहेत. त्यांनी सांगितले की, यादीत आमची नावे नाहीत. ते म्हणतील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

की, आम्ही 1990 साली मतदान केले होते. 1995 साली मतदान केले होते, 2000 साली मतदान केले होते. 2005 साली मतदान केले आता आम्हाला मतदानाचा अधिकार का नाही ? ते लोक पुरावे घेऊन येतील. याद्यांची तक्रार निर्माण होईल. नृरसिंह साखर कारखानाच्या निवडणुका सहा महिन्यात घेण्यात याव्यात अशा प्रकारचे आदेश कोर्टाने दिले आहेत. परंतु या निवडणुका माननीय मंत्री महोदय घेतच नाहीत. ते सांगतात की, आम्ही आमचा माणूस त्या ठिकाणी बसविला आहे. असे भाष्य माननीय मंत्री महोदय करतात म्हणजे त्यांचे धैर्य किती आहे. माननीय मंत्री महोदय, कोर्टाचे आदेश मान्य करीत नाहीत. कोर्टाने सहा महिन्यात निवडणूका घ्याव्यात असे आदेश दिले आहेत, तसेच कोर्टाने निवडणुकांच्या याद्या 2005 या वर्षाच्या फायनल करुन टाकल्या आहेत. ते सध्या धाकदपटशाच्या अडचणीखाली आहेत. माझी विनंती आहे की, सहकार विभागात जो भ्रष्टाचार सरु झालेला आहे त्यावर कुठे तरी आळा घाला. संचालक म्हणून मौजमजा करा. "तळे राखे तो पाणी चाखे " ही म्हण मला मान्य आहे. शेतकऱ्यांचे पैसे दिले नाहीत म्हणून हायकोर्टाने साखरेचे गोडाऊन सील केले. गोडाऊनमध्ये जेवढी साखर शिल्लक आहे, ती साखर विका आणि त्यातून जे पैसे येतील त्यातून शेतक-यांना पैसे द्यावेत अशा प्रकारचे आदेश कोर्टाने दिले आहेत. या आदेशाची सहकार राज्यमंत्र्यांना देखील कल्पना आहे. अवकाळी पावसामध्ये धाराशीव जिल्हयाचा कुठेही उल्लेख नाही. अवकाळी पावसात लातुर जिल्हयाचा समावेश आहे. परभणी जिल्हाचा समावेश आहे. नांदेड जिल्हयाच्या काही भागाचा अवकाळी पावसात समावेश झाला आहे...

यानंतर श्री. कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

संभाजीनगर आणि बीडचा काही भाग देखील यामध्ये आहे. किती नुकसान झाले आहे याची तालुकावार यादी आलेली आहे. गोडाऊनमध्ये 15 हजार क्विंटल साखर भिजली असे दाखविण्यात आले. प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही असा शासनाचा कारभार आहे. कुठलीही साखर भिजली नाही रेकॉर्ड तयार करण्यात आले. मराठवाडयामध्ये शेतकरी उघडयावर आहे. 500 रुपये भाव देणार 950 रुपये भाव शासन देणार नाही. इकडे 15 हजार क्विंटल साखर भिजल्याचे जाहीर करुन टाकले. कोर्टाने गोडाऊनला सील लावले. प्रशासकीय मंडळ नियुक्त केल्यावर काय घडते याची मी भरपूर उदाहरणे देणार आहे. प्रशासकीय मंडळ नियुक्त केल्यावर शेतकऱ्यांचा गळा कापला जातो. 45 व्या कलमावर बोलताना मी याबाबत अधिक माहिती सांगू शकेन. फक्त टीका करावयाची म्हणून मी बोलत नाही. नृसिंह साखर कारखान्याच्या शेतकऱ्याला पैसा मिळाला नाही. कारण नसताना प्रशासकीय मंडळ नेमले. आयुक्तांचे आदेश गेले, कोर्टाने आदेश दिले तरीसुध्दा शासन हे आदेश मानायला तयार नाही. मंत्रीमहोदयांकडे मी 2/3 वेळा गेलो. त्यांची बोलण्याची सवय बदलली नाही. प्रशासकीय मंडळ नियुक्त केले आम्ही काय करणार ? ज्याच्या हाती ससा तो पारधी असा प्रकार आहे. तुम्ही सत्तेत आहात. आम्ही बोलू शकत नाही. तुम्हांला अधिकार आहे. कोर्टाला जुमानायचे नाही, आयुक्तांना जुमानायचे नाही कोणाचेही आदेश पाळायचे नाहीत. मी मंत्री आहे. I am a super man . या खात्याच्या राज्यमंत्र्यांची काय कुचंबणा होत असेल हे मी समजू शकतो. गेली अनेक वर्षे मी त्यांना ओळखत आहे. त्यांनी हिंगोली जिल्हयात केलेले काम हा कौतुकाचा विषय आहे. येथे काम करायला मिळत नाही. हिंगोली जिल्हयात स्वातंत्र्यानंतर जे घडले नाही ते राज्यमंत्री श्री. दांडेगांवकर साहेब यांनी घडवून आणले आहे. दूध उत्पादनात त्यांनी क्रांती घडवून आणली आहे. एका बाजूला मी परभणी जिल्हयातील दुधाच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण बाहेर काढले. त्यामध्ये 8 अधिकारी निलंबित झाले. पूर्वी परभणी हा एकच जिल्हा होता. आता हिंगोली जिल्हा वेगळा झाला आहे. इकडे काम करायला देत नाही म्हणून तिकडे जिल्हयात काम करुन दाखविले. आपला तो मूळ स्वभाव आहे. बंद पडलेला कारखाना तुम्ही सुरु केला. हा कारखाना उर्जितावस्थेला आणला बरे वाटते. दूध उत्पादनात जी क्रांती घडवून आणली ती काही साधी गोष्ट नाही. समाजाला वळण देण्याचे काम माननीय राज्यमंत्री श्री. दांडेगांवकर साहेब यांनी केले आहे. त्यांच्या कामाबद्दल मला प्रचंड आदर आहे. पक्ष सोडून कर्तृत्ववान माणसाचे कर्तृत्व समाजाने

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मोजले पाहिजे. मी यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे साखर प्रत्यक्षात भिजली नाही केवळ रेकॉर्ड तयार करण्यात आले. शेतकऱ्यांचे पैसे लुटणारे प्रशासकीय मंडळ नेमल्यावर काय होणार ? हा पहिला आघात झाला आहे.

( **सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे** )

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

निवडणुकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा देशमुख यांच्यासारख्या बलाढ्य माणसाने दोन-पाच कमिटयांमध्ये फक्त सांगितले, त्यांची ताकद तुम्हाला माहिती आहे. फक्त सांगितले किंवा बाजार समितीच्या निवडणूक यंत्रणेकडे अर्ज केला की, ही यादी डिफेक्टिव्ह आहे तर बाजार समितीची निवडणूक थांबविली जाईल. यादीत नाव नाही. शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. मुळात ही कल्पना चुकीची आहे. किती पध्दतशीरपणे केले आहे? व्यवस्थित केले आहे. भविष्यात काही न करता आपल्या राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांना अशा एखाद्या जागेवर बसवायचे, जेणेकरुन त्याची ददात मिटेल. मग तो पक्षकार्याला लागेल ही व्यवस्था आहे.

कलम 13 मध्ये या दोन एकत्रित सुधारणा आहेत. तक्रार आली तर निवडणूक होणार नाही. निवडणूक नाही मग काय करायचे? किती हुशार अधिकारी आहेत बघा. ड्राफ्टिंग किती परफेक्ट केले आहे बघा. मग आम्ही काय करायचे? तक्रार आली, मतदार यादीत नाव नाही, त्यामुळे मतदान करता येत नाही. शेतकऱ्यांवर तुम्ही अन्याय करीत नाही? मग तुम्ही प्रशासकीय मंडळ नेमणार. कार्यकर्त्यांची व्यवस्था करणार. यातून कोणी सुटलेला नाही. तुम्ही आम्ही पक्षाच्या पलिकडे जाऊन सगळयांनीच मार्केट कमिटीच्या बाबतीत फटके सहन केलेले लोक आहोत. प्रत्येक शेतकऱ्याची व्यथा तीच आहे. पक्ष हा विषय निवडणुकीत येतो. त्याच्या पलिकडे सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा देशमुख यांच्यासारखा हुशार माणूस 8-10 मार्केट कमिटीच्या निवडणुका थांबवू शकेल, त्यांची तितकी ताकद आहे. मग प्रशासक मंडळ नेमले जाईल. यादी तयार केली जाईल आणि यादी घेऊ जाणार. सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा देशमुख किती हुशार आहेत बघा. यादी घेऊन जाताना फक्त काँग्रेस पक्षाचीच यादी घेऊन जाणार नाहीत. श्री.सुरेश वरपुडकर, श्री.रामप्रसाद बोर्डीकर यांच्याबरोबर बसतील. मग सर्वांचेच फोन जातील. यादी बरोबर आहे. करुन टाका. ही जी ग्रामीण व्यवस्था आहे ती राजकीय हेतूने प्रभावीत आहे. हे मारक आहे. 13 नंबरचे कलम अगदी गंभीर आहे. शासनाचा यामागील उद्देश आम्हाला कळलेला नाही. यामागील गर्भित उद्देश गंभीर आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना या विधेयकाच्या माध्यमातून त्यांचे अनुभव विचारात घेऊन बोलावे लागेल इतका हा कलम 13 चा विषय गंभीर आहे.

सभापती महोदया, शताब्दी साजरी करता का? शताब्दी तीन वर्षापूर्वी साजरी झाली. 2004

..2..

श्री.दिवाकर रावते.....

मध्ये शताब्दी साजरी झाली. शासनाने ती 2008 मध्ये साजरी केली. एखाद्या 100 वर्षाच्या वृध्दाने आपले वय मागे घ्यावे त्याप्रमाणे सहकाराचे वय शासनाने मागे घेतले. कशासाठी तुम्ही हे केले? चार वर्षानंतर महाराष्ट्रात सगळीकडे शताब्दी साजरी झाली. कलम 13 हा निवडणुकीसंबंधी आहे. त्यात एक गंभीर विषय असा आहे की, तुमच्या निवडणूक यादीतून उभे रहा किंवा निवडणूक यादीच्या बाहेरुन उभे रहा, परंतु 7/12 कोरा पाहिजे, बोजा नको. मराठवाडा आणि विदर्भामधील शेतकरी प्राणपणाने लढतोय. आत्महत्या करतोय एवढा त्यांच्यावर बोजा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील चित्र एवढे सुस्पष्ट आहे. म्हणजे हा भेदभाव नाही. ती शेतकऱ्यांची जाण आहे हे मानतो. हे काही ठिकाणी दिसत नाही. ही जाण कशी आहे? पश्चिम महाराष्ट्रातील कारखानदाराने सांगितले की, हा बंधारा मंजूर झाला. कारखानदाराची ही जाण त्या शेतकऱ्याप्रती आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

शेतकऱ्यांच्या हिताची जाण लक्षात घेतली पाहिजे. या ठिकाणी कोणाचे नाव घेऊन वाद निर्माण करीत नाही. चांगल्या गोष्टीत सुध्दा नाव घ्यावयाचे नाही असे ठरले त्यामुळे नाव घेत नाही, परंतु ही घडलेली घटना आहे. त्या जाणिवेचे मला नेहमी कौतूक वाटते आणि आमच्या मराठवाडा व विदर्भात मात्र ही जाण का येत नाही असा मला प्रश्न पडतो. आमचे 7/12 चे उतारे जर मॉर्टगेज झाले असते तर गोदावरीच्या माध्यमातून आमचा मराठवाडा सुध्दा सुजलाम् सुफलाम् झाला असता. माननीय मुख्यमंत्री म्हणाले ते आम्ही करतो, ठीक आहे, दोन-पाच वर्षात होईल, शेवटी आम्ही सर्व मिळून त्याचाही पाठपुरावा करणारच आहोत. मराठवाड्याला पाणी पाहिजे म्हणजे हा केवळ पैशाचा विषय नाही तर हा प्रदेशाच्या हिताचा विषय आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्याचा संचालक सांगतो की, या बंधाऱ्याला आपण कोटेशन दिले आहे काय ? त्याला चार वर्षे लागतील, मग त्यांनी शासनाकडे प्रपोझल दिलेले आहे आणि ते रेकॉर्डवर आहे. पण हा बंधारा बांधण्यासाठी बजेटमध्ये तरतूद नाही. दुसरीकडे मात्र बंधारा बांधला नसला तरी शेतकऱ्याच्या उसाला पाणी गेले, उस वाढला, कारखाना भरभराटीस गेला, खताला सुध्दा बिनव्याजी पैसे दिले, ही एक प्रकारची जी जाण आहे ती आमच्या भागात आली तर तेही होईल. ती जाण आल्यानंतर मात्र तेवढे प्रबळ राज्यकर्ते असले पाहिजेत. त्याला आडकाठी नाही, लाल फितीमध्ये अडकणार नाही म्हणून राजकीय इच्छाशक्ती सुध्दा त्यासाठी आवश्यक असते. विदर्भ, मराठवाडयात मात्र इतके कर्जबाजारी आहेत की ते सगळे विकलांग झालेले आहेत. कर्जाच्या बोजाने तो पिचलेला आहे. इतका पिचलेला आहे की, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक लढविताना सुध्दा त्याच्या तोंडाला फेस येतो. म्हणून वर्षानुवर्षे तेच तेच चेहरे दिसतात, तरुण वर्गाला वाटत नाही काय की आपण या सोसायटीवर जावे, पंचायत समितीवर जावे, जिल्हापरिषदेवर जावे पण त्याला ते शक्य होत नाही, कारण ठराविक लोकांचीच मक्तेदारी आहे. एखादा नवीन दिसला तरी तो राजकीय घराण्यातील असतो. संत्रा शेतकऱ्याचे उदाहरण घ्या. गेल्या पाच वर्षांपासून तो उद्ध्वस्त होत आहे. जे संत्र्याचे पीक विदर्भात एक नंबरचे आहे परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून संत्रा एक्सपोर्ट होत नाही. नागपूरमध्ये काटोल येथील संत्र्यावर प्रक्रिया करणारा कारखाना बंद का याचे उत्तर कोर्टाने आदेश दिल्यानंतर सुध्दा मिळत नाही. अशी दोन

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

उदाहरणे माझ्याकडे आहेत. हा कारखाना एका खाजगी माणसाला दिला आणि त्याने तेथील मशिन्स उचलून नेल्या. मी सांगतो त्यात चूक असूल तर नागपूरच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगावे. तसेच परभणीतील सहकारी सूत गिरणी आणि तेथील मशीन आशिया खंडात एक नंबरवर होती. ती मशीन पडून आहे. परंतु आपले माजी आमदार श्री. कुंडलिक नागरे यांनी ती मशिन घेतली, त्यात आणखी मशिन्स ॲड केल्या आणि बंद पडलेली सूत गिरणी वैभवात पुन्हा चालू केली. सन्माननीय सदस्य श्री. नागरे हे सुध्दा काँग्रेसचेच आहेत. अशी परिस्थिती आहे. एका ठिकाणी मशीन घेऊन जातात आणि दुसरीकडे मात्र त्यात आणखी मशीन ॲड करुन वैभवाने पुन्हा सूत गिरणी चालू करण्यात येते. आज शेतकरी असा दु:खी आहे की, त्याबाबत आपल्याला टी.व्ही.वर पहायला मिळते.

...........श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, संत्रा उत्पादक शेतकरी कशा संकटाला तोंड देत आहेत, या अवकाळी पावसामुळे त्याच्यावर कशी परिस्थिती ओढवली आहे यासंदर्भात रोज टी.व्ही. वर माहिती येत असते. परंतु जोपर्यंत आपण ही वस्तुस्थिती प्रत्यक्ष पाहत नाही तोपर्यंत त्या परिस्थितीचे गांभीर्य आपल्याला समजू शकणार नाही अशी परिस्थिती आहे. जोपर्यंत शेतक-याचा 7/12 कोरा होत नाही तोपर्यंत त्याला निवडणुका लढवता येत नाही. उलट मार्केट कमिटीच्या निवडणुकीमध्ये शेतक-यांचा सहभाग कशा प्रकारे वाढविता येईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता होती परंतु आपल्या नियमा प्रमाणे सर्वसाधारण शेतकरी मार्केट कमिटीच्या निवडणुका आता लढवू शकणार नाही, शेतक-याची किती जरी इच्छा असली तरी तो मार्कट कमिटीच्या निवडणुका लढवू शकणार नाही ही शेतक-याच्या दृष्टीने दुर्दैवाची गोष्ट आहे. कर्ज माफी दिल्यानंतर सुध्दा 82 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेतक-यांनी आत्महत्या तुमच्यामुळे केल्या असे मी म्हणत नाही उलट कर्ज माफी दिल्यानंतर शेतकरी आत्महत्या का करीत आहेत यासंदर्भात मी जास्त लक्ष घालणार आहे. खरे म्हणजे असे असतांना शेतकरी का आत्महत्या करीत आहेत यासंदर्भातील विचार सगळयांनी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, संत्र्याचे पीक विदर्भात घेतले जाते आणि मोसंबीचे पीक मराठवाडयात घेतले जात असते. मराठवाडयामध्ये नंबर एक ची संत्री होत असते. मोसंबीचे पीक मराठवाडयात असतांना सुध्दा मोसंबीची बाजारपेठ नागपूरला होती. मोसंबीची बाजारपेठ 350 कोटी रुपयांची होती. बाजार समित्या कशा काम करतात यासंदर्भात मी पूर्ण माहिती घेतलेली आहे. मी जेव्हा पणन मंत्री होतो त्यावेळेस मी माहिती घेतली त्यावेळेस मराठवाडयात मोसंबीचा भाव 35 रुपये होता आणि मराठवाडयाच्या 20 कि.मी. अंतरावरील बॉर्डरवर 120 रुपये भाव होता. यासंदर्भात मी अधिका-यांशी चर्चा केली आणि नागपूर मधील मोसंबीची बाजारपेठ जालना येथे आणली. जालना येथे मोसंबीची बाजार पेठ झाल्यामुळे मोसंबी उत्पादक शेतक-यांचा फार फायदा झालेला आहे. मोसंबी आम्हाला पंजाब पर्यंत पाठवावी लागत असते. त्यावेळी पंजाबपर्यंत मोसंबी पाठवयण्यामध्ये फार दिवस जात होते त्यामुळे संत्रीचा रंग फिका पडत होता तसेच संत्री कोमेजून जात होती त्यामुळे शेतक-यांचे नुकसान व्हायचे परंतु आता तसे होत नाही. जालन्याला मोसंबीची बाजारपेठ आल्यामुहे मराठवाडयातील शेतकरी सुखी झालेला आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, सगळया बाजार समितीच्या निवडणुकीसाठी शेतक-यांचा 7/12 कोरा असेल, त्याचे नाव मतदार यादीत असेल तरच शेतक-याला निवडणूक लढवता येते. त्यामुळे शेतकरी हा शेतकरी आहे हे तुम्ही मान्य केले पाहिजे शेतक-याला मार्केट कमिटीची निवडणूक लढवणे सोपे जाईल, निवडणूक लढवण्यामध्ये काहीही अडचणी येणार नाही यासाठी आपण सोपे कायदे केले पाहिजे परंतु शेतक-याला मार्केट कमिटीची निवडणूक लढवणे कसे अवघड जाईल याकडे आपण लक्ष देत आहात. मतदाराचे वय अगोदर 22 वर्ष होते परंतु निवडणूक आयोगाने मतदाराचे वय 18 केल्यामुळे फार मोठया प्रमाणात तरुण मतदार झालेले आहे. या सभागृहातील सदस्यांचे ॲव्हरेज वय पाहिले तर ते 25 ते 32 आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे 18 वर्षावरील तरुण, तडफदार तरुणांना त्याचा फायदा झालेला आहे. या सभागृहामध्ये सुध्दा अनेक सदस्य तरुण आहेत, अनेक मंत्री सुध्दा तरुण आहेत. तरुण मंत्री फार चांगल्या प्रकारे आपल्या विभागाचे काम करीत आहेत, चांगल्या प्रकारचे उत्तरे सुध्दा देतात. निवडणूक आयोगाने मतदारांचे वर्य 22 वरुन 18 वर आणल्यामुळे त्याचा सर्वांना फायदा झालेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

शेतक-यांचे हित साधण्यासाठी, शेतक-यांचे भवितव्य ठरविण्यासाठी बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक शेतक-याला भाग घेता आला पाहिजे. ज्या शेतकऱ्याच्या सात बाराच्या उता-यावर कर्जाची नोंद आहे अशा शेतक-याला देखील निवडणुकीमध्ये भाग घेता येईल अशा प्रकारची सुधारणा करावयास पाहिजे होती. पंरतु तशा प्रकारचा बदल न करता उलटा बदल करण्यात आलेला आहे. शेतक-यांना यातना देणारा हा बदल आहे असे मला या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या संदर्भात शेतकऱ्यांना पूर्वी थोडीशी अडकाठी व्हावयाची परंतु आता पूर्ण अडकाठी निर्माण झालेली आहे . विदर्भ आणि मराठवाडयातील सर्वसामान्य शेतकरी या बदलामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीवर येऊ शकणार नाहीत. ज्या शेतक-याच्या सात बाराच्या उता-यावर कर्ज आहे असा शेतकरीसुध्दा निवडणुकीमध्ये भाग घेऊ शकेल असा बदल करावयास पाहिजे होता परंतु तो बदल न करता शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत मारक आणि घातक तसेच शेतक-यांना उद्ध्वस्त करणारा असा बदल करण्यात आलेला आहे त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यां बरोबर

शेतक-यांची जी नाळ जोडलेली आहे ती नाळ कापण्याचे काम या बदलामुळे होत आहे. त्याचबरोबर बलदंड लोकांना जगविण्याचे काम होत आहे. बाजार समित्यांच्या निवडणुका होऊच नये अशी व्यवस्था या व्दारे निर्माण करण्यात आलेली आहे. प्रशासक किंवा प्रशासक मंडळ निर्माण करण्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे या कायद्यातील कलम 15 क मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, " सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर, बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी,प्रशासक नेमण्याची तरतूद होती. उक्त कलमामध्ये, प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यता आली आहे." या पूर्वी कलम 13 मध्ये जी सुधारणा करण्यात आलेली आहे ती निवडणुकासंबंधीची आहे. त्यानंतर कलम 15 मध्ये प्रशासक नेमण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी निवडणुका घेणे अशक्य होईल, मतदार यादीला आव्हान देण्यात आल्यामुळे निवडणुका घेता आल्या नाही तर त्या ठिकाणी प्रशासक नेमण्यात येणार आहे. कलम 15 मध्ये आता अशी सुधारणा करण्यात आलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

आहे की, निवडून आलेल्या मंडळाची मुदत संपल्यानंतर प्रशासक किंवा प्रशसक मंडळ नेमण्यात येणार आहे. माननीय मंत्री महोदयांना मी या निमित्ताने एक प्रश्न विचारणार असून त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी त्यांच्या भाषणात द्यावे . सभापती महोदया, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती ही सर्वात मोठी व श्रीमंत आहे. कोटयावधी रुपयांचा त्यांचा नफा आहे. या कृषि उत्पन्न बाजार समितीचा या वर्षीचा नफा 60 कोटी 89 लाख 5 हजार 962 रुपये एवढा आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण 295 कृषि उत्पन्न बाजार समित्या असून त्याचे उत्पन्न 300 कोटी रुपये एवढे आहे. दरवर्षी ते किती रुपये खर्च करतात हे देखील मी आपणाला सांगणार आहे. माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकामध्ये जी सुधारणा आणली आहे ती कशासाठी आणली आहे याचा विचार केला होता

काय ? या कलमामध्ये "सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर.". असा उल्लेख करण्यात आलेला आहे. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचा कालावधी संपला आहे किंवा नाही हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : सन्माननीय सदस्यांना अजून किती वेळ बोलावयाचे आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, मला अनलिमिटेड बोलावयाचे आहे. माननीय राज्यपालांकडे जाण्याची वेळ जेव्हा होईल तेव्हा मी माझे भाषण थांबविणार आहे आणि उद्या पुन्हा मी या भाषणावर बोलण्यासाठी उभा राहणार आहे. आता मी या विधेयकाच्या दुस-या तरतुदीसबंधी बोलण्यास सुरुवात केली आहे. या विंधेयकातील तरतुदी व्यतिरिक्त मी एकही शब्द बोलणार नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदया, आपण सुरूवातीस बोलणाऱ्या सदस्यांना भरपूर वेळ देता आणि मग आमच्यासारख्या नंतर बोलणाऱ्या सदस्यांना 2-2 मिनिटांमध्ये आपले विचार मांडण्यास सांगितले जाते, हे बरोबर नाही. आता या विधेयकावरील चर्चेमध्ये असा प्रकार आमच्याबाबतीत होऊ नये इतकेच मला आपल्याला सांगावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्री असताना माझ्याकडे हे खाते होते त्यामुळे मला चांगले माहिती आहे की, त्यावेळी मुंबईची बाजार समिती 185 कोटी रूपयांनी तोट्यात होती. त्यावेळेस त्या समितीमध्ये निवडून आलेल्यांनी असे काय कार्य केले की, ती समिती इतक्या तोट्यात गेली हे माननीय राज्यमंत्र्यांनी येथे सांगावे. त्यावेळी तुमचे त्यावर काय नियंत्रण होते, तुमचे कोणते नियोजन होते आणि आता आहे हेही सांगावे. आपण आता ज्या सुधारणा या कायद्यात करू पाहत आहात त्यातून तुम्ही या बाजार समित्या राजकीय अड्डेच करायला निघाला आहात असा माझा सरळ सरळ आक्षेप आहे. मुंबईची बाजार समिती जी 185 कोटीने तोट्यात होती ती नंतर तेथे श्री.जंत्रे म्हणून प्रशासक नेमले गेले त्यांच्या कारभारामुळे, प्रशासनामुळे 185 कोटीचा तोटा जाऊन 165 कोटीने फायद्यात आली. म्हणजे प्रशासन योग्य प्रकारे केले तर असेही होऊ शकते हे लक्षात घ्या. आता तर मुंबई बाजार समिती ही दुभती गाय आहे, तेथे कोठला कोठला माल येतो त्याचा काही सुमारच नाही. तेथे इतके काही व्यवहार चालतात की, त्यातून तेथील अधिकाऱ्याचा खून झ ाला. या बाजार समितीवर 6 डिसेंबर 2001 ते 6 जून 2006 या काळात श्री. काकाणे म्हणून अध्यक्ष होते. उपाध्यक्ष म्हणून नांदेडचे हणमंतराव बेटमोगरे हे होते. त्यावेळीही कारभार तसाच चालला होता, कोणीही विचारीत नाही, निवडणुकाही नाही. तसाच कारभार चालला होता. त्याचे उत्तर मी तुम्हाला विचारणार नाही की, तुम्ही त्यावेळी निवडणुका का घेतल्या नाहीत ? मी मघाशी म्हटले की, आपल्या राजकीय कार्यकर्त्यांची सोय लावण्यासाठी म्हणूनच तुम्ही हे विधेयक आणले आहे. त्यावेळी असलेले श्री.काकाणे हे कोणत्या पक्षाचे होते आणि श्री.बोटमोगरे कोणत्या पक्षाचे आहेत ते मी आता सांगत नाही. परंतु सगळे काही व्यवस्थित होत होते. त्या काळातील कारभाराची आजही चौकशी करण्याची तुमची हिम्मत आहे काय ? सभापती महोदया, त्याही पलिकडे जाऊन मी म्हणेन की, अशांच्या हातात तुम्हाला बाजार समित्या द्यायच्या आहेत. जे निवडून आले हाते त्यांची वेळ संपली, त्यांची नियुक्ती संपली असताही गेले

..... वायवाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रावते .....

सहा महिने झाले श्री.कुमार गोसावी हे तेथे आहेत. प्रशासक म्हणून नाहीत पण ते नेमके कोणत्या पदावर आहेत ते आपण सांगू शकाल काय ? त्यांच्या हातात त्या बाजार समितीचा कारभार राहिला पाहिजे म्हणूनच निवडणुका वेळेत घेतल्या नाहीत. म्हणूनच मी म्हणतो की, तुमचे पुढले कलमच ढोंगी आहे, हा माझा आक्षेप आहे. ही सचोटी तुमच्यामध्ये नाही. सभापती महोदय, सहाय्यक निबंधक आणि सहकार निबंधक यावर मी नंतर बोलणारच आहे. ....

( यानंतर श्री.सरफरे ....झेडझेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते......

सभापती महोदय, आज नवी मुंबई बाजार समितीमध्ये कांदा-बटाटा मार्केट, भाजी मार्केट, सुकामेवा मार्केट. हा सुकामेवा खाली असतो आणि वर भाज्या ठेवलेल्या असतात. अशाप्रकारची धमाल त्याठिकाणी चालते. फळ मार्केट आणि धान्यमार्केट अशी एकूण पाच मार्केट त्याठिकाणी होती. या बाजार समितीमध्ये उप निबंधक चार होते, सह निबंधक दोन होते, आणि एक अपर निबंधक सचिव म्हणून होता. सहकार विभागातील एवढे अधिकारी होते. त्यामुळे त्यावर थोडेसे नियंत्रण होते. हे अधिकारी कां काढले? हे आपण आम्हाला सांगाल काय? हे अधिकारी कमी कां केले हे आपण आम्हाला सांगणार काय? त्याठिकाणी दहावी आणि बारावी उत्तीण झालेल्या कर्मचाऱ्यांकडे सचिव पदाची जबाबदारी सोपविली. या बाजार समितीमधील दररोजची उलाढाल 1200 ते 2000 कोटींची आहे, यापेक्षाही कदाचित जास्त असेल. सहकार खात्याचे सर्व अधिकारी काढून टाकल्यामुळे त्यांच्या रिसिट फाडण्याचे काम त्यांचेच कर्मचारी करीत आहेत. त्यांच्यावर शासनाचे काहीही निर्बंध नाहीत. अशापरिस्थितीत त्याठिकाणी काय घडत असेल? मंत्रिमहोदय, आपल्याला काय करावयास पाहिजे? असे मी ज्यावेळी आपणास विचारीत आहे त्यावेळी हे मूर्तिमंत उदाहरण आपण लक्षात घ्यावे. त्या बाजार समितीची निवडणूक वेळेवर कां घेतली गेली नाही? या मार्केट कमिटीमध्ये किती घोटाळे आहेत? हे घोटाळे सांगण्याच्या पलिकडे आहेत. सभापती महोदय, घोटाळा सुध्दा इतका सुंदर चालतो. श्री. दिवाकर रावते यांनी मार्केट कमिटीकडून एक गाळा घेतला आणि तो माननीय श्री. दांडेगावकर यांना विकला. माननीय श्री. दांडेगावकर साहेबांनी तो गाळा माननीय श्री. उल्हास दादा पवार साहेबांना विकला. माननीय श्री. उल्हास दादा काय, माननीय श्री. दांडेगावकर काय, किंवा श्री. दिवाकर रावते काय हे व्यापारी नाहीत. आणि मग "जैन साहब आ जाओ, करलो धंदा." त्यांनी गाळा जैनला विकला. मी गाळा माननीय श्री. दांडेगावकर साहेबांना विकल्यानंतर तो रेकॉर्ड झाला पाहिजे. त्याची ट्रान्सफर फी भरली पाहिजे, अनेक गोष्टी केल्या पाहिजेत. त्यानंतर तो गाळा डायरेक्ट जैन यांच्या नावावर ट्रान्सफर होतो. हे कसे होते? जैन म्हणतो "मै नही हूॅं." मग जैन कोर्टात जातो. तो वकिल मार्केट कमिटीचा नाही. ज्या वकिलाला नेमलेला असतो त्याला फोडला जातो, आणि मग मार्केट कमिटी कन्सेंट डिग्री करते. कन्सेंट डिग्री केली की विषय संपतो. आणि मधले सर्व अडथळे बाजूला होतात. याचा आपण शोध

....2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते...

घेणार आहात काय? सहकार खात्याचे अधिकारी काढून त्याठिकाणी हे कर्मचारी नेमले जातात आणि मग गाळयांच्या व्यवहारामध्ये लाखो रुपये मॅनेज होत असतात. नवी मुंबईच्या मार्केट कमिटीमधील एक गाळा म्हणजे सोन्याची खाण आहे. 5x5 चा गाळा जरी असला तरी त्या गाळयाची वर्षभराची उलाढाल 5-5 हजार कोटींची असते. हा आपण मॉडेल ॲक्ट केला आहे. मंत्रिमहोदय, मी आपणास आव्हानात्मक बोलत आहे. शेतकरी फसता कामा नये. याकरिता आपण मालाचे लिलाव करावयाचे. आता याक्षणी सुध्दा सकाळपर्यंत रुमालामध्ये हात घालून सौदे होत आहेत. यावर तुमचे नियंत्रण काय आहे ? तुम्ही नियंत्रण आणू शकत नाही. याचे कारण राजकीय दबावामुळे तुम्ही तुमचे अधिकारी काढून टाकले आहेत. त्याठिकाणी जे बलदंड बसले आहेत त्यांच्या दबावाने तुम्ही तुमचे अधिकारी काढून टाकले. त्याचा असा परिणाम झाला आहे की, त्याठिकाणी परिस्थिती इतकी गंभीर आहे की, कोण कुणाला विचारीत नाही, कुणी कुणाला वदत नाही, गाळयांची विक्री चालू आहे. बेदाणे आणि सुका मेवा खाली येतो वर भाजी येते, भाजीची रिसिट फाडली जाते, बेदाणे रिसिट न फाडता तसेच जातात. अशाप्रकारे फळांच्या बाबतीत सुध्दा चालू आहे.

सभापती महोदय, सन 2003 पासून गेल्या पाच वर्षामध्ये आपण तेथील वैधानिक ऑडिट तपासणी केलेली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मुक्तव्दार दिलेले आहे काय ? ही अतिशयोक्ती नाही. मी नाव घेणार नाही कारण आपल्याला याची कल्पना आहे. पण या मार्केट समितीतील आमच्या मराठवाडयातील एक बलदंड सभासद विमानाने मुंबईला येण्यासाठी निघाले आणि संभाजीनगर मध्ये कापसाच्या गासडीच्या ट्रकला लागून ते विमान कोसळले आणि त्याचे दोन तुकडे झाले. त्यातले काहीजण गेले आणि काहीजण वाचले. पण एका सदस्यांच्या बाबतीत शोधाशोध सुरु झाली. कारण ते सापडतच नव्हते. 25 लाख रुपयांची एक बॅग अशा 4 बॅगा मिळाल्या. पण हे पैसे कोणाचे आहेत ? असा प्रश्न उपस्थित झाला. अजूनपर्यंत त्याचा पत्ता लागला नाही. त्या पैशाचा मालक तुम्हालाही माहिती आहे आणि आम्हालाही माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेशभाऊ यांनाही माहिती आहे, मराठवाडयातील सगळयांना माहिती आहे. मग ते चार दिवसांनी सापडले. या बॅगा कोणाच्या आहेत ? असे विचारले तर असे म्हणाले की, या बॅगा माझ्या नाहीत. त्या मार्केट कमिटीची ताकद काय असेल ? याचा विचार करा. पण ते वाचले, आनंदाची बाब आहे.शेवटी या बॅगा सरकारकडे जमा झाल्या. आपल्याला याबाबतीत सगळे माहिती आहे, मी नव्याने सांगावयास पाहिजे असे नाही. मुंबईची जी बाजार समिती आहे, त्याचे ऑडीट झ ाले नाही. या बाजार समितीचे 2002 पासून ऑडीट का झाले नाही ? येथील परिस्थिती काय आहे ? जेव्हा 2002-2003 मध्ये ऑडीट करण्यासाठी लोक गेले, तेव्हा तेथील सचिव श्री.तांबोळे यांना गोळया मारुन त्यांचा खून करण्यात आला. त्यानंतर आतापर्यंत तेथे ऑडीट करण्यासाठी कोणी गेले नाही. याचे कारण काय असेल ते मला माहिती नाही. आमचे श्री.कुमार गोसावी हे सात वर्षे अध्यक्ष होते. नियम असा आहे की, 7 ते 8 लाख रुपयांच्यापेक्षा जास्त किंमतीची गाडी घ्यावयाची नाही. या नियमानुसारच मुंबई मार्केट कमिटीकडे गाडया आहेत याबद्दल आपण मला माहिती देऊ शकाल काय ? प्रत्यक्षात 15 लाख, 20 लाखाच्या आहेत. गाडया कशा आहेत ? तर दिवाकर रावते मार्केट कमिटी, मग माझ्याकडे माझे नातेवाईक आले किंवा माझ्याकडे मधुभाई आले आणि म्हणाले की, मला बाहेर जावयाचे आहे. मग तुम्ही गाडी घेऊन जा. अमुक आले आणि ते म्हणाले की, मला बाहेर जावयाचे आहे. ठीक आहे, तुम्ही गाडी घेऊन जा.अशा प्रकारे मार्केट कमिटीच्या गाडया नातेवाईकांना, मित्रांना द्यावयाच्या. काही अडचण नाही. अशी सगळी तेथे भरभराट आहे.यामध्ये जो मोठा भ्रष्टाचार असा आहे,आपण त्यांची अत्यंत गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.याबाबतीत माननीय मंत्री महोदय कधी माहिती देणार आहेत, हे त्यांनी आम्हाला ......

. . . .3 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. याबाबतीत तुमच्यामध्ये, सरकारमध्ये, विभागामध्ये किती हिंमत आहे हे आम्हाला पहावयाचे आहे. सभापती महोदया, श्री.कुमार गोसावी अध्यक्ष असताना, ज्यांचा काहीही संबंध नाही अशा संस्थांना पैसे दिले आहेत. म्हणजे सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे आल्या आणि त्यांच्या नेत्यांनी शब्द टाकल्यानंतर ताई, तुम्हाला काय पाहिजे ? असे विचारावयाचे. मग तुम्ही सांगावयाचे की, माझी शिक्षण संस्था आहे. त्यासाठी 10 लाख रुपये द्या, 25 लाख रुपये द्या. मग घेऊन जा. या काळामध्ये अनेक शिक्षण संस्थांना, स्वत:च्या ट्रस्टला ज्याच्याशी मार्केट समितीचा काहीही संबंध नाही, ज्यांचा व्यापाराशी, शेतीशी काहीही संबंध नाही त्यांना सुध्दा मार्केट समितीचे लाखो रुपये वाटण्यात आले. याबाबतीत त्यांना कोण जाब विचारणार आहे ? शेतकऱ्यांच्या कष्टाचे पैसे त्यांच्या विकासासाठी खर्च करण्याऐवजी ते दुसरीकडे खर्च करण्यात आले.बाजार समितीचे नुतनीकरण करण्यासाठी आपण मॉडेल ॲक्ट आणला.मी त्यासंबंधात नंतर बोलणार आहे. पण विविध संस्थांना अशा प्रकारे करोडो रुपये कशासाठी वाटण्यात आले ? जर तुम्हाला यासंबंधातील यादी मिळाली नाही तर मी तुम्हाला देईन. पण खरे म्हणजे तुम्हालाच ही यादी मिळाली पाहिजे. मी काय द्यावयाची ? याठिकाणी सिध्दीविनायक मंदिरासारखेच झाले आहे. सिध्दीविनायक मंदिराच्या ट्रस्टमध्ये सगळी आपली माणसे नेमण्यात आली आणि लोकांनी श्रध्देने पेटीमध्ये जे पैसे टाकले होते. त्या जमा झालेल्या पैशातून 60 लाख, 80 लाख अशा प्रकारे वाटण्यात आले. शेवटी कोर्टाने त्यावर निर्बंध आणले. तशाच प्रकारे या मार्केट कमिटीने सुध्दा शेतीशी संबंध नसलेल्या कित्येक संस्थांना लाखो रुपये दिलेले आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे..... 16:55

श्री. दिवाकर रावते..

आतापर्यंत शासनाने काय केले आहे, यापुढे देखील काय करणार आहात ? ही वसुली शासन करणार आहे काय ? तुमच्याने ते होणार नाही. वसुली करण्याची सरकारकडे हिंमतच नाही. राजकीय लागेबांधे पोसायचे व याचा वापर निवडणूक लढविण्याकरिता करायचा. हे एकमेव गणित तुम्हाला माहित असल्यामुळे, या मार्केट कमिटयांना जाब विचारण्यास तुम्ही सक्षम नाही. शासनाने ही हिंमत दाखवावी. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून कालपर्यंत आपण येथे टाळया वाजवित होता, बाके वाजवत होता, नेत्यांचे कौतुक करीत होता. शेतकऱ्यांना लुटणाऱ्याना फासावर चढविण्याची हिंमत आहे का तुमच्यामध्ये ? या माकेट कमिटयांमध्ये लाखो रुपये खर्च झालेले आहेत. संताप अनावर व्हावा अशा अनेक घटना घडत आहेत. शेतकऱ्यांच्या हिताकरीता, शेती संशोधनाकरिता तसेच कृषी विद्यापीठाकरीता हे पैसे दिले गेले असते तर मी समजू शकलो असतो. अनेक संस्थांना काही देणे घेणे नसताना देखील लाखो रुपये दिलेले आहेत. आयजीच्या जीवावर बायजी उदार झालेला आहे. या विधेयकामध्ये या कलमाद्वारे कोणती सुधारणा करण्यात येत आहे हे मंत्र्यांनी सांगावे. कशाकरिता ही कलमे आम्हाला वाचण्यास सांगितले जात आहे ?

सभापती महोदय, बाजार समितीच्या गाडया, बाजार समितीला लाखो रुपयांचे करण्यात आलेले वाटप अशा अनेक विषयाबाबत मी बोलणार आहे. बाजार समिती म्हणजे जणु काही कुरण झालेले आहे. हे सर्व कोण सांभाळणार आहे आणि या बद्दल आम्हाला कोण सांगणार आहे ? हे सर्व पाहताना माझ्या मनामध्ये खूप यातना होत आहेत. या पिढीला तुमच्या आमच्या पैकी कोणीही आधार देऊ शकत नाही. परंतु निदान पुढच्या पिढीला समृध्दीने नव्हे तर समाधानाने तरी जगता यावे या करिता शासनाने काही योजना आखणे आवश्यक आहे. हे सर्व कोण सांभाळणार आहे ? आता कलम 15 आणण्यात आलेले आहे. यामधून शासनाची मानसिकता दिसून येत आहे. हे कलम मी आपणास वाचून दाखवितो. या कलमामध्ये असे म्हटले आहे की, सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर, बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी, प्रशासक नेमण्याची तरतूद होती. उक्त कलमामध्ये, प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे " निवडणुकीचा कालावधी संपला म्हणून नव्याने निवडणूक घेण्यात येणार आहे असेच सर्व सभासद तेथे आहेत. त्या ठिकाणी कोणीही प्रशासक नाही, निवडून आलेले

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

सभासद देखील नाहीत. जे सभासद आहेत त्यांचा कालावधी संपलेला आहे. असेच सर्व प्रकार तेथे सुरु आहे. कशाकरिता हे फसवे कलम आम्हाला दाखविण्यात येत आहे. मी आपणाला या संदर्भात केवळ उदाहरण दिलेले आहे. अशी अनेक उदाहरणे महाराष्ट्र राज्यामध्ये आहेत हे आपल्याला माहीतच आहे. मी आपणाला हे सांगण्याची आवश्यकता नाही. विधीमंडळापासून 20 ते 40 किमी. अंतरापासून हे सर्व प्रकार सुरु आहेत. या कलमामुळे कोणत्या सुधारणा करण्यात येणार आहे, हे माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये सांगावे लागणार आहे. आज संध्याकाळ पर्यंत ही सुधारणा मागे घ्यावी. बाजार समितीच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी एखादा चांगला अधिकारी नेमावा. चांगला कारभार करुन घ्या. ग्रामीण भागामध्ये, बाजार समितीकडे 60 कोटी रुपये येतात. त्याचा काय विनियोग कसा होत आहे ? बाजार समितीचा एस्टॅब्लीशमेंट खर्च किती आहे, रिपेअर्सची कामे किती काढली जातात ? बाजार समितीमध्ये नसलेले रिपेअर्स दाखवून लाखो- करोडो रुपयांची टेंडर्स काढली जातात. फक्त दुरुस्ती करण्याची कामे सुरु आहेत. हा निधी ग्रामीण भागातील, तालुका पातळीवरील मार्केट कमिटयांना दिला गेला तर यामुळे त्यांना फार मोठया प्रमाणात फायदा होऊ शकेल. मार्केट समितीचे नियोजन करण्याकरिता मॉडेल ॲक्ट आणला होता. परंतु तरी देखील या कमिटयांना जे लाखो - करोडो रुपये मिळतात त्याचे नियोजन योग्य प्रकारे झाले नाही. 15 वे कलम जसे फसवे आहे तसेच आणखी फसवे कलम 35 (क) आणण्यात आले आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, नवीन कलम 35-क समाविष्ट केलेला आहे. त्यामधील तरतूद मी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, 'बाजार समित्यांच्या कार्यामध्ये निश्चितपणे प्रशासकीय कार्यक्षमता यावी यासाठी, सहकार विभागातील सहायक निबंधक, सहकारी संस्था, या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल अशा कोणत्याही अधिका-याची, कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.'.....

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण आज अपूर्ण राहिलेले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 3 एप्रिल, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.00 वाजता गुरुवार, दिनांक 3 एप्रिल, 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही